
हिंदुस्तान क...



लेखक. पं. जवाहरलाल नेहरू

निर्मळ प्रकाशन पुष्प २ रें

पं. जवाहरलाल नेहरूकृत

हिंदुस्थान व जग

व

इतर विविध लेख

अनुवादक— शंकर लक्ष्मण चिटणीस

★

१४ नोव्हेंबर १९४४

सोल अेजंटस्,

बुक स्टॉल दि रिपब्लीक

रविवार चौक, कोल्हापूर.

किंमत २॥ रुपये.

प्रकाशक :—

श्री. डी. एच. इनामदार,

निर्मल प्रकाशन, कोल्हापूर.

मुद्रक :—

श्री० भा. रा. महागांवकर,

निर्मल प्रेस, कोल्हापूर.

प्रास्ताविक निवेदन

' हिंदुस्थान व जग ' हा पं. जवाहरलाल नेहरु यांच्या विविध लेखांचा प्रथम संग्रह वाचकांच्या हातीं देतांना मला सानंद अभिमान वाटत आहे. पं. जवाहरलाल हे आधुनिक युगांतील अेक लोकोत्तर पुढारी, अत्युच्च ध्येयवादी म्हणून जगाला ज्ञात आहेतच, पण त्याशिवाय जगांतील अेक श्रेष्ट प्रतिभासंपन्न लेखक म्हणूनहि त्यांची ख्याति आहे. त्यांच्या लेखनशैलीबद्दल अधिक लिहिण्याची जरुरी नाहीं. ओजस्वी विचार व अुदात्त ध्येयवाद यांची गुंफण रेखीव व लालित्यपूर्ण भाषेंत करण्याची जवाहरलालजींची हातोटी असामान्य आहे. त्यांचें लेखन म्हणजे भाषेचा विलासच. खुद्द जवाहरलालजी लिहण्याच्या ओघांत आपला व्यक्तीगत ध्येयवाद अंतराळाला नेवून भिडवितातच, पण त्याशिवाय वाचकांनाहि तें अुच्च पातळीवरुन विचार करावयास लावितात. " हिंदुस्थान व जग " असल्या राजकीय लेखांपासून तो " भाषेच्या प्रश्ना " सारख्या निबंधापर्यंत व " अिंदिरेस लिहलेल्या पत्रापासून तो " रस्त्यांतील प्रसंगा " सारख्या प्रासंगिक लेखापर्यंत जवाहरलालजींच्या प्रत्येक लिखाणांत ही गोष्ट प्रकर्षानें दिसून येते. असो.

प्रस्तुत लेखसंग्रह प्रकाशांत आणण्याचें भाग्य मला लाभलें असलें तरी त्याच्यामागें अनेकांची सक्रीय सहानुभूती व जिव्हाळा आहे. विशेषतः सौ. अिंदिरा गांधी (नेहरु) यांनीं आपल्या माननीय पित्याची तें स्थानबद्ध असतांहि अनुवादनास परवानगी मिळवून देण्याकरितां जे श्रम घेतले, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. मुखपृष्ठावरील जवाहरलालजींचे सुंदर चित्र काढून दिल्याबद्दल सौ. सुलोचनाबाअी सबनीस व चित्रावरील सुबक अक्षरें काढल्याबद्दल श्री. सुदाम हवालदार यांचेहि कृतज्ञतापूर्वक आभार मानणें अगत्याचें आहे.

याशिवाय श्री. अेस्. बी. चिटणीस, श्री व्ही जी. सबनीस, श्री आर.अेम.माणगांवकर, श्री. सर्जेराव पाटील, श्री. माधव कामत, श्री. वालचंद श्रीश्रीमाळ, श्री.संतराम पाटील, श्री. डी. आर सुधाळे, श्री. अ. कृ. ओगले, विशेषतः प्रकाशनाचें जबाबदारीचें काम धडाडीनें अंगावर घेअून तें पार पाडल्याबद्दल श्री. बाबा अिनामदार व पुस्तकाची छपाअी आस्थापूर्वक केल्याबद्दल निर्मल प्रेसचे श्री. भा. रा. महागांवकर व निर्मल प्रेसमधील अुत्साही कामगारवर्ग यांचाहि मी आभारपूर्वक अुल्लेख करतो.

याच सहानुभूतीच्या व जिव्हाळ्याच्या पाठिंब्यावर मी लवकरच जवाहरलालजींच्या लेखांचा द्वितीय संग्रह वाचकांना सादर करण्याची आकांक्षा बाळगत आहे.

कोल्हापूर, ता. १४ नोव्हेंबर १९४४ — आपला नम्र,

जवाहरलाल जन्म दिन — **शंकर लक्ष्मण चिटणीस**

हिंदुस्थान व जग

एकामागून एक येणारे आणिबाणीचे प्रसंग व त्याचप्रमाणें अंतर्गत अशांतता यामुळें पाश्चात्य देशांना हिंदुस्थानचा विचार करण्यास फारशी सवड न मिळाली तर त्यांत आश्चर्य नाहीं. कांहीं पाश्चात्य लोकांना हिंदुस्थानच्या वैभवशाली गतकाळाचें आकर्षण वाटते. येथील प्राचीन संस्कृतीबद्दल ते गौरवानें बोलतात. बरेंच लोक असे आहेत कीं, त्यांना स्वातंत्र्याकरितां झगडणाऱ्या हिंदी लोकांबद्दल मनापासून सहानुभूती वाटते. याशिवाय आणखी एक वर्ग असा आहे कीं, त्याला हिंदुस्थानसारख्या एका महान राष्ट्राची साम्राज्य सत्तेनें पिळवणूक करावी व त्यावर पाशवी दडपशाही गाजवावी ही गोष्ट मानवधर्माच्या दृष्टीनें निषेधार्ह वाटते. हे सर्व लोक सोडले तर इतर पाश्चात लोक मात्र हिंदुस्थानांतील परिस्थितीबद्दल अज्ञानांधःकारांत वावरत असतात, बिचाऱ्यांना आपल्यासमोरील अडचणींना तोंड देतां देतां पुरेवाट झालेली असते, मग त्यांत इतर नसत्या व्यापांची भर कशाला ?

पण एकंदरींत पाहिलें तर असें दिसून येईल कीं, आधुनिक जगांतील राजकारण इतकें गुंतागुतीचें झालें आहे कीं, त्यांत घडणाऱ्या प्रत्यहि विविध घटना एकमेकांपासून विभक्त करतां येत नाहींत. जागतिक राजकारणांत लक्ष घालणाऱ्या कोणाहि माणसाला हें सहज पटतें. कोणतीहि घटना घ्या, इतर

घटना टाळून तीच विलगरित्यां सोडविण्याचा प्रयत्न यशस्वी होणें शक्य नाहीं. सध्यांचें जागतिक प्रश्न म्हणजे एक जाळेंच. तें सोडविण्याचा प्रयत्न करूं लागलो तर शेवटीं आपल्याला असें आढळून येईल कीं, हे प्रश्न म्हणजे विविध अंगांचा मूलतः असा एकच प्रश्न होय. पूर्व आफ्रिकेच्या वाळवंटांत किंवा ओसाड मैदानांत घडणारी घटना पण तिचा प्रतिध्वनि दूरदूरच्या देशांतील अधिकारी गोटांत उमटतो व तिची भीषण छाया यूरोपवर पडते. पूर्व सैबिरियांत झाडली गेलेली एकच गोळी पण तीमुळें साऱ्या जगाचा भडका उडणें अशक्य नाहीं. आज यूरोपला अनेक अवघड प्रश्न भेडसावीत आहेत, पण परिस्थितीचें तारतम्य ज्ञान असलेला भावी इतिहासकार मात्र आज चीन व हिंदुस्थान हेंच सर्वांत महत्वाचे प्रश्न असून, जगाच्या भावी इतिहासाला वळण लाविण्याचें कार्य बव्हंशी त्यांनींच केलें, असें मत नमूद करणें संभवनीय आहे. हिंदुस्थान व चीन हे प्रामुख्यानें जागतिक प्रश्न आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें किंवा त्यांचें महत्व कमी करणें म्हणजे जागतिक कालप्रवाहाचें भयंकर अज्ञान प्रदर्शित करण्यासारखेंच नसून आज आपण सर्व ज्या मुलभूत रोगानें जर्जर झालों आहोंत तो समजावून घेण्यांत संपूर्णतः अपेशी ठरण्यासारखे आहे.

हिंदुस्थानपुढें आज जो प्रश्न उभा आहे, तो वर्तमानकाळाचा. हिंदुस्थानच्या गतेतिहासाबद्दल आदर दाखविला काय किंवा अनादर दाखविला काय त्याचा फारसा उपयोग नाहीं, वर्तमानकाल समजावून घेण्याच्या दृष्टीनें त्याचा जो काय उपयोग होईल तेवढाच. आपण हें ओळखलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांत झालेल्या कोणत्याहि मोठ्या घडामोडीचा परिणाम बाहेरील जगावर होईल व आपण कोठेंहि रहात असलो व कोणत्याहि वंशाचें वा पक्षाचे असलो तरी त्यांतून अलिप्त राहूं शकणार नाहीं. या व्यापक दृष्टीकोनांतून व

आपल्यासमोर उभ्या असलेल्या निकटच्या प्रश्नांचा एक भाग म्हणून आपण या घडामोडीचा विचार केला पाहिजे.

गेलीं दीडशें वर्षे हिंदुस्थानवर ब्रिटनची जी सत्ता आहे त्यामुळें ब्रिटनच्या परराष्ट्रीय व अंतर्गत धोरणावर मूलभूत परिणाम झाला आहे, हें प्रसिद्धच आहे; औद्योगिक क्रांतीच्या आरंभीच्या काळांत, इंग्लंडनें आपले मोठमोठे धंदे उभारण्याकरितां लागणारे भांडवल हिंदुस्थानांतील संपत्ती लुटून नेऊन उभारलें व पुढें हिंदुस्थानचा, इंग्लंडला पक्क्या मालाची बाजारपेठ म्हणून उपयोग होऊं लागला, नेपोलियनकालीन युद्धें व त्याचप्रमाणें क्रिमीयन युद्धांत हिंदुस्थान सदैव पार्श्वभूमीला असल्यासारखा दिसतो. हिंदुस्थानचे जलमार्ग सुरक्षित राखण्याकरितां म्हणूनच इंग्लंडला इजिप्त वगैरे मध्य पूर्वेकडील देशांत ढवळाढवळ करावी लागली. युद्धोत्तर कालांतहि हें धोरण चालू असून इंग्लंड या जलमार्गांना घोरपडीप्रमाणें चिकटून आहे. महायुद्ध संपल्यानंतर तर ब्रिटिश मुत्सद्यांच्या डोळ्यांसमोर कॉन्स्टंटीनोपलपासून हिंदुस्थानपर्यंत विस्तृत मध्यपूर्व साम्राज्य स्थापन केल्याचें भव्य स्वप्न तरळूं लागले होतें. पण सोव्हिएट रशिया, केमालपाशा, इराणचा रेझाशहा, अफगाणिस्थानच्या अमानुल्लाचा उदय व सिरीयावरील फ्रेंचांचा अंमल यामुळें हें स्वप्न लोपून गेलें. अर्थात ही मध्यपूर्व साम्राज्याची भव्य कल्पना जरी सत्य सृष्टींत उतरली नाहीं तरीसुद्धां, हिंदुस्थानच्या खुष्कीच्या मार्गावर इंग्लंड बराचसा ताबा राखूं शकले व त्यामुळें मोसूलच्या बाबतींत इंग्लंडचे तुर्कस्थानबरोबर वितुष्ट आलें. इंग्लंडनें राष्ट्रसंघांत ॲबिसिनीयाचा आकस्मिक कैवार घेतला, याच्या बुडाशीं हेंच धोरण होतें. याउलट मँचुरियांत राष्ट्रसंघ धाब्यावर बसविला जात असतांना मात्र इंग्लंडच्या नैतिक प्रवृत्ति इतक्या उचंबळून आल्या नाहींत, हे लक्षांत घेण्याजोगें आहे.

एकंदरीत विचार केला तर जागतिक प्रश्न म्हणजे साम्राज्यशाहीचा- आजच्या आर्थिक साम्राज्यशाहीचा– आहे. यूरोप व त्याचप्रमाणें इतरत्र फॅसिझमचा उदय म्हणजे या प्रश्नाचें एक महत्वाचें अंग आहे. त्याचप्रमाणें रशियाचा उदयहि लक्षांत घेण्याजोगा आहे. मूलतःच कट्टर साम्राज्यशाही विरोधी अशी नवीन समाजरचना तेथें अस्तित्वांत असून रशियाचें सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत आहे. आज यूरोपमध्यें फॅसिस्ट व फॅसिस्टविरोधी असें दोन उघड तट पडले आहेत. हे तट म्हणजे साम्राज्यशाहीचा नवीन पुरोगामी शक्तीशी जो लढा होणार आहे त्याचे द्योतक होत. वसाहती व अंकित राष्ट्रांत याच लढ्याचें रुपांतर, स्वातंत्र्याकरितां झगडणाऱ्या राष्ट्रीय चळवळींत होतें, हळूं हळूं या चळवळीवर वाढत्या सामाजिक प्रश्नांची छाया पडत जाऊन, तिला निराळें वळण लागत जातें. याउलट अंकित राष्ट्रांत साम्राज्यशाही वाढत्या प्रमाणांत फॅसिस्ट मार्गाचा अवलंब करते. उदाहरणार्थ, इंग्लंड अंतर्गत राज्य-कारभारांत लोकशाही घटनेवर जोर देत असले तरी हिंदुस्थानांत मात्र फॅसिस्ट वृत्तीनें वागत असतें.

साम्राज्यशाही आघाडींत कोठेंहि खिंडार पडो त्याची प्रतिक्रिया जग-भर होणार, हे स्पष्ट आहे. यूरोपमध्यें काय किंवा इतरत्र काय फॅसिझमचा विजय होणें म्हणजे साम्राज्यशाहीला बळकटी येणें; या विजयाची प्रतिक्रिया सगळीकडे होते. याउलट फॅसिझमची पिच्छेहाट झाली कीं, साम्राज्यशाही तेवढ्या प्रमाणांत कमजोर होते. त्याचप्रमाणें वसाहत किंवा अंकित राष्ट्रांतील स्वातंत्र्य चळवळीचा विजय म्हणजे साम्राज्यशाही व फॅसिझमला तडाखा. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळीबद्दल नाझी पुढारी नापसंति व्यक्त करून येथे ब्रिटीश वर्चस्व चालू रहाण्याला मान्यता कां देतात, हें यावरून सहज कळून येतें. मूलभूत दृष्टीनें विचार केला तर हा प्रश्न अगदीं सोपा आहे.

पण निरनिराळ्या जागतिक प्रवाहांच्या गुंतागुंतीच्या राजकारणांत तो कधीं कधीं फार गुंतागुंतीचा होतो. उदाहरणार्थ, दोन साम्राज्यशाही राष्ट्रें युद्धाला उभी राहातात आणि दोघेहि जरूरीप्रमाणें शत्रुच्या अंकित देशांतील राष्ट्रीय किंवा फॅसिस्ट विरोधी प्रवृत्तींना चेतविण्याचा प्रयत्न करतात. या गुंतागुंतीतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे क्षणिक अनुकूलता मिळवून देणाऱ्या संधिसाधू प्रवृत्तीकडे वहावत न जातां मूलभूत अंगाचा विचार करणें हा होय. नाहींतर क्षणिक अनुकूलता म्हणजे पुढें अतिशय घातकीं आणि एक नसतां भार ठरण्याचाच संभव फार.

ऐतिहासिकदृष्ट्यां व त्याचप्रमाणें महत्वाच्या दृष्टीनें पाहिलें तर हिंदुस्थान म्हणजे आधुनिक साम्राज्यशाहीचें अभिजात उदाहरण असल्याचें दिसून येईल. हिंदुस्थानावरील साम्राज्यशाही पकडीला थोडासा जरी धक्का मिळाला तरी त्याचे जागतिक घडामोडीवर दूरगामी परिणाम होतील, ब्रिटनच्या जागतिक स्थानांत त्यामुळें मोठा फरक होईल, इतर अंकित राष्ट्रांतील स्वातंत्र्य लढ्यांना मोठी चालना मिळेल व पर्यायानें ब्रिटनच्याच नव्हे तर इतर देशांतील साम्राज्यशाहींना हादरा बसेल; आंतरराष्ट्रीय घडामोडींत हिंदुस्थान दिवसेंदिवस अधिकाधिक भाग घेऊं लागेल. हिंदुस्थानची भूमिका जागतिक शांततेला पूरक व साम्राज्यशाही व तिच्या शाखांना खास विरोधी असेल.

कांहीं लोकांना वाटतें कीं कॅनडा किंवा ऑस्ट्रेलियाप्रमाणें हिंदुस्थानला ब्रिटीश राष्ट्रगटांत वसाहत म्हणून राहतां येईल. ही कल्पना हास्यास्पद आहे. सध्यां अस्तित्वांत असलेल्या वसाहतींचा ब्रिटनबरोबर कितीतरी प्रकारचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. पण ब्रिटनबरोबर आर्थिक प्रश्नांवर विरोध येतांच, याच वसाहतीं ब्रिटनपासून दुरावूं लागल्या आहेत. आयर्लंड (कांहींशा ऐतिहासिक कारणांकरितां म्हणूनहि) व दक्षिण आफ्रिका सर्वांत अधिक दूरा-

वले गेले आहेत. हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्यें नैसर्गिक दुवे फारसें नाहींत. याउलट या दोन्ही देशांत ऐतिहासिकदृष्ट्या वाढतां विरोध दिसून येतो. साम्राज्यांतलि बऱ्याच भागांत अंकित प्रजाजनांना वाईट तऱ्हेनें वागविण्यांत येतें, हिंदी लोकांना जिथें तिथें मज्जाव करण्याचें धोरण तर दिसूनच येतें. या सर्वांपेक्षांहि महत्वाची गोष्ट म्हणजे आर्थिक हितसंबंधांत निर्माण झालेला विरोध. जोपर्यंत हिंदुस्थानवर ब्रिटीश सरकारचें वर्चस्व आहे, तोंपर्यंत या विरोधाचा निकाल ब्रिटीशांच्या बाजूनें दिला जाईल, पण ज्यावेळीं हिंदुस्थान ही इतर वसाहतीप्रमाणें खरीखुरी वसाहत होईल, तेव्हां दोघेहि निरनिराळ्या दिशेनें जाण्याचा प्रयत्न करतील, इतकेंच नव्हे तर तोपर्यंत सध्यांची भांडवलशाही व्यवस्था अस्तित्वांत राहिली तर दोघांमधील झगडा अपरिहार्य आहे. या प्रश्नाची आणखी एक उद्‌बोधक बाजू आहे. लोकसंख्या व खनीज संपत्ति या सर्वच दृष्टीनें हिंदुस्थान हा आज ब्रिटीश साम्राज्यांतलि सर्वांत महत्वाचा देश आहे. साम्राज्याकडून पिळला जाणारा हा देश म्हणजे साम्राज्यशाहीची बादशाही झालरच होय. पण ब्रिटीश राष्ट्रगटांत हिंदुस्थानला स्वतंत्र वसाहत म्हणून स्थान मिळालें तर तो सदर गटांचा मध्यबिंदू बनेल, साम्राज्याचें मुख्य केंद्र म्हणून लंडनला असलेलें महत्व कमी होऊन हें महत्व कदाचित दिल्लीकडे येईल, हिंदुस्थानचा हा दर्जा, इंग्लंड व गोऱ्या वसाहतींना असह्यच होईल. हिंदुस्थानच्या हातांत सर्व सूत्रें जाण्यापेक्षां तो या गटाबाहेर स्वतंत्र पण मित्र म्हणून राहणेंच त्यांना अधिक ग्राह्य वाटेल.

यावरून दिसून येईल कीं संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय हिंदुस्थानला तरणोपाय नाहीं. हिंदुस्थान पुरेसा समर्थ होतांच किंवा जागतिक हालचालींचीं पावलें झपाट्यानें पडूं लागली तर हिंदुस्थान संपूर्ण स्वतंत्र होईल. हें स्वातंत्र्य कशा प्रकारचें असेल ? त्याच्याबरोबर—निदान मागोमाग— सामाजिक स्वातंत्र्य

व नवीन आर्थिक रचना येईल कीं नाहीं,हें सांगणें कठीण आहे.बऱ्याच गोष्टीं-वर त्या अवलंबून आहेत. जागतिक अवस्थांतरांचा (crises)परिणामहि होणेंहि अपरिहार्य आहे. या अवस्थांतरांत आमचें स्वातंत्र्य लवकर मिळू शकेल किंवा लांबणीवर पडेल,हें जितकें खरें तितकेंच त्यामुळें आपल्या लढ्यांतील सामाजिक चळवळीला त्यामुळें घडण मिळणें अपरिहार्य आहे. याउलट राजकीय स्वातंत्र्य जितकें लांबणीवर पडेल तितकें सामाजिक प्रश्नांना अधिक महत्व येईल, नव्हे आजहि हिंदुस्थानांत त्यांना महत्व प्राप्त झालें आहे. आज आर्थिक परिस्थिती व त्याचप्रमाणें सोव्हिएट रशियाचें यशस्वी उदाहरण यामुळें या प्रश्नाला जोराची चालना मिळाली आहे.

खरेंच, हिंदुस्थानला स्वातंत्र्य केव्हां मिळेल ? सांगणें अवघड आहे. आज जग झपाट्यानें पुढें जात असून एकामागून एक आणिबाणीचें प्रसंग उद्‌भवत आहेत. यामुळें पुष्कळ लोकांना वाटतें त्यापेक्षांहि ब्रिटीश साम्राज्य लवकर खिळखिळें होणें अशक्य नाहीं. सोळा वर्षांपूर्वीं गांधीजींनीं हिंदी राष्ट्रीय चळवळीचें नेतृत स्वीकारल्यापासून या चळवळीनें चांगलेंच प्रचंड स्वरुप धारण केलें आहें. त्यांच्या स्फूर्तिदायक नेतृत्वाखाली, लाखों लोक एकजुटीनें स्वातंत्र्याकारितां त्याग करावयास सिद्ध झालें आहेत. गेल्या सोळा वर्षांत या चळवळींत अनेक चढउतार आले, पण एकंदरींत स्वातंत्र्य चळवळीची ही सरितां अखंडपणें वहात आहे. विशेषतः १९२०–२२, १९३०-३१, १९३२–३४ या तिन्ही प्रसंगी तर या चळवळीला असहकारिता व कायदेभंगाचें जबरदस्त स्वरुप आलें व हिंदुस्थानांतील ब्रिटीश साम्राज्याची सर्व रचनाच मुळीं डळमळली. या तिन्हीं चळवळीबाबत ब्रिटीशांत जी प्रतिक्रिया झाली, त्यावरून त्यांचें सामर्थ्य अजमावता येतें. या चळवळीं दडपून टाकण्यासाठीं फॅसिझमला शोभेल अशी दडपशाही करण्यांत आली. नागरिक

हक्क व वृत्तपत्रांची गळेचेपी होऊन सभा व्याख्यांनाना मज्जाव करण्यांत आला. पैसाअडका, तसेंच जमीनजुमला व घरेंदारें जप्त करण्यांत आली. शाळा-कॉलेजें, विद्यापिठें, दवाखानें, बालसंस्था, सामाजिक संस्था यांना बंदी करण्यांत आली. राजकीय व मजूर संस्थांवर सरकारचा अर्थात दांत होताच; हजारों स्त्रीपुरुषांना तुरुंगांत पाठविण्यांत आलें, आणि राजकीय कैदी वगैरेंना अमानुषरित्यां फटकें मारून क्रूरपणें वागाविण्यांत आलें. याउलट राष्ट्रीय चळवळींत दुही निर्माण करण्याचाहि प्रयत्न झाला; अल्पसंख्यांक गटांना लांच-लुचपत व अमिष या वाटें वश करून ब्रिटीश सत्तेमार्गे देशांतील सरंजामी प्रतिगामी अशा एकांड्या शिलेदारांना गोळा करण्यांत आलें, या सर्व प्रतिगामी लोकांची मोट बांधण्याचा दृश्य प्रयत्न म्हणजेच लंडनमधील गोलमेज परिषद व या परिषदेची फलश्रुति म्हणजे ब्रिटीश सरकारनें पास केलेला नवीन घटना कायदा. वस्तुतः हा कायदा म्हणजे ब्रिटीश साम्राज्यशाहीची पक्कड अधिक घट्ट करणारा असून, त्यामुळें देशांतील प्रतिगामी घटकांना विशेष महत्व येणार आहे.

मध्यंतरी नवीन नवीन सामाजिक प्रवाहांना हिंदुस्थानांत जोर आला. समाजसत्तावाद व मार्क्सिस्ट विचारसरणीचा कामगारवर्ग व राष्ट्रीय सभेंत फैलाव झाला. सध्यां सोशालिस्ट पक्ष कॉंग्रेसमधील एक महत्वाचा अल्पसंख्यांक गट असून, त्याचें वजन दिवसेंदिवस वाढत आहे. समाजसत्तावादी विचार-सरणीमुळें कॉंग्रेसमध्यें विवक्षीत तट पडले असून जसजसा काळ लोटत जाईल तसतशीं ही वैचारिक दुफळी वाढत जाईल असें दिसतें. पण एकंदरींत पहातां कॉंग्रेस म्हणजे ब्रिटीश साम्राज्यशाही विरुद्ध अनेक गटांनीं निर्माण केलेली संयुक्त आघाडीच Front populaire होय. याउलट कॉंग्रेसला विरोध करण्या-करितां साम्राज्यशाही बरोबर देशांतील प्रतिगामी व सरंजामी विभागांनीं एक

जूट केली आहे. यूरोपांतील फॅसिस्ट व फॅसिस्टविरोधी गटांप्रमाणें हे गट आहेत. या दोन मुख्य गटांमध्यें इतर लोकांचे लहानसहान गट आहेत. या गटांची सहानुभूति राष्ट्रीय चळवळीकडे असली तरी साधारणतः त्यांची वृत्ति धरसोडीचीच आहे.

सध्यां हिंदुस्थानांतील परिस्थिती गुंतागुंतीची असल्याचें दिसतें. देश आतां कोठें गेल्या कायदेभंगाच्या चळवळीच्या दिव्यांतून सांवरत आहे आणि अशा कालांत थोडाफार गोंधळ उडणें अपरिहार्य आहे. या कालांत नवीन विचारसरणीला वाव मिळतो. पुष्कळ लोक तिचा ताबडतोब स्वीकार करतात तर कांहींजण तीमुळें घाबरतात. आज कायदेभंगाची चळवळ चालू नाहीं व परिस्थितिहि खूप निवळलेली आहे, पण सरकारची भयंकर दडपशाही मात्र चालूच आहे; नागरिक हक्कांची अद्यापहि गळचेपी केली जाते, कम्युनिझम चिरडून टाकण्याच्या नांवाखालीं, कामगार चळवळीवर शस्त्र उगारण्यांत आलें आहे. अनेक कामगार संस्था बेकायदा ठरविण्यांत आल्या असून कामगार पुढाऱ्यांची तुरुंगांत रवानगी केली जात आहे; आणि दहशतवाद दडपून टाकण्याच्या सबबीवर कांहीं प्रांतांत राजकीय कार्यालाच खीळ घालण्यांत आली आहे. महत्वाच्या अशा बऱ्याच राजकीय व कामगार संस्थांवरील बंदी कायमच आहे. मध्यवर्ति कायदेमंडळानें नुकताच फेटाळून लाविलेला कायदा व्हाईसरॉयांनीं आपल्या जादा अधिकारांत पास केला आहे. या कायद्यामुळें, सरकारी अधिकारी व पोलीस यांना अमर्याद अधिकार मिळाले असून, त्यांच्या जोरावर त्यांना सर्व तऱ्हेचें नागरिक स्वातंत्र्य व सार्वजनिक चळवळींची गळचेपी करतां येईल. हजारों लोकांना चौकशीविना तुरुंगांत कायमचे डांबून ठेवण्यांत आले असून, इतर असंख्य लोकांना राजद्रोह व राजकीय आरोपावरून तुरुंगांत रवाना करण्यांत येत आहे. निवळलेल्या परिस्थितींतहि ब्रिटिशांची राजवट कशी चालू

असतें, याचें हें जसें उदाहरण आहे, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील स्वातंत्र्य चळवळीच्या वाढत्या सामर्थ्याचें व या चळवळीला ब्रिटीश सरकार किती घाबरतें याचेंहि तें द्योतक आहे. ब्रिटीश सरकार सध्यां भीतिग्रस्त झालें आहे. आणि घाबरलेलें सरकार नेहमींच विचित्रपणें व मोकाटपणें वागतें, असा अनुभव आहे.

ब्रिटीश सरकारला स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यांत यश येणार नाहीं, हें अर्थात स्पष्ट आहे, फार तर राष्ट्र दमलेलें असतांना या चळवळीला तात्पुरतां पायबंद घालतां येईल. त्याचप्रमाणेंच दुसरीहि गोष्ट स्पष्ट झाली आहे कीं, नवीन घटना कायद्यामुळें देशांतील सर्व कर्ते पक्ष असंतुष्ट व प्रक्षुब्ध झाले असून तें सदर कायद्याला कधींच मान तुकविणार नाहींत. हिंदुस्थानांतील सत्तेविरुद्ध पूर्वीं कधींहि नव्हता येवढा तिरस्कार व वैरभाव आज निर्माण झाला आहे. गांधीजी आज प्रत्यक्ष राजकारणापासून अलिप्त आहेत. पण ते आजहि सर्वांत प्रभावी व वजनदार पुढारी आहेत व पुढेंहि असतील. लाखों लोकांना हालवून सोडण्याचें सामर्थ्य गांधीजींच्या ठिकाणीं असून, निर्वाणीच्या वेळीं ते पुन्हां राजकारणांत प्रवेश करणें अशक्य नाहीं. हिंदी-राजकारणांत गांधीजी मागें पडलें आहेत, असें समजणें सर्वांत मोठी चूक ठरेल. हिंदुस्थानांत आज निरनिराळ्या विचारसरणीचा झगडा व निरनिराळ्या दिशेनें देशाला ओढण्याचा प्रयत्न चालू आहे. क्रांतिकारक अवस्थेतून जात असलेल्या हिंदुस्थानसारख्या मोठ्या देशांत, ही गोष्ट अर्थातच स्वाभाविक आहे. पण ज्या वर्गांना ब्रिटीश साम्राज्यशाहीपासून फायदा होतो किंवा जे वर्ग या साम्राज्यशाहीनेंच निर्माण केले आहेत, त्यांच्याशिवाय, बाकीच्यांत ब्रिटिश साम्राज्यशाहीला विरोध करण्याबाबत एकवाक्यता आहे. नजीकच्या काळांत हिंदुस्थानांत मोठें वादळ होऊन आपण स्वातंत्र्य संपादन करूं याबद्दल मला मुळींच शंका नाहीं.

आज सर्व जगभर, राजकीय व आर्थिक झगड्याखालीं आध्यात्मिक अवस्थांतरहि (Crisis) सुरु आहे. जुनी परिमाणें व समजुती याबद्दल शंका प्रदर्शित केल्या जात असून, या जाळ्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्यांत येत आहे. हिंदुस्थानांतहि इतर देशांपेक्षां कदाचित अधिक प्रमाणांतच आध्यात्मिक अवस्थांतर आढळून येतें. याचें कारण हिंदी संस्कृतीचीं मुळें या पुरातन भूमींत खोलवर जाऊन रुजली आहेत. एका बाजूला भविष्यकाळ आवाहन देत आहे तर दुसऱ्या बाजूला भूतकाळ पाठीमागें खेचीत आहे. आजचे प्रश्न पुरातन संस्कृति सोडवूं शकत नाहीं; भांडवलशाही पाश्चात्य राष्ट्रें एकोणीसाव्या शतकांत वैभवानें चमकलीं, पण आज त्यांचा भपका नाहींसा झाला असून, तीं स्वतःच निर्माण केलेल्या विसंगतींच्या अविमोच्य जाळ्यांत सांपडलीं आहेत. याउलट सोव्हिएट रशियांत जी नवीन भौतिक सुधारणा उभारली जात आहे, ती जगाचें लक्ष वेधून घेत आहे. या सुधारणेंत दोष नाहींत असें नाहीं, पण हे दोष असूनहि ती आशेचा संदेश देत आहे. जागतिक शांतता व लाखों लोकांचें दुःख व पिळवणूक तीमुळें नष्ट होईल, अशी आशा निर्माण झाली आहे. हिंदुस्थान आपला आध्यात्मिक अवस्थांतराचा (Crisis) प्रश्न सोडविण्याकरितां रशियाच्या नव्या समाजरचनेकडे वळेलहि. पण तसें करतांना, आपला विवक्षीत मार्गच अनुसरेल. हिंदी जनतेच्या परंपरेला अनुरूप असा फरक या समाजरचनेंत केला जाईल.

वेंद्रदी, पॅरीस, १९३६.

विद्यार्थी व राजकारण

सध्यां हिंदुस्थानची परिस्थिती मोठी चमत्कारिक झाली आहे. मनाला थक्क करणारे प्रश्न आज येथें अुपस्थित केले जातात. स्वातंत्र्य हिंदुस्थानच्या दृष्टीनें वाअीट, स्वातंत्र्यापेक्षां कमी अशी अेकादी घटना वस्तुतः स्वातंत्र्यापेक्षां अधिक चांगली, असें म्हणण्यापर्यंत कांहींची मजल गेली आहे. मी अर्थात गूढवादी प्रवृत्तीचा नसल्यामुळें मला हे गहन विचार अुमगत नाहींत. अशाच गहन विचारांपैकीं अेक म्हणजे विद्यार्थी व राजकारण यासंबंधीचा होय. विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घेतां कामा नये, असें कांहीं लोक म्हणतात. राजकारण म्हणजे काय ? हिंदुस्थानांतील नेहमींच्या व्याख्येप्रमाणें (अर्थात सरकारी) सरकारला कोणत्याहि रीतीनें मदत करणें किंवा पाठिंबा देणें म्हणजे राजकारण होत नाहीं. पण हिंदुस्थानांतील प्रचलीत राज्यव्यवस्थेवर टीका करणें किंवा तीविरुद्ध चळवळ करणें या गोष्टी राजकारणांत येतात.

आणि विद्यार्थी म्हणजे कोण ? विद्यार्थ्यांत जशीं प्राथमिक शाळांतील लहान मुलें येतात, त्याचप्रमाणें कॉलेजमधील तरुणतरुणीहि येतात. अर्थात दोघांच्या बाबतींत तोच नियम लागू करणें शक्य नाहीं, हें अुघड आहे.

पुष्कळ प्रौढ विद्यार्थ्यांना आगामी प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकींत मतदानाचा हक्क मिळाला आहे. अर्थात मत देणें म्हणजे राजकारणांत भाग घेणेंच होय; समजून मत द्यावयाचे म्हणजे राजकारणाची माहिती असावी लागते; राजकारणाची माहिती झाली कीं, त्याचें पर्यवसान कोणतें तरी राज-

कीय धोरण स्वीकारण्यांत होतें; आणि अेकाद्या नागरिकानें विवक्षीत धोरण स्वीकारलें कीं त्याचा पुरस्कार करणें व त्या धोरणाकडे अितरांना वळविण्याचा प्रयत्न करणें हें त्याचें कर्तव्यच ठरतें. अशा रीतीनें मतदार हा अपरिहार्यरित्यां राजकारणी असला पाहिजे. अेवढेंच नव्हे तर कोणताहि अुत्साही नागरिक हा कळकळीचा राजकीय कार्यकर्ता बनणें स्वाभाविक आहे. ज्यांच्यामध्यें राजकीय किंवा सामाजिक संवेदना नसतात, असेच लोक निष्क्रीय, तटस्थ किंवा अुदासीन राहूं शकतात.

मतदार या नात्यानें येणारी जबाबदारी सोडली तर, योग्य शिक्षण संपादन केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला, जीवन व जीवनांतील विविध प्रश्न यांना तोंड देण्याकरितां तयारी करणें अर्थात आवश्यक आहे. या तयारीभावी शिक्षण म्हणजे निरर्थक कालक्षेपच. राजकारण व अर्थशास्त्र यांचा जीवनाशीं संबंध आहे व ज्याला त्यांचा अुमज पडत नाहीं त्याचें शिक्षण योग्य रीतीनें झालें असें म्हणता येत नाहीं. कदाचित जीवनाच्या झाडाझुडपांतून बहुतेक लोकांना आपला मार्ग स्वच्छ रीतीनें काढणें कठीण जात असेल. पण आपल्याला अेकाद्या प्रश्नाचें अुत्तर माहित असो वा नसो पण निदान त्याचें स्वरूप तरी कळलें पाहिजे. जीवन आपल्यापुढें कोणते प्रश्न अुभे करतें ? अुत्तर देणें कठीण आहे. पण चमत्कारीक गोष्ट ही कीं खरे प्रश्न कोणते हें समजावून घेण्यापूर्वींच लोक त्यांचीं अुत्तर देअूं अिच्छितात. कोणत्याहि प्रामाणिक किंवा विचारी विद्यार्थ्याला असा वायफळ दृष्टीकोन पत्करून चालणार नाहीं.

आजच्या जगांत निर्माण झालेले राष्ट्रवाद, अुदारमतवाद, समाजसत्तावाद, साम्यवाद, साम्राज्यवाद, फॅसिझम वगैरे निरनिराळे वाद म्हणजे या प्रश्नांना विविध गटांनीं अुत्तर देण्याचा चालविलेला प्रयत्नच होय. त्यांतील कोणतें अुत्तर बरोबर आहे ? कीं सर्वच अुत्तरें चुकीचीं आहेत ? कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी आपल्याला कोणता तरी मार्ग पसंत हा केलाच पाहिजे. या मार्गाची आपल्याला माहिती असणें जितके आवश्यक तितकाच तो बिनचूक रीतीनें पसंत करण्याची पात्रता आपल्या अंगी असली पाहिजे. पण विचार व

कृतींचीं गळचेपी होऊं लागली तर ही गोष्ट शक्य नाहीं. तसेंच कोणी सत्ताधारी आमच्या डोक्यावर बसून स्वैर विचारांना पायबंद घालूं लागला तरीहि ती योग्य रीतींनें मूर्त स्वरूपांत येणें शक्य नाहीं.

यावरून सर्व विचारी लोकांनीं विशेषतः विद्यार्थ्यांनीं राजकारणांत तात्विक-दृष्ट्या संपूर्णतः भाग घेणें आवश्यक ठरतें. या प्रश्नांपासून फार दूर असलेल्या लहान विद्यार्थ्यांपेक्षां जीवनाच्या वेदीवर अुभ्या असलेल्या प्रौढ विद्यार्थ्यांच्या बाबतींत ही गोष्ट स्वाभाविकपणेंच अधिक समर्पकतेनें लागूं पडते. पण योग्य आकलन होण्याकरितां नुसती तात्विक अुपपत्तिच अुपयोगी नाहीं. तात्विक अुपपत्तिमागें आचरणाची जरूरी असते. केवळ अभ्यासाच्या दृष्टीनें विचार केला तरीहि विद्यार्थ्यांनें शाळेच्या ठराविक परीघांतून बाहेर जाअून आपलें शहर व त्याचप्रमाणें आजूबाजूचीं खेडीं, शेतवाड्या, कारखाने वगैरेंतील वस्तुस्थिति जाणण्याकरितां व जनतेच्या -- राजकारणासुद्धां -- निरनिराळ्या चळवळींत भाग घेण्याच्या दृष्टीनें पहाणी केली पाहिजे.

पण सामान्यतः प्रत्यक्ष आचरण व अभ्यास यांत भेद केलाच पाहिजे. विद्यार्थ्यांचें पहिलें कर्तव्य म्हणजे मन व शरीर यांची विचार, आकलन व आचरण यांच्या दृष्टीनें तयारी करणें. या तयारीशिवाय परिणामकारक विचार किंवा आचार शक्य नाहीं. अर्थात नुसता विद्वताप्रचुर अुपदेश ऐकून ही तयारी होत नाहीं, त्याकरितां कांहींतरी कृति करण्याची आवश्यकता असते. नेहमींच्या परिस्थितींत तात्विक शिक्षणापेक्षां कृतीला गौण स्थान देणें जरुरीचें असलें तरी ती सर्वस्वी टाळतां येत नाहीं, नाहींतर शिक्षणांत केव्हांहि अुणीव राहील.

या दृष्टीनें पाहिल्यास हिंदुस्थानांतील सध्यांची आमची शिक्षणपद्धति अजिबात चुकीची आहे, असें खेदानें म्हणावें लागतें. विशेष दुःखाची गोष्ट म्हणजे या पद्धतीवर असलेला हुकुमशाही वरचष्मा. शिक्षणक्षेत्रांतच नव्हे तर हिंदुस्थानांत प्रत्येक ठिकाणीं हीच तऱ्हा. झकपक पोषाख, भपकेदार, पण बहुधां पोकळ डोक्याचे असे हे अधिकारी लोकांना आपल्या ठराविक चाकोरींतून नेतात, अितकेंच नव्हे तर मानसिक विकास व विचारप्रसारालाहि प्रतिबंध

घालूं पहातात. क्रीडाक्षेत्रांतहि ही हुकूमशाही कशी धिंगाणा घालूं शकते, याचें अगदीं अलिकडचें अुदाहरण आपणांस पहावयास नुकतेंच मिळालें. अिंग्लंडला गेलेल्या आपल्या क्रिकेट संघांत अुत्कृष्ट खेळाडू होते. पण ज्यांना क्रिकेटची माहिती नव्हती, अशा लोकांकडे या संघाचें धुरीणत्व दिलें गेल्यामुळें तो अपेशी ठरला; हुकुमशाहीसाठीं कर्तबगारीचा बळी दिला गेला. आपल्या विद्यापीठांतून या हुकुमशाही वृत्तीचे थैमान चालूं असून शिस्तीच्या नांवाखालीं जे विद्यार्थी लाचारपणें वागत नाहींत अशांना चांगलेंच धारेवर धरलें जातें. स्वतंत्र देशांत धाडशी वृत्ति, अज्ञात प्रदेशांतील मोहिमा यांना प्रोत्साहन दिलें जातें, पण नेमक्या याच गोष्टीं आमच्या अधिकाऱ्यांना वावड्या. अशा स्थितींत ध्रुवावर व गौरीशंकरवर मोहिमा काढणारे, पंचमहाभूतांना जिंकून त्यांच्याकरवी, सेवा करून घेणारे किंवा माणसांतील अज्ञान, भितरेपणा, सुस्ती व न्यूनगंड यांची हकालपट्टी करून त्यांच्यांत गगनाला भिडणारा विशालपणा आणणारे स्त्रीपुरुष आमच्यांत निर्माण न झाले तर त्यांत नवल तें काय ?

खरंच, विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घेतलाच पाहिजे काय ? जीवन नाटकांत त्यांनीं भूमिका केलीच पाहिजे कां ? जीवनांतील विविध चळवळीकरितां त्यांनीं सर्वस्वी वाहून घेतले पाहिजे कीं, त्यांनीं केवळ वरिष्ठांच्या आज्ञा मानणारे कारकून बनलें पाहिजे ? विद्यार्थी या नात्यानें त्यांना राजकारणापासून अलिप्त राहता येत नाहीं, विशेषतः हिंदी विद्यार्थ्यांनीं तर राजकारणाशीं साहचर्य राखलें पाहिजे. अर्थात सामान्यतः विद्यार्थी या नात्यानें, मन व शरीर तयार करणें हें त्यांचें प्रथम कर्तव्य असलें पाहिजे, हें खरें आहे. त्यांनीं शिस्त पाळली पाहिजे, पण ही शिस्त मन किंवा अिच्छाशक्ती दाबून टाकणारी अशी असतां कामा नये.

ही झाली सामान्य काळांतील गोष्ट. पण सर्वसाधारण नियम झुगारून देणारे प्रसंग अनेक वेळां येतात. महायुद्धांत अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांतील विद्यार्थी कुठं होते ? कॉलेजांत खास नव्हे— ज्या ठिकाणी मृत्यू

समोर अुभा अशा खंदकांतील (Trenches) जीवन-मरणाच्या संग्रामांत ते गुंतले होते. आज स्पेनमधील विद्यार्थी कुठं आहेत ?

अंकित राष्ट्र कांहीं मर्यादेपर्यंत सदांच अनियमित परिस्थितींत वावरत असते. हिंदुस्थान आज अंकित आहे आणि आपल्यासमोरील प्रश्नांचा विचार करतांना आपण आपल्यासभोवारचें वातावरण व जगांतील वाढती खळबळ यांचाहि विचार केला पाहिजे. त्या सर्वांचें आकलन करून घेतल्यावर अेकच निष्कर्ष निघतो व तो म्हणजे जागतिक घटनांना वळण लावण्याच्या दृष्टीनें आपण थोड्या प्रमाणांत कां होअीना त्या घटनांत भाग घेतला पाहिजे.

स्टुडंटस ट्रिब्युन, लाहोर, १९३६.

बंदीशाळा

राजकारणाची दगदग व तुरुंगांतील यातना यामुळें मी खचून गेलो आहे, असे ऐका अिंग्लिश नियतकालिकांत ऐक लेखक म्हणतो. सदर लेखकाला ही माहिती कुठं मिळाली हें मला माहित नाहीं, पण मला माझ्या शरीराची व मनाची जी माहिती आहे त्यावरून मी ऐवढंच खात्रीपूर्वक सांगू शकतो, कीं माझें शरीर व मन हीं दोन्हीहि कणखर व निरोगी आहेत, व त्यांना नजीकच्या काळांत अपाय होण्याचा धोका नाहीं. शारिरीक आरोग्य व सुदृढतेला मी नेहमींच महत्व देत आलो आहे आणि अनेक वेळां माझ्याकडून प्रकृतीची जरी हेळसांड होते तरी मी आजारी न पडण्याची शक्यतों काळजी घेतो. मानसिक स्वास्थ्य अर्थात बव्हंशी न दिसून येणारी गोष्ट आहे, पण त्याबद्दलहि मी भरपूर काळजी घेत असतो. मी थोडसं अभिमानानं असंहि म्हणूं शकतो कीं, ज्यांना काँग्रेसचें धामधुमीचे राजकारण व तुरुंगांतील निष्क्रीय जीवन यांतून जाण्याची पाळी आली नाहीं, अशा अनेक लोकांपेक्षां माझें मन अधिक बळकट आहे.

पण माझें शारिरीक स्वास्थ किंवा अस्वास्थ्य अगदींच जुजबी गोष्ट. जरी माझ्या मित्रांनीं व नियतकालिकांनीं त्यांना नसतें महत्व दिलें असलें तरी, त्याबद्दल फारशी काळजी करण्याचें कारण नाहीं. राष्ट्रीय व सामाजिकदृष्टयां अधिक महत्वाची गोष्ट कोणती असेल तर ती हिंदुस्थानांतील जे असंख्य लोक तुरुंगांत जातात त्यांची शारिरीक व मानसिक स्थिति कशी राहते, ही होय. सुदृढ व निर्भय अशा व्यक्तीहि प्रदीर्घ कारागृहवास आणि स्थानबद्धता यामुळें खूपच

घाअीला येतात. कांहींचा तर त्यांतच शोचनीय अंत झाला आहे. माझ्या अत्यंत जवळच्या व आवडत्या मंडळींना तुरुंगांत यातना सोसाव्या लागल्या आहेत. तुरुंगांत गेलेल्या माझ्या मित्रांची यादी तयार केली तर ती लांबलचक व खेदजनक अशी होअील. जे. अेम सेनगुप्त यांचीच गोष्ट घ्या. सेनगुप्तांची व माझी ओळख पंचवीस वर्षांपूर्वी प्रथम केंब्रीज येथें झाली. सेनगुप्त आमचे अेक आवडते व प्रमुख सहकारी असून, आपल्या या दुर्दैवी देशांतील शूरांतील शूर असे होते. स्थानबद्धतेंतच त्यांचा अंत झाला.

सहकाऱ्यांना होणाऱ्या यातनामुळें दुःख व्हावं हें सहाजिकच आहे; तसेंच हालअपेष्टांत खितपत असलेल्या हजारों अज्ञात बांधवांपेक्षां माहितीच्या लोकांच्या यातनांची अधिक जाणीव असणें हेंहि क्रमप्राप्तच होय. पण या सहकाऱ्यांचें दुःख वेशीवर टांगण्याकरितां मी हा लेख लिहिलेला नाहीं. तुरुंगांतील गजाआड जाण्याचें व्रत आम्ही स्वेच्छेनें पत्करलें असल्यामुळें, तेथें आम्हांला मिळणाऱ्या वागणुकीबद्दल तक्रार करण्याची आमची अिच्छा नाहीं. आमच्या देशबांधवांपैकीं कोणाला हा प्रश्न आस्थापूर्वक अुपस्थित करण्याची अिच्छा असेल तर त्यांना आमची ना नाहीं. असे प्रश्न अुपस्थितहि केले जातात, पण ते सामान्यतः प्रसिद्ध अशा कांहीं व्यक्तीसंबंधीच असतात, अशा व्यक्तींचा सामाजिक दर्जा लक्षांत घेअून त्यांना विशेष सवलतीनें वागवावें, असें सुचविलें जातें. लोकांची ही ओरड बंद करण्यासाठीं मूठभर लोकांना 'अ', 'ब' वर्ग देण्यांत येतात; पण पंचाण्णव टक्क्यांहून अधिक अशा लोकांना कारागृहांतील शंभर टक्के यातनांना तोंड द्यावें लागतें.

तुरुंगांतील वर्गवारीवर नेहमीं टीका केली जाते व ती योग्यहि आहे. वैद्यकीय कारणांकरितां अशी वर्गवारी कांहीं मर्यादेपर्यंत समर्थनीय ठरेल. तुरुंगांतील वेगळ्या अन्नामुळें पुष्कळांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो आणि पुष्कळांच्या प्रकृतीवर असा परिणाम झालेलाहि आहे. तसेंच, तुरुंगांतील आत्यंतिक शारिरीक श्रम सहन करण्याची ताकदहि अनेकांत

नसते, हेंहि अुघड आहे. या अपवादात्मक गोष्टी सोडल्या तर, अितरांना तथाकथित अशा देण्यांत येणाऱ्या सवलती ' क ' वर्गांतील कैद्यांना कां नाकारण्यांत याव्यात, हेंच समजत नाहीं. ज्यांचा सामाजिक दर्जा मोठा किंवा रहाणीचें मान वरच्या दर्जाचें, त्यांना वरचा वर्ग देण्याची प्रथा आहे. मला वाटतें, जो मनुष्य अधिक सारा देतो, त्याला वरचा वर्ग देण्याची पद्धत आहे. यावरून असें समजावयाचें काय कीं, ज्यांचें अुत्पन्न अधिक त्याला आपल्या कुटुंबाविषयीं अधिक जिव्हाळा वाटतो ? व अशा माणसालाच अधिक मुलाखती व पत्रव्यवहाराची जरुरी आहे ? किंवा अशा माणसालाच लेखन-वाचनाच्या अधिक सवलती दिल्या पाहिजेत ? वस्तुतः जे साऱ्यादाखल मोठमोठ्या रकमा भरतात, ते बुध्दीमत्तेबद्दल बहुधा प्रसिद्ध नसतात असा अनुभव आहे.

अर्थात मला असं म्हणावयाचं नाहीं कीं, ज्यांना मुलाखती, पत्रव्यवहार वाचन-लेखन वगैरे विशेष सवलती मिळतात, त्या काढून घ्याव्यात. सध्यांच्या या तथाकथित सवलतीहि अगदींच दरिद्री आहेत. हिंदुस्थानांतील ' अ ' वर्गाच्या कैद्यापेक्षां अितर बऱ्याच देशांत अगदा बदमाष व हलक्या प्रतीच्या दरोडेखोरांनाहि याहून कितीतरी अधिक सवलती मिळतात. दुसरी गोष्ट या 'अ' व 'ब' वर्गाच्या सवलती मिळणाऱ्यांची संख्या अितकी क्षुल्लक आहे कीं हिंदुस्थानांतील तुरुंगपद्धतीचा समुच्चयानें विचार करतांना त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें तरी चालेल. ' अ ' व ' ब ' वर्गांच्या सवलती केवळ दाखविण्याकरितां. लोकमत बिथरूं नये, हा त्यांत अुद्देश असतो. खरी परिस्थिती माहित नाहीं, अशांची त्यामुळें फसगत होते.

कांहीं अ वर्गीय कैद्यांना व त्याचप्रमाणें स्थानबध्द व राजबंद्यांना साधारणतः येणारा दुःखदायक अनुभव म्हणजे त्यांना ओळीनें महिनेच्या महिनें, सहकाऱ्याशिवाय अेकांतवासांत ठेविले जातें. सर्वसाधारण मनुष्याच्या दृष्टीनें हा अेकांतवास किती घातकीं असतो, हें कोणताहि डॉक्टर सांगू शकेल. ज्यांनीं मन काबीज केलेलें असतें व जें अंतर्भिमुख होअूं शकतात, त्यांनाच हे घातुक परिणाम जाणवत नाहींत. तुरुंगांतील नोकरवर्गापैकीं, कोणाबरोबर तरी

दररोज कांहीं मिनीटें गप्पा छाटण्याची कैदी आणि स्थानबद्धांना अेक सवलत ठेवण्यांत आलेली आहे. पण ही सवलत अशीं आहे कीं तिचा फायदा घेण्यास मनापासून कोणीच अुत्सुक असत नाहींत. कमीअधिक प्रमाणांत अेकांतवासाची शिक्षा देण्याचें हें धोरण सरकार अबुजून अमलांत आणतें. मला आठवतें गीं, डिसेंबर १९३१ मध्यें मला अटक झाली, त्या सुमारास खान अबदूल फारखान यांना, पेशावर किंवा चरसद्दा यापैकी कुठेंतरी अटक झालीं. अबदूल गफारखान यांच्याबरोबर त्यांचे बंधू डॉ. खानसाहेब, डॉ. खानसाहेबांचे चिरंजीव व त्यांचा अेक सहकारी अितक्यांना अटक झाली. या सगळ्यांना स्पेशल ट्रेननें आणल्यावर पुढें त्यांची फारकत करण्यांत आली व चार ठिकाणच्या चार वेगवेगळ्या तुरुंगांत त्यांना ठेविण्यांत आले. त्या चौघांना निदान बाप आणि मुलगा किंवा दोघे बंधू यांना अेकत्र ठेविणे सोपें होतें. पण तसें करण्याचें मुद्दाम टाळण्यांत आलें व मला वाटतें, प्रत्येकाला सहकाऱ्यांशिवाय अेकांतांत ठेविण्यांत आलें. निदान डॉ. खानसाहेब यांना नैनीच्या तुरुंगांत तसें ठेविण्यांत आल्याचें मला माहित आहे. मीहि पण यावेळीं महिनाभर नैनीच्या तुरुंगांत होतो, पण आम्हां दोघांना वेगवेगळे ठेविण्यांत येअून, अेकमेकाची भेट होअूं दिली जात नव्हती. माझी मोठी निराशा झाली, कारण खानसाहेब हे मी अिंग्लंडमध्यें शिकत असतांना, माझें अेक आवडते सहाध्यायी होतें आणि माझी व त्यांची कित्येक वर्षेंपर्यंत भेट झाली नव्हती.

राजकीय कैद्यांना अितर कैद्यांपेक्षां अधिक चांगल्या रीतीनें वागवावें कीं, काय हा मुख्य मुद्दा नाहीं. गेल्या दहा बारा वर्षांत आढळून आल्याप्रमाणें दिवसेंदिवस राजकीय कैद्यांना अधिकाअधिक वाअीट वागविलें जाअील, हे मला पक्के माहित आहे. त्यावर अेकच परिणामकारक नियंत्रण आहे व तें म्हणजे लोकमत. पण तेहि यशाची खात्री देण्याअितकें प्रभावी असावे लागतें. नाहींतर शेवटच्या घटकेला तेहि गुंडाळून ठेविले जाते.

राजकीय कैद्यांना दिवसेदिवस अधिक वाअीट वागविलें जाअील, या माझ्या विधानाला आधार आहे. १९२१--२२ पेक्षां १९३०--३१ मध्यें वाअीट

वागणूक मिळाली, आणि १९३२ मध्यें त्यापेक्षांहि वाअीट मिळाली. आज कोणत्याहि राजकीय कैद्यांची तुरुंगांतील स्थिती अराजकीय गुन्हेगारापेक्षां खात्रीनें वाअीट आहे. राजकीय कैद्याचा छळ करून त्यानें माफी मागावी म्हणून निदान त्याला तुरुंगाची दहशत निर्माण करण्याचे असतील नसतील तेवढे प्रयत्न केले जातात.

" सन १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीबाबत, हिंदुस्थानांतील पांचशेंवर लोकांना फटक्याची शिक्षा देण्यांत आली. " असें सर सॅम्युअल होअर यांच्या वतीनें हौस ऑफ कॉमन्समध्यें सांगण्यांत आलें. फटक्याची शिक्षा असणें किंवा नसणें यावरून विवक्षीत राष्ट्रांत किती प्रमाणांत सुधारणा झाली आहे, याची कसोटी लागते. बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांनीं ही शिक्षा रद्द केली आहे, आणि ज्या देशांत ती अद्याप रुढ आहे, तेथें तिची अंमलबजावणी, अत्यंत हीन व अमानुष अशा [अुदाहरणार्थ कोंवळ्या मुलीवर बलात्कार करणें] गुन्ह्यांच्या बाबतींत केली जाते. मला वाटते, मध्यवर्ति कायदेमंडळात, फटक्याची शिक्षा कांहीं विवक्षीत [अराजकीय] गुन्ह्याकरितां असावी कीं काय, यासंबंधीच चर्चा झाली. कांहीं अमानुष गुन्ह्यांकरितां ती आवश्यक आहे, असें यावेळीं सरकारी प्रवक्त्यांचें म्हणणें पडलें. बहुधां कोणताच मानसशास्त्रतज्ञ हें मान्य करणार नाहीं. अमानुष गुन्ह्याकरितां अमानुष शिक्षा फर्माविण्याचा अुपाय म्हणजे मूर्खपणाचा कळस असेंच तो सांगेल. तें कांहीं कां असेना आज हिंदुस्थानांत मात्र निव्वळ राजकीय आणि ज्यांत नीति-अनीतिचा संबंधहि नाहीं, अशा तांत्रिक किंवा तुरुंगांतील शीस्त मोडल्याच्या जुजबी गुन्ह्यांबाबतहि, फटक्यांच्या शिक्षेची सर्रास अंमलबजावणी चालू असते.

राजकीय स्त्रीबंद्यांना वागविण्याबाबत आणखी एक नवीनच तऱ्हा अस्तित्वांत आल्याचें दिसून येते. शेंकडों स्त्रियांना शिक्षा झाली आणि त्यांच्यापैकीं अगदींच थोड्याजणींना अ व ब वर्ग मिळाले. खेदाची गोष्ट ही कीं,

तुरुंगांतील राजकीय वा अराजकीय स्त्रीबंद्यांची स्थिति पुरुषापेक्षांहि फार वाईट असते. पुरुषांना तुरुंगांतल्या तुरुंगांत कां होईना, कामाच्या निमित्तानें इकडेतिकडे येजा करतां येते, त्यांना बदल मिळतो व पाय मोकळे करतां येतात. त्यामुळें त्यांचे मन थोड्या मर्यादेपर्यंत कां होईना उत्तेजित होण्यास मदत होते. स्त्रियांना त्यांतल्या त्यांत हलकें काम दिलें जाऊनहि लहानशा जागेंत जखडून ठेविण्यांत येत असल्यामुळें त्यांचें जीवन भयंकर कंटाळवाणें होतें. तसेंच सर्व साधारणतः पुरुष गुन्हेगारांपेक्षां स्त्री गुन्हेगारांचा सहवास फार वाईट असतो. पुरुषांमध्यें मोठें प्रमाण पूर्णपणें बिनगुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांचे असते. सरळ स्वभावाचे बिचारे शेतकरी--जमिनीच्या एकाद्या झग_ड्यांत हमरीतुमरीवर येतात व त्याचा परिणाम त्यांना दीर्घ मुदतीची शिक्षा होते. या उलट गुन्हेगारी प्रवृत्तीमुळें शिक्षा झालेल्या स्त्रियांचे प्रमाण कितीतरी अधिक. बहुसंख्यांक स्त्री राजकीय बंदींस—कीं ज्यांत बुद्धीमान तरुण मुलींचा भरणा फार, त्यांना गुन्हेगार स्त्रियांच्या असल्या दूषित वातावरणांत काल कंठणें भाग पडे. माझ्या मतें, आमच्या भगिनींना तुरुंगांत ज्या तऱ्हेची वागणूक मिळते, तितका वाईट प्रकार तुरुंगांत अगर तुरुंगाबाहेर क्वचितच घडत असेल.

मी कोणत्याहि स्त्रीला, मग ती मध्यमवर्गीय असो शेतकरी असो कीं कामगार असो, आज ज्या तऱ्हेची वागणूक तुरुंगांत मिळते तशा तऱ्हेची वागणूक कधींच देऊं दिली नसती. दुसरी लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे, स्त्री राजकीय कैद्यांपैकीं मोठी अशी संख्या मध्यमवर्गीय स्त्रियांची असे. राजकीय कारणाकरितां शेतकरी तुरुंगांत जाईल, पण त्याची बायको त्याच-करितां क्वचितच तुरुंगांत गेल्याचे आढळून येते. सरकारच्या दृष्टीकोनांतून

पाहिले तरी स्त्री राजकीय बंद्यांचा सामाजिक दर्जा तुलनात्मक दृष्ट्या उच्च असतो हें वादातीत होय.

" तुरुंगांत राजबंद्यांकरितां सुधारणा केल्या तर येथून पुढें दरोडेखोर राजकीय बंदी म्हणून तुरुंगांत येतील, " असें एक विधान सयुंक्तप्रांत कायदेमंडळाच्या गेल्या वर्षींच्या अधिवेशनांत तत्कालीन गृहमंत्र्यानें केलें. हें विधान ऐकून सभासदांना आश्चर्याचा धक्काच बसला असेल ! मला वाटतें स्त्रीबंद्यांची स्थिति सुधारण्याविरुद्धहि त्यांनीं अशीच कांहीं: विचारसरणी पुढें केली होती. अर्थात ज्या श्रोत्यांपुढें त्यांनीं हें विधान केलें, त्यापैकीं बहुसंख्यांकांची बुद्धीची कुवतच तितकी असल्यामुळें, गृहमंत्र्याचा कार्यभाग झाला. पण आपल्यासारखे जे लोक बाहेरच्या अंधःकारांत (!) वावरतात त्यांनीं खोल विचार करुन, गृहमंत्र्याच्या विधानांत उघड झाल्याप्रमाणें गुन्हेगारांचा स्वभाव वगैरे व त्याचप्रमाणें गुन्हेशास्त्र, मानसशास्त्र, मानवी स्वभाव वगैरेची माहिती करुन घेणें उद्‌बोधक आहे. या गृहमंत्र्यांना सूचले नसतील असें किती तरी निष्कर्ष वरील मुद्द्यांवरुन काढतां येतील. जर एकादा दरोडेखोर आपला धंदा सोडून तुरुंगांत जाण्यास उद्युक्त झाला आणि तुरुंगांत त्याला फारशी कठोर वागवणूक न मिळाली तर त्यावरुन असेंहि अनुमान निघू शकते; कीं तुरुंगांबाहेर त्याला किमान सुरक्षितता आणि जीवनाच्या आवश्यक गरजा मिळाल्या तर तो दरोडेखोरी व गुन्हेगारी प्रवृत्ति सोडून देईलः याचा अर्थ दरोडीखोरीच्या बुडाशी भूक, हाल वगैरे आर्थिक कारणपरंपरा असते; ही कारणपरंपरा काढून टाका कीं, दरोडेखोरी गेलीच. यावरून स्पष्ट होतें कीं, दरोडीखोरी व गुन्ह्यांवर कडक शिक्षा हा उपाय नसून त्यांचें मूळच उखडून काढणें हा उपाय आहे. गेल्या वर्षींच्या गृहमंत्र्यांच्या भाषणांतून अशा तऱ्हेची दूरगामी व क्रांतिकारक

बिचारसरणी निघते, पण तिचें श्रेय मात्र मी त्यांना देऊं इच्छित नाहीं. हे गृहस्थ आतां दुसऱ्या एका अधिक मोठ्या जागेवर गेले असून, तेथून अर्थशास्त्राचें आपलें अगाध ज्ञान पाजळत असतात. पूर्वी व्यक्त केलेल्या मताचा ते ताबडतोब इन्कारहि करतील.

राजकीय कैद्यांचा उल्लेख वारंवार केला जातो. सरकारनें राजकीय कैद्यांची वेगळी वर्गवारी करण्यास नकार दिला आहे. मला वाटते, सरकारचे हें धोरण सयुक्तिक आहे. कारण राजकीय कैदी कोणते ? कायदेभंगाच्या चळवळींतील कैदी वेगळे काढणें सोपें आहे, पण त्रासदायक वाटणारे राजकीय चळवळ्यें निरनिराळे कायदे व वटहुकमांतील तथाकथित राजकीय कलमें न लावितां पकडण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. खेडेगांवांतील शेतकऱ्यांचे पुढारी व कार्यकर्ते यांच्या बाबतींतील एक नेहमींचा अनुभव लक्षांत घेण्याजोगा आहे. सर्वसाधारण इतकेंच काय पण विषेश गंभीर स्वरुपाच्या राजकीय गुन्ह्यांबद्दलहि त्यांच्यावर क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या कलमांखालीं खटले भरण्यांत येतात. हे लोक इतरांप्रमाणेंच राजकीय कैदी असून त्यांची संख्याहि मोठी असते. शहरांत मात्र खटल्याची ही तऱ्हा आढळून येत नाहीं, कारण तेथें लागलीच बभ्रा होण्याचा संभव असतो.

उंच भिंती व लोखंडी दरवाजे यामुळें तुरुंगांच्या या छोट्या जगाची बाहेरच्या व्यापक जगाशीं फारकत झालेली आहे. या बंदीस्त जगांत सर्वच कांहीं निराळें आहे; रंग, परिवर्तन, हालचाल, आशा, आनंद वगैरेंना दीर्घ मुदतीची अगर जन्मठेपीची शिक्षा झालेला कैदी मुकलेला असतो. आयुष्य निष्प्रभ व भयंकर कंटाळवाण्या चाकोरींतून चाललेलें असतें; तुरुंगांतील त्याचें जीवन म्हणजे सपाट वाळवंटच, त्यांत उंच शिखरें, आणि क्षुधा शमन करणाऱ्या किंवा तापत्या धगीपासून विश्रांती देणाऱ्या हिरवळी नसतात. दिवसांमागून

दिवस, आठवड्यांमागून आठवडे, महिन्यांमागून महिने आणि वर्षांमागून वर्षे जातात, आणि शेवटीं जीवन लुप्तप्राय होऊन जाते.

सरकारचें सारें सामर्थ्य त्याच्याविरुद्ध एकवटलेलें असतें व साधारणतः नेहमीं आढळून येणारे नियंत्रणहि तेथें नसतें. तेथें वेदनाचे आर्त स्वर दाबून टाकले जातात आणि दुःखाचा आक्रोश उंच भिंतींच्या पलीकडे जाऊं शकत नाहीं. तात्विकदृष्ट्यां तुरुंगांतील वागवणुकीवर कांहीं नियंत्रणें आहेत बाहेरून व्हिजीटर्स आणि अधिकारी तपासणीकरितां येतात. पण एकाद्या कैद्यानें तक्रार दाखल केल्याचें उदाहरण क्वचितच आढळून येतें, आणि जो कोणी तक्रार दाखल करतो, त्याला त्याचें प्रायश्चित मिळते. व्हिजीटर्स निघून जातात आणि तुरुंगांतील खालचे अधिकारी मात्र कायम रहातात: या अधिकाऱ्यांच्याबरोबरच त्याला भावी काळ कंठावयाचा असतो. सहाजिकच आपल्या त्रासांत आणखी भर पडण्याचा धोका पत्करण्यापेक्षां, आहे ती परिस्थितिच निमूटपणें सहन करण्याकडे त्याचा कल रहावा, यांत आश्चर्य नाहीं.

राजकीय कैदी तुरुंगांत मोठ्या प्रमाणांत येऊं लागल्यावर, या बंदीशाळेच्या छोट्या जगांतील कानाकोपऱ्यांवर थोडाफार प्रकाश पडूं लागला. आल्हाददायक वायुची मंद झुळूक आंत आली व दीर्घ मुदतीच्या कैद्यांच्या हृदयांत आशेचे अंकुर निर्माण झाले. तसेंच जनतेंत थोडीफार खळबळ उडूं लागली व कांहीं सुधारणाहि अमलांत आल्या. पण या सुधारणा अल्प असून, मूलतः तुरुंगपद्धत जशी होती, तशीच आहे. कांहीं कांहीं तुरुंगांत दंगे झाल्याचे ऐकूं येते. त्यावरून निदर्शनास काय येते ? कदाचित कैदीहि चुकत असतील. उंच भिंतींनीं वेढल्या गेलेल्या निशस्त्र व असहाय्य अशा कैद्यांनीं शस्त्रधारी तुरुंगाधिकाऱ्यांच्या शक्तीला आव्हान देणें वेडेपणाचें आहे. त्याचा परिणाम काय होत असेल, हेंहि ठराविकच आहे, पण कोणीहि अपरिहार्य-

रित्यां असाच विचार करील कीं, अनिवार क्षोभामुळेंच कैदी अशा तऱ्हेचीं चुकीचीं व त्रागयाचीं कृत्यें करण्यास प्रवृत्त होत असतील ना ?

पुष्कळ वेळां तुरुंगखात्यामार्फत व कांहीं प्रसंगी डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट कडून चौकश्या होतात. पण त्यांत कैद्याच्या आशेला कितपत जागा असते ? एकीकडे पूर्णपणें रंगविलेली बाजू वाटेल तो पुरावा हजर करण्यास तयार असलेला अधिकारी वर्ग, व साक्षीकरितां तयार केलेले इतर अनेक कैदी आणि दुसऱ्या बाजूला ज्याच्याबद्दल कोणालाहि सहानभुती नसते व त्याच्यावर कोणाचाहि विश्वास नसतो, असा बेड्या ठोकलेला, भीतीनें थरथर कांपणारा, मानवतेनें बहिष्कृत केलेला अपराधी ! गेल्या नोव्हेंबरमध्यें, सयुंक्तप्रांत सरकारच्या ज्युडिशिअल सेक्रेटरीनें प्रांतिक कायदेमंडळांत असें विधान केलें कीं, " जे लोक तुरुंगांत कैदी म्हणून असतात, ते स्वतः हितसंबंधी असल्यामुळें त्यांचा पुरावा ग्राह्य मानला जाऊं नये. " बिचारा कैदी ! त्याला मारलं किंवा वाईट वागविलं तरी त्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवावयाचा नाहीं, कां तर तो एक हितसंबंधी पक्ष असतो म्हणून. ज्या परिस्थितींत, कैदी वावरत असतो, त्या परिस्थितींत त्याला दुसरा कसला पुरावा सादर करतां येणें शक्य आहे, हें सयुंक्तप्रांत सरकारकडून समजावून घेणें उद्‌बोधक ठरेल. एकादा दैवी चमत्कार घडला तरच असा पुरावा देतां येणें शक्य आहे.

सरकारच्या खासगी चौकशींतील खेदजनक भाग सोडला तर, त्यापासून बरीच करमणूक होते. पोलीस आणि तुरुंगांतील नोकरवर्ग यांच्यावर आरोप केला कीं, सर सॅम्युअल होअर यांचें पित्त भडकतें. या लोकांच्या बाबतींत जाहीर व निपक्षःपाती चौकशी करण्यास सर सॅम्युअल यांनीं नेहमींचाच नकार दिला आहे. मला वाटतें, दोन वर्षांपूर्वी, हिजली तुरुंगांतील दंग्याबाबत तुरुंगखात्यामार्फत चौकशी झाल्यावर लवकरच अधिकृतरित्यां सरकारी तपासणी झाली व तींत असें शाबीत झालें कीं, सदर दंग्याबाबतची सरकारी बाजू साफ चुकीची होती.

पण ही झाली अपवादात्मक गोष्ट. खात्यामार्फत झालेल्या बहुतेक चोकश्यांवर अशा रितीनें तपासणी होत नाहीं. सध्यांच्या चोकशींची तऱ्हा पाहून सर विल्यम गिलबर्टच्या मजेदार नाटकांची मला आठवण होते. पण त्याहिपेक्षां अिंग्लिश बालवाङमयांतील अलाअीसच्या अभिजात व अमर पुस्तकांतील खालील आशयाची रूपककथा या अेकतर्फी चोकश्यांना विशेष समर्पकरीत्या लागूं पडेल.

अेक होतें मांजर,
त्यानें पकडला अेक अुंदीर.
मांजर म्हणालें,
" आपण चोकशी करूं
त्याकरितां आपण कोर्टांत जाअूं,
मी तुझ्यावर खटला भरीन,
आज मला दुसरं कांहीं काम नाहीं. "
अुंदीर म्हणाला,
" असली कसली चोकशी ?
ज्यूरी नाहीं कीं न्यायाधिश नाहीं.
अुगीच कशाला तोंडाची वाफ दवडायची."
मांजर धूर्तपणें अुत्तरलें,
" मी होअीन न्यायाधिश आणि ज्यूरी.
मी सर्व चोकशी पुरी करीन,
आणि तुला देहांत प्रायश्चित देअीन. "

खुद्द मला गेल्या वर्षी जो अेक अनुभव आला तो अेका विशिष्ट दृष्टीनें महत्वाचा आहे. माझी आअी आणि पत्नि माझ्या मेहुण्यांना अलाहाबादच्या तुरुंगांत भेटायला गेल्या होत्या. यावेळीं जेलरनें दांडगाअीनें त्यांचा अपमान

करून धक्काबुक्की केली. मला हें ऐकून अर्थातच संताप आला. पण एकं-दरींत मी या प्रकाराला फारसें महत्व दिलें नाहीं. अशिक्षित व उर्मट अधि-कारी असेंच उद्दामपणें वागावयाचें, असा मी विचार केला. मला वाटत होतें कीं, निदान वरच्या एकाद्या बड्या अधिकाऱ्याकडून त्याबद्दल दिलगिरी प्रद-र्शित केली जाईल. पण त्याऐवजीं माझी आई, पत्नी आणि मेहुणे यांनाच, किंचीतहि विचार न करतां सरकारनें शासन केलें. त्याचप्रमाणें मलासुद्धां कांहीं मुदतीपर्यंत आई व पत्नी यांना न भेटण्याची बंदी करून अप्रत्यक्षरित्यां शिक्षा करण्यांत आली. मी तक्रार केल्यावर, इन्स्पेक्टर-जनरलकडून एक मोघम स्वरूपाचें उत्तर आलें, या उत्तरांत माझ्या आईचा शिष्टाचाराला सोडून उल्लेख करण्यांत आला होता. गोष्टी इतक्या थराला आल्यावर-माझ्याकडून व त्याचप्रमाणें माझ्या आईच्या व पत्नीच्या पत्रकावरून, सर-कारला खरी वस्तुस्थिति कळून आली, असें दिसतें.

या अधिकाऱ्याकडून मोठी चूक झाली हें उघड होतें. मी वारंवार लिहूनहि त्यांनीं आमच्या विधानांतील चूका निदर्शनास आणलेल्या नाहींत, याचा अर्थ मी ठामपणें असा करतो कीं, त्यांना आमचीं विधानें मान्य आहेत, नव्हे मान्य असलींच पाहिजेत. वस्तुस्थिति अशी असेल तर त्यांनीं प्रथम जे फार मूर्खपणाचें वर्तन केलें होतें त्याबद्दल त्यांनीं निदान दिलगिरी प्रदर्शित करावयास हवी होती. मी अद्यापहि त्यांच्या स्पष्ट अशा दिलगिरी-प्रदर्शनाची वाट पहात आहे.

अशा प्रकारची वागणूक माझ्या आईला व पत्नीला मिळते, इतकेंच नव्हें तर त्यानंतरहि सरकार जर आमच्या बाबतींत इतकें चमत्कारिक व उद्दा-मपणें वागते तर सर्वसाधारण व बव्हंशी अज्ञात अशा कैद्याला व त्याच्या कुटुं-बियांना कसल्या परिस्थितींतुन जावें लागत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. आपलें सर्व सरकारच मुळीं वरून लादण्यांत आले आहे, जनतेचा त्याला आधार नाही. जोपर्यंत या शासनसंस्थेंत एका खिळीचा दुसऱ्या खिळीला आधार आहे, तोपर्यंतच ती टिकूं शकेल. हाच आधार म्हणजे जसें तिचें

सामर्थ्य तसेंच त्यांतच तिचें दौर्बल्य आहे. अशा रचनेचा ऱ्हास होअूं लागला कीं तो पुरी धूळधाण अुडविल्याशिवाय थांबत नाहीं.

गत वर्षीं, मी आमच्या प्रांताच्या गृहमंत्र्याला लिहून कळविलें की, " संयुक्तप्रांतांतील तुरुंगांचा गेल्या बारा वर्षांचा जो मला विस्तृत अनुभव आहे, त्यावरून माझें असें मत झालें आहे कीं या प्रांतांतील तुरुंग लांचलुचपत, अत्याचार व धडधडीत असत्य यांनीं माखलेले आहेत. " बऱ्याच वर्षांपूर्वी मी आमच्या तुरुंगाच्या अेका सुपरिंटेंडेंटच्या (तो पुढें अिन्स्पेक्टर जनरल झाला.) निदर्शनास कांहीं गोष्टी आणल्या. त्यानें त्या कबूल केल्या; " आपण प्रथम जेव्हां तुरुंगखात्याकडे आलों तेव्हां कितीतरी सुधारणा कराव्यात असें वाटत होतें. पण पुढें आपल्याला फारसं करतां येणं शक्य नाहीं, असं आढळून आलं, आणि सहाजिकच जे काय व्हायचे तें होअीना कां असा आपण विचार करूं लागलो " असें त्याचें म्हणणें पडलें,

वस्तुतः अत्यंत कळकळीच्या माणसांनाहि या बाबतींत फारच थोड्या गोष्टी करतां येण्याजोग्या आहेत व ज्यांच्याकडे हें खातें आहे, ते या कामाला कितपत लायक आहेत हा प्रश्नच आहे. कांहीं झालें तरी आजचे हिंदी तुरुंग म्हणजे विशल हिंदुस्थानची प्रतिकृति होय. महत्व आहे तें साध्याला. साध्य कोणतं ? मानवी कल्याण कीं निव्वळ कामाची जबाबदारी कशीतरी पुरी करणें कीं स्वतःचे हितसंबंध कायम राखणें ? शिक्षा कां दिल्या जातात ? समाज किंवा सरकार यांची सूडाची भावना म्हणून कीं, सुधारणा करण्याच्या हेतूनें ?

आपल्यासमोर अुभा राहिलेला हा दुर्दैवी प्राणी. तुरुंगांतून बाहेर आल्यावर समाजांत आपलें स्थान घेण्यास लायक व्हावा असें न्यायाधीश किंवा तुरुंगाधिकाऱ्यांना कधींतरी वाटतें काय ? मी हे प्रश्न अुपस्थित करणेंसुद्धां कित्येकांना अप्रस्तुत वाटेल. किती लोकांना त्याबद्दल आस्था आहे ?

आपले न्यायाधीश विशाल हृदयाचे आहेत असें समजूं. निदान दीर्घ मुदतीच्या शिक्षा देण्याकडे त्यांचा खात्रीनें कल आहे. ता. १५ डिसेंबर १९३२ रोजीं पेशावरहून आलेली असोसिअेटेड प्रेसची पुढील बातमी पहा.

" कोल्डस्ट्रीमच्या खुनानंतर थोड्याच दिवसांत, सरहद्द प्रांताचे अिन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस वगैरे अधिकाऱ्यांना धमकीचीं पत्रें लिहिल्याबद्दल जमनादास नांवाच्या आरोपीवर पेशावर सिटी मॅजिस्ट्रेट कोर्टांत खटला चालून त्याला अि. पी. को. कलम ५००-५०७ याखालीं ८ वर्षांची शिक्षा झाली. जमनादास हा अर्थातच अेक तरुण होता. "

दुसरी अेक ठळक बातमी पहा; ही बातमीहि असोसिअेटेड प्रेसची आहे. सदर बातमी ता. २२ अेप्रील १९३३ रोजीं लाहोरहून आलेली आहे." सात अिंच लांबीचें पातें असलेला सुरा बाळगल्याबद्दल सादत नांवाच्या अेका तरुण मुसलमानाला सिटी मॅजिस्ट्रेटनें आर्मस् अॅक्टच्या १९ व्या कलमाखालीं आठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. "

आणखी अेक अुदाहरण देतो. मद्रासहून आलेली ता. ६ जुलै १९३३ ची ही बातमी पहा. तेथील चीफ प्रेसीडेन्सी मॅजिस्ट्रेट कोर्टांत अेका कटाच्या खटल्याचें काम चालू असतांना रामस्वामी नांवाच्या अेका मुलानें अेक निरुपद्रवी फटका अुडविला. रामस्वामीला चार वर्षांची शिक्षा देअून जुव्हेनाअील प्रीझनमध्यें पाठविण्यांत आलें.

वरील तिन्ही अुदाहरणें फारशीं अपवादात्मक नाहींत. असलीं आणखी अनेक अुदाहरणें देतां येतील, अितकेंच नव्हें तर कांहीं दाखले तर फारच वाअीट आहेत. मला वाटतें, हिंदुस्थानांतील लोकांना अितकी दीर्घकाल दुःख भोगण्याची संवय झालेली आहे कीं असल्या अमानुष शिक्षा अैकून चकित होण्याच्या मनःस्थितींत ते राहिलेलेच नसावेत. व्यक्तीशः मी संयम राखण्याचा कितीं जरी प्रयत्न केला तरी असल्या शिक्षा देण्यांत आल्याचें वाचून माझ्या छातींत धस्स झाल्यावांचून कधींच राहात नाहीं. कदाचित नात्सी जर्मनी सोडला तर जगांत कोठेंहि अशा शिक्षांमुळें जनतेंत भयंकर खळबळ अुडाल्यावांचून रहाणार नाहीं.

आणि तरीहि हिंदुस्थानांत न्यायदेवता अगदींच आंधळी नाही; तिचा अेक डोळा नेहमीं अुघडा असतो. जमिनीसंबंधीच्या कोणत्याहि भांडणांत किंवा मारामारींत पुष्कळशा शेतकऱ्यांना जन्मठेपीच्या शिक्षा मिळतात. आधींच प्रक्षुब्ध झालेल्या रयतेला जमीनदारांच्या दलालाकडून मर्यादेपलीकडे त्रास झाला कीं, अशा तऱ्हेचे तुरळक दंगे होतात. गुन्ह्याच्या ठिकाणी हे लोक हजर होते, हें कसेंबसें सिद्ध झालें, अेवढेंच कारण त्यांना जन्मठेपेची अगर दीर्घ-मुदतीच्या शिक्षा देण्यास पुरेसें असतें. चिथावणीकडे क्वचितच लक्ष दिलें जातें व ओळख पटविण्याची तऱ्हासुद्धां बहुधां अगदींच कमकुवत असते. पोलीसांचें ज्यांच्याशीं वाकडें, अशा कोणत्याहि माणसाला अशा खटल्यांत ओढणें सोपे असतें. आणि अशा प्रकरणाला राजकीय रंगसफेती देतां आली किंवा सारा न देण्याच्या मोहिमेशीं त्याचा संबंध जोडता आला तर — दोषी ठरविणें अधिक सोपें, आणि अशा गुन्ह्याला शिक्षाहि अधिक लांब मुदतीची.

अलीकडच्या अेका खटल्यांत अेका टॅक्स-कलेक्टरला चपराक दिल्याबद्दल अेका शेतकऱ्याला अेक वर्षाची शिक्षा झाली. दुसरा अेक प्रकार कांहींसा निराळा आहे. हा प्रकार मिरत येथें गेल्या जुलैमध्यें घडला. कालव्याअीत पाण्याची बाकी वसूल करण्याकरितां अेक नायब तहशीलदार अेका खेड्यांत गेला होता. पुढें जेथें त्यानें तळ ठोकला होता तेथें त्याच्या शिपायांनीं अेका शेतकऱ्याला पकडून आणलें. सदर शेतकऱ्याच्या बायकोनें व मुलानें आपल्याला मारलें अशी त्यांची तक्रार होती. थोडसं आश्चर्य वाटण्याजोगाच प्रकार होता हा. तरी पण नायबनें हुकूम फर्मावला कीं, बायकोच्या गुन्ह्याबद्दल सदर शेतकऱ्याला बेदम मारला पाहिजे. आणि लागलाच हा हुकुम अंमलांत येअून सदर दुर्दैवी माणसाला नायब व त्याच्या दोघां शिपायांनीं झोडपून काढला. या माराच्या मुळें सदर माणूस पुढें मरण पावला. यानंतर नायब व त्याचे शिपाअी यांच्यावर काम चालून साधी दुखापत केल्याबद्दल त्यांना शिक्षा झाली, पण चांगल्या वर्तणुकीबद्दल सहा महिन्याचा जामीन घेअून त्यांना मुक्त करण्यांत आलें ! मला वाटतें, चांगली वर्तणूक याचा अर्थ, त्यांनीं पुढील सहा महि

न्यांत दुसऱ्या कोणा अिसमाला झोडपून त्याची परलोकी रवानगी करूं नये अेवढाच असावा ! असो. या खटल्याची हकिकत अुद्‌बोधक आहे, यांत शंकाच नाहीं.

तुरुंगाच्या सुधारणेचा विचार करूं लागलो, कीं आपल्या क्रिमीनल प्रोसीजरमध्यें आणि त्याहिपेक्षां न्यायाधिशांच्या मनोवृत्तींत सुधारणा करण्याची जरुरी अपरिहार्यरित्यां पटून येते. आमचे न्यायाधिश अद्यापहि गेल्या शतकांत वावरत असतात. शिक्षा व सुधारणा यासंबंधी आधुनिक विचारसरणी काय आहे, याबद्दल त्यांच्या ठिकाणी पराकोटीचें अज्ञान असते. पण त्या बाबतींतहि आपण अितर कोणत्याहि गोष्टीप्रमाणें शेवटीं अनुशासन पद्धति बदलण्याच्या प्रश्नावर येअून ठेपतो.

पण आपण येथें फक्त तुरुंगांचाच विचार करूं. कैद्याला शिक्षा होण्याऐवजीं तो सुधारला जावा व तो चांगला नागरिक बनावा, या कल्पनेवर कोणतीहि सुधारणा आधारली असली पाहिजे. (मी अर्थातच येथें राजकीय कैद्यांचा विचार करत नाहीं. हें अट्टल गुन्हेगार सुधारण्यापलिकडचे असें समजावयास हरकत नाहीं !) आणि ही कल्पना एकदां मान्य केली कीं, तिचें पर्यवसान सर्व तुरुंगपद्धतींत संपूर्ण सुधारणा करण्यांत झालें पाहिजे. कांहीं तुरुंगाधिकाऱ्यांना हें माहितहि आलें असावें. मला संयुक्तप्रांताच्या जुन्या जेल मॅन्युअलमधील एक परिच्छेद आठवतो. कैद्याचें काम निर्मीतीत्मक किंवा उपयुक्त असतां कामा नयें. त्याचा उद्देश शिक्षा हाच असावा, असें त्यांत म्हटलें होतें. तुरुंग नेमका कसा नसावा, याचें हें विधान उत्कृष्ट द्योतक होय. पुढें हा परिच्छेद काढून टाकण्यांत आला, पण त्याचा मूळ हेतू मात्र कायम आहे. या हेतूप्रमाणें शिक्षा ही शिक्षेकरितां व कडकच असली पाहिजे, तींत माणुसकीला जागा नाहीं असें समजलें जातें. संयुक्तप्रांताच्या जेल मॅन्युअलमध्यें तुरुंगांतील गुन्ह्यांची जी यादी दिली आहे, ती थक्क करणारी आहे.

माणसाचें जीवन असह्य करणाऱ्या जेवढ्या कांहीं क्लृप्त्या डोक्यांतून निघणें शक्य आहे, तेवढ्या त्यांत आढळून येतात. बोलणें, गाणें, मोठ्यानें हंसणें, ठराविक वेळेशिवाय इतर वेळीं शौचास जाणें, दिलेलें अन्न न खाणें वगैरे गोष्टी या गुन्ह्याच्या सदरांत येतात. अशा स्थितींत तुरुंगाधिकाऱ्यांचा सारा जोम कैद्याला चिरडण्यांत आणि प्रतिबंधक सदरांत येणाऱ्या शेंकडों गोष्टी करण्यापासून त्याला परावृत्त करण्यांत व्यतीत व्हावा यांत आश्चर्य नाहीं.

अजाण लोकांना वाटतें कीं, शिक्षा पुरेशी कडक नसेल तर गुन्हे वाढतील. वस्तुस्थिति मात्र याच्याउलट आहे. सुमारें एक शतकापूर्वी ब्रिटनमध्यें भुरट्या चोरांनाहि फांसावर लटकलें जाई. चोऱ्याबाबतची फांशीची शिक्षा रद्द करण्यांत यावी, अशी जेव्हां तिकडे सूचना आली, तेव्हां खूपच ओरड झाली. ही शिक्षा रद्द केली तर चोर-दरोडेखोर वाटेल त्यावर घाला घालतील व सगळीकडे दहशतीचे साम्राज्य निर्माण होईल, अशा आशयाची ओरड बऱ्याच उमरावांनीं हौस ऑफ लॉर्डसमध्यें केली. पण वास्तविक परिणाम मात्र उलटा झाला व गुन्ह्यांची संख्या कमी झाली. ज्या प्रमाणांत फौजदारी कायदा व तुरुंगखात्यांत सुधारणा होत गेल्या, त्या प्रमाणांत इंग्लंड वगैरे देशांत गुन्ह्यांची शिक्षा कमी होत गेली. इंग्लंडमध्यें बऱ्याच तुरुंगांची गरज न राहिल्यामुळें त्यांचा उपयोग आतां दुसऱ्या कारणा करितां केला जाऊं लागला आहे. याउलट हिंदुस्थानांतील तुरुंगभरती सारखी वाढत आहे [राजकीय कैद्यांचा प्रश्न अर्थातच वेगळा आहे.] आणि दीर्घ मुदतीच्या व अमानुष शिक्षा देऊन अधिकारीवर्ग व न्यायखातें या प्रवृत्तीला एका परीनें मदतच करीत आहे. कोवळ्या तरुणांना तुरुंगांत डांबून ठेविण्याची प्रथा नैतिकदृष्ट्या अनिष्ट आहे, असें सार्वत्रिक लोकमत असून ती इतरत्र कोठेंच रूढ नाहीं. पण हिंदु-

स्थानांतील तुरुंग, तरुण व मुलें यांनीं भरलेलें असून त्यांना वारंवार फटक्याची शिक्षाहि दिली जाते.

तुरुंगाच्या बाबतींत आणखी अेक चुकीची समजूत आहे. पुष्कळांना अशी भीति वाटते कीं, तुरुंगांतील परिस्थिती सुधारली कीं लोक तेथें गर्दी करून सोडतील! ही समजूत म्हणजे मानवी स्वभावाच्या विलक्षण अज्ञानाची द्योतक आहे. तुरुंग कितीहि चांगले असले तरी तुरुंगवास भोगावा असें कोणालाच वाटत नाहीं. स्वातंत्र्य, घरदार, मित्र, आप्तेष्ट व घरगुती वातावरणाला मुकणें म्हणजे भयंकर आपत्तिच. हिंदी शेतकरी तर आपल्या वडिलार्जीत जमिनीला चिकटून रहातील नव्हे अुपासमारहि पत्करतील, पण परिस्थिति सुधारण्याकरितां दुसरीकडे जाणार नाहींत, हें सर्वश्रुत आहे. तुरुंगांतील परिस्थिति सुधारणें म्हणजे तेथील जीवन अैषआरामी करणें नव्हें; त्याचा अर्थ तेथील जीवन अधिक सहृदय व समंजस करणें हा आहे. तुरुंगांत मेहनतीचीं कामें असावीत. पण तीं, चक्की पिसणें किंवा पंप मारणें यासारखी अमानुष व निरर्थक श्रमाची असूं नयेत. ज्या तुरुंगांतून कैद्यांना कामाला लाविलें जाते, तेथें अद्यावत असें कारखानें किंवा घरगुती धंदे चालवून माल तयार करण्यांत यावा. तुरुंगांच्या व त्याचप्रमाणें कैद्यांच्या भवितव्याच्या दृष्टीनें सर्व काम अुपयुक्त असले पाहिजे व तेथें तयार होणाऱ्या मालाची किंमत, कैद्यांच्या पोषणाचा खर्च वजा जातां बाजारभावानें दिली जावी. आठ तास मेहनतीचें काम केल्यावर कैद्यांना विविध खेळ, वाचन, पठन, व्याख्यानें वगैरे सामुदायिक कार्यक्रमांत भाग घेण्यास आणि या सर्वांपेक्षांहि महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांना हास्यविनोद व त्याप्रमाणें तुरुंगांतील नोकरवर्ग आणि अितर कैद्यांशी हार्दिक संघटन ठेविण्यास प्रोत्साहन दिलें जावें. प्रत्येक कैद्याच्या शिक्षणाकडे लक्ष दिले गेले पाहिजे, व कैद्याची मनोभूमिका योग्य रीतीनें तयार केली पाहिजे. तुरुंगांतील ग्रंथालयांत भरपूर अुपयुक्त पुस्तकें ठेवून, तीं कैद्यांना मोफत वाचावयास दिलीं पाहिजेत. लेखनवाचनाच्या बाबतींत सर्व तऱ्हेचें प्रोत्साहन दिलें गेलें पाहिजे व त्याचा अर्थ प्रत्येक कैद्याला लेखनसाहित्य व पुस्तकें बाळगण्यास मुभा असली

पाहिजे. कैद्याच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट गोष्ट म्हणजे प्रत्येक दिवशीं संध्याकाळीं त्याला अेकाद्या कोठडींत डांबून ठेवून, तेथें कांहींहि न करतां बारा बारा, चौदा चौदा तास काढायास भाग पाडले जाते. रविवार किंवा सणाच्या दिवशीं तर त्याला नेहमींपेक्षां जास्त वेळ कोठडींत डांबून ठेवण्यांत येतें.

जगाशीं संबंध रहाण्याच्या दृष्टीनें कैद्याला निवडक वृत्तपत्रें देणें जरुरीचें आहे. याशिवाय भेटीगांठी व पत्रव्यवहार या गोष्टीहि जितक्या वारंवार व अनौपचारीक तितक्या बऱ्या. व्यक्तिशः मला वाटतें कीं साप्ताहिक मुलाखती व पत्रव्यवहाराला परवानगी असावी. कैद्याला आपणहि मानवी प्राणी आहोंत, असें वाटावयास लाविले पाहिजे व त्या दृष्टीनें पाशवी व अधोगतीला नेणाऱ्या शिक्षा रद्द करण्यांत आल्या पाहिजेत.

हिंदुस्थानांतील, तुरुंगांची सद्यस्थिति लक्षांत घेतां, या सूचना हास्यास्पद वाटतील. पण मी सध्यां बहुतेक पुढारलेल्या देशांतील तुरुंगव्यवस्था कशी आहे, एवढेंच सूचित केलें आहे. आमच्या सध्यांच्या अधिकाऱ्यांना किंवा खुद्द सरकारलाहि त्या आकलन होणार नाहींत किंवा त्यांचें महत्व पटणार नाहीं; त्यांनी आपली मनेंच मुळीं कंटाळवाण्या दैनंदिन कारभाराच्या तुरुंगांत यशस्वीरीत्यां बद्ध केली आहेत. पण जनतेनें मात्र, या सुधारणांचा आतांपासूनच पाठपुरावा करण्यास सुरवात केली पाहिजे. हेतू हा कीं वेळ आली कीं त्या विनासायास लागू करतां याव्यात.

वरील सुधारणामुळें तुरुंगखात्यावर आणखी जादा खर्च करावा लागेल, असें कोणी समजूं नये. अद्यावत व औद्योगिक उद्योगधंद्यांच्या धर्तीवर तुरुंग चालविण्यांत आले तर ते स्वावलंबी होतील, इतकेंच नव्हे तर वर सूचविण्यांत आलेल्या सर्व सोयी करुनहि तुरुंगखात्याला फायदा होईल. या सुधारणा अमलांत आणण्यास कांहींच अडचणी दिसत नाहींत. एकच अडचण उद्भवते व ती म्हणजे, ज्यांना या नवीन दृष्टीकोनाचें महत्व पटलें असून तो अमलांत

आणण्याची इच्छा आहे, असा कार्यक्षम, समंजस व सहृदय नोकरवर्ग नेमावा लागेल.

मला वाटतें, आमच्याकडील कांहीं लोकांनीं पाश्चात्य देशांतील तुरुंगांचा अभ्यास करावा व शक्य तर ते एकदां पाहूनहि यावेत. त्यांना यामुळें आपलें तुरुंगखातें किती मागें आहे, हें कळून येईल. हल्लीं जिकडेतिकडे नवीन मानवी मूल्यें अमलांत येऊं लागली आहेत, आणि त्याबरोबरच गुन्हेगार म्हणजे सामाजिक परिस्थितीची निर्मिती; त्याला शिक्षा करण्याऐवजीं, रोगी मनुष्याप्रमाणें त्याचें संगोपन करणेंच इष्ट हेंहि पटूं लागले आहे. खरे निर्ढावलेले गुन्हेगार मानसिकदृष्ट्यां अजाण असतात आणि एवढ्याकरितां त्यांना प्रौढाप्रमाणें वागविणें चुकीचें आहे. पुष्कळ वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेल्या सॅम्युएल बटलरच्या Erewhon या हृदयंगम पुस्तकांत या मुद्द्याची विनोदी मिमांसा आढळते.

लाटव्हिया नांवचा अेक छोटा देश आहे. तेथील तुरुंगांत तर घरगुती वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीनें जेवढें करतां येअील तेवढें केलें जातें. सुंदर वेली, फुलें, पुस्तकें व त्याचप्रमाणें फोटो, कलाकुसरीच्या वस्तु, रेडिओ-सेट वगैरे बाबतींत कैद्यांना पूर्ण मुभा आहे. कैद्यांना त्यांच्या कामाचें वेतन दिलें जाते. यापैकीं निम्मे वेतन कैदी शिल्लक ठेवितात व निम्मे, नेहमीं-शिवाय अितर खावेसे वाटणारे पदार्थ, तंबाकू, वृत्तपत्रें वगैरे घेण्याकरितां खर्च करतात.

बोल्शेव्हिकांचा भयंकर समजण्यांत येणारा रशिया तर तुरुंगाची स्थिति सुधारण्याच्या बाबतींत अग्रगण्य आहे. या दृष्टीनें अगदीं अलिकडे अेका तज्ञांनीं सोव्हिअेट रशियांतील तुरुंगांची पहाणी करून सादर केलेला अहवाल अुद्‌बोधक आहे. हे तज्ञ म्हणजे प्रख्यात अिंग्लिश कायदेपंडीत डी. अेन. प्रीट के. सी. हे होत. गेली साठ वर्षें तुरुंगसुधारणेचा पुरस्कार करीत असलेल्या अिंग्लंडमधील

हॉवर्ड लीग ऑफ पीनल रिफॉर्म्स या आद्य संस्थेचे प्रीट हे आज अध्यक्ष आहेत. प्रीटना असें आढळून आलें कीं, रशियांत शिक्षेचें शासनात्मक स्वरूप काढून टाकण्यांत आले असून, तिचें स्वरूप पूर्णपणें सुधारणात्मक असतें. कैद्यांना मिळणारी वागणूकहि सहृदय व अतिशय चांगली असते. प्रीट म्हणतात :

" रशियांतील तुरुंगांचे दोन प्रकार आहेत — [१] साधारण अुघड्या हवेंतील छावण्या किंवा पूर्णपणें अुघड्या अशा वसाहती. ह्यांना तुरुंग मुळींच म्हणतां येणार नाहीं. तेथील कांहीं विवक्षीत बंधनें सोडलीं तर कैदी जवळ-जवळ ग्रामीण जीवन कंठीत असतात. [२] बंदिस्त तुरुंग:-- अत्यंत कडक असें समजले जाणारें हे तुरुंग. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथेंहि, कैद्याना बरेंच स्वातंत्र्य असते. तेथील वॉर्डर्स व कैदी यांच्यांत समानतेची भावना वसत असते व कामाची वेळ सोडली तर कैद्यांना अेकमेकांशो किंवा पहारेकऱ्याशीं संघर्ष ठेविण्याची अनिर्बंध मुभा असते. कैद्यांना कारखान्यांत फक्त आठ तास काम करावे लागते व त्याबद्दल त्यांना योग्य वेतन दिले जातें. बाकीचा वेळ कैदी खेळ, शिक्षण, व्याख्यानें, रेडिओ, पुस्तकें वाचणें, नाटकाचे प्रयोग यांत घालवितात. याशिवाय कैदी वृत्तपत्रें (Wall newspapers) काढतात. ' तुरुंग म्हणणजे शिक्षेकरितां नसून, सुधारण्याकरितां आहे. ' हे विसरल्याबद्दल ते वॉर्डर्स व अितर तुरुंगाधिकारी यांच्यावर या पत्रांतून टीका करण्यासहि मागे पहात नाहींत.

" रशियांतील सर्व संस्थांतून स्वायत्तत्तेला जें प्रोत्साहन दिलें जातें तशी स्वायत्तता कांहीं मर्यादेपर्यंत तुरुंगांतहि आढळून येतें. खुद्द कैदी स्वत:वरहि कांहीं बंधनें लादून घेतात. कामाव्यतिरिक्त अितर वेळीं धूम्रपान करण्याची परवानगी आहे. गांठीभेटी वारंवार मिळूं शकतात व लेखन आणि पत्रव्यवहार जवळजवळ निर्बंधविरहित चालूं शकतो. आणि सर्वांत अुल्लेखनीय गोष्ट म्हणजे कैद्याला पीकपाण्याची व्यवस्था करण्याकरितां पंधरावड्याची सुट्टीहि मिळूं शकते. मूलवाल्या स्त्रीला अेक विशेष सवलत मिळते. तिनें आपले मूल तुरुंगांतील संगोपनगृह किंवा घर यापैकीं कोठेंहि ठेवावे. संगोपनगृहांत

ठेविलें तर तेथें त्याची योग्य काळजी घेतली जाते व घरीं ठेविलें तर, त्याच्या संगोपनाकरितां आओला दिवसांतून अनेक वेळां घरीं जाण्याची परवानगी मिळते !

" कैद्यांच्या कोठड्यांतून फुलें, चित्रें, फोटो वगैरे वस्तूहि आढळून आल्या. कैद्यांची मानसिक स्थिति समाधानकारक राहिली आहे कीं काय हें पहाण्यासाठीं, त्यांची मानसशास्त्रतज्ञांकडून नियमित तपासणी केली जाते आणि जरुर तर त्यांना मानसोपचार रूग्णालयांत हालविण्यांत येतें. अेकांतवासाची शिक्षा क्वचितच आढळून आली. "

अगदीं अजब ! पण अशी व्यवस्था अस्तित्वांत आहे व अशा सहृदय वागणुकीचे सुपरिणामहि दिसून आले आहेत. रशियन लोकांना आशा वाटते कीं, गुन्ह्यांची संख्या परिणामकारकरीत्यां कमी करून आपण बऱ्याच तुरुंगांना कुलुपें घालूं शकूं. यावरून स्पष्ट होतें कीं, योग्य आर्थिक पार्श्वभूमि व अुद्योगाची व्यवस्था असेल तर चांगल्या वागणुकीमुळें तुरुंगभरती होण्याअैवजीं ते रिकामेंच होतील.

थोड्या दिवसापूर्वीं, हिंदुस्थानांतील जनावरांचें संरक्षण करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं हौस ऑफ कॉमन्स सभेंत एक बैठक झालीं. केवढा मोठा विषय ! पण हिंदुस्थानांत आज जर कशाची जरूरी असेल तर ती दोन पायाच्या प्राण्याची काळजी घेअून त्याचें संरक्षण करण्याची. विशेषतः तुरुंगांत दीर्घ काळ शारिरीक व मानसिक यातना झाल्यामुळें ज्यांना बाहेर आल्यावर नेहमीचा जीवनक्रम कंठण्याचेंहि सामर्थ्य रहात नाहीं, त्यांना या गोष्टीची विशेष आवश्यकता आहे.

नॉर्वेच्या तुरुंगांतील प्रत्येक कोठडींत वचनवजा असा अेक कोरीव अुतारा आढळून येतो. हें वचन, प्रख्यात नॉर्वेजीयन कैदी लार्स ऑस्लेन स्क्रेफसंद यांच्या भाषणांतील आहे. लार्सला, दारु पिअून चोरी केल्याबद्दल दीर्घ मुदतीची शिक्षा झाली होती. पुढें सुटका झाल्यावर हिंदुस्थानात येअून त्यानें स्कँडेनेव्हीयन संताळ मिशनची स्थापना केली. तो मोठा बहुभाषी असून त्याला

संताळी आदिकरुन प्राचीन व अलीकडच्या अशा सतरा भाषा येत होत्या. हा अुतारा पुढील अर्थाचा आहे.

" कैदी होणें म्हणजे काय चीज आहे, याचा ज्याला कधीं काळीं प्रत्यक्ष अनुभव आला असेल, त्याच्याशिवाय, अितरांना कैद्याच्या भावना अुमगणें शक्य नाहीं. त्याबद्दल कांहीं तर्क बांधता येतील, पण कोठडींत विषण्ण व विमनस्क स्थितींत बसलेल्या कैद्याच्या भावना या तर्कामुळें व्यक्त होअूंच शकत नाहींत."

सुदैवानें जे लोक तुरुंगाबाहेर असतात, तें कधीं कधीं, तुरुंगांतील अुदास व स्मृतिआड झालेल्या माणसाचा विचार करतात, ही गोष्ट खास आशादायक आहे.

अलाहाबाद, १९३४.

न्यायाधिशाची मनोवृत्ति

मी वकिली करीत होतो, त्या गोष्टीला आतां कित्येक वर्षे लोटल्या-सारखी वाटतात; त्यामुळें त्यावेळीं माझ्या मनावर ज्या विचारांचा पगडा होता किंवा माझी जी मनःस्थिति होती, त्या वातावरणांत पुन्हां विहार करणें मला थोडसं कठीण झालं आहे. तसें पाहिलें तर अवघ्या सोळा वर्षांपूर्वी मी काय-द्याच्या चक्रव्यूहांतून बाहेर पडून अनेकविध गोष्टींत लक्ष घालूं लागलो. पण अजूनहि पुष्कळ वेळां मी त्या जीवनाकडे मागें वळून पहातो. याचें अेक कारण म्हणजे तुरुंगांत मनुष्य अंतर्भिमुख बनतोच आणि वर्तमानकाळ निरस, कंटाळ-वाणा व दुःखानें भरलेला असल्यामुळें भूतकाळाचें ठळक व आकर्षक चित्र डोळ्यांपुढें आणण्यांत मौज वाटतें. वस्तुतः माझ्या भूतकालीन वकिली जीव-नांत आकर्षता अशी थोडीच होती व कायद्याकडे पुन्हां परत वळावं असं मला कधींच वाटलं नाहीं. पण जेव्हां जेव्हां माझ्यावर निष्क्रीयता लादली जातें तेव्हां मी गत काळाबद्दलचें मूर्खपणाचें पण मनोरंजक कल्पना-चित्र रंगविण्यांत वेळ घालवितो. माझें मन त्या विशिष्ट काळांत तल्लीन होतें. खरेंच मी माझ्या मूळच्या धंद्याला चिकटून राहिलो असतो, तर माझ्या जीवन सरोवरांत कसे व कोणत्या तऱ्हेचे तरंग अुठलें असते ! आज हें कल्पना-चित्र चमत्कारिक वाटतें, पण त्यांत त्यावेळीं अस्वाभाविक असें कांहींच नव्हतें. हिंदोळ्यावर

हेलकावे खाणारे त्या वेळचें माझें जीवन, त्याला थोडासा निराळा झोला दिला गेला असता तर, माझें सारें भवितव्य बदलून गेलें असतें. मला वाटतें, वकिलीच्या धंद्यांत मी बरंच यश कमावलं असतं, आणि सध्यां मी ज्या तऱ्हेचें आयुष्य कंठीत आहे, त्या मानानं माझ्या जीवनांत अधिक निरसता आली असती, हें खरं असलं तरी तें अधिक आरामशीर व ऐहिकदृष्ट्यां अधिक सुखाचें झालें असतें. कदाचित मी न्यायाधिशहि झालो असतो व अितर कांहीं मित्र व सहकाऱ्यांप्रमाणें आमची स्वारी झगा व वीग धारण करून अतिशय संभावीत व गंभीर चेहरा करून न्यायासनावर आरूढ झालेली दिसली असती.

खरंच मी न्यायाधिश झालो असतो तर मला काय वाटलं असतं ? न्यायाधिशाला काय वाटतें ? त्याच्या मनांत कोणते विचार खेळत असतात ? हा दुसरा प्रश्न तर मी ज्या ज्या वेळीं खटला चालविण्यासाठीं अुभा राही किंवा फौजदारी खटले अैकत बसें, तेव्हांहि कांहीं मर्यादेपर्यंत माझ्या मनांत अुद्‌भवें. अेकामागून अेक अशा अनेक लोकांना कोर्ट ज्या गतीनें व अनास्थेनें फांशीची अगर दीर्घ मुदतीच्या कारागृहवासाची शिक्षा ठोठावी त्यामुळें मी चकित होअून जाअी. वैयक्तिकदृष्ट्यांहि असें प्रश्न माझ्यापुढें अुभे राहण्याचे प्रसंग नेहमींच आले. खुद्द आरोपीच्या पिंजऱ्यांत गुन्हेगार म्हणून मी वारंवार अुभा राहिलो होतो व राजकीय गुन्ह्यांबाबतच्या माझ्या मित्रांवरील खटले अैकण्यासहि मी कोर्टांत अनेक वेळां गेलो. तुरुंगांतसुद्धां हाच प्रश्न अुभा राही,कोर्टानें तेथें पाठविलेल्या हजारों कैद्यांत गुरफटलों गेल्यावर, हा विचार मनांत न आला तरच नवल ! [या वेळीं मी राजकीय गुन्हेगारांचा विचार करीत नसून फक्त साध्या कैद्यांचा विचार करीत आहे.] कोर्ट आपल्यापुरतें आरोपीनें केलेल्या वाअीट कृत्याचा विचार करते व पीनल कोडांत सांगितल्याप्रमाणें निकाल देअून शिक्षा ठोठावितें. कधीं कधीं आपण दिलेल्या कडक शिक्षेचें समर्थन करण्यासाठी, न्यायाधिशांकडून अभिप्राय व्यक्त करण्यांत येतो. पण लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे, आपल्यापुढील आरोपीचें पालनपोषण, आजूबाजूचें वातावरण, शिक्षण [किंवा शिक्षणाची जरुरी] याचा विचार करण्याची न्यायाधिशाला जरुरी

भासत नाहीं. गुन्हयाची मानसिक पार्श्वभूमि काय किंवा आपल्यापुढें आरोपींच्या पिंजऱ्यांत अुभा केलेल्या मूक आणि घाबरलेल्या जीवाच्या मनांत कोणते मानसिक झगडे चालले असतील याकडें त्याचें लक्ष नसते. न्यायाधिशाच्या मनांत ओझरतीसुद्धां कल्पना येत नसेल कीं, ज्या समाजाचे आपण स्वतःला अेक आधारस्तंभ व भूषण समजतो, तो समाजच आपल्यासमोर अुभ्या राहिलेल्या आरोपीच्या गुन्हयाला अंशतः कां होअीना जबाबदार आहे.

आपण असें धरून चालूं कीं, कोर्ट सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून चालते व शिक्षा सुनावण्यापूर्वी आपल्यासमोर आलेल्या पुराव्याचा सारासार बुद्धीने विचार करते. तसेंच संशयाचा फायदाहि-- जरी अशा संशयाला न्यायाधिशाच्या मनांत फारशी जागा नसली तरी-- आरोपीला देण्यांत येत असेल. पण बऱ्हंशी अशी स्थिति आढळून येते कीं, न्यायाधीश व आरोपी हे दोन निरनिराळ्या जगांत वावरत असल्यामुळें मानसिकदृष्ट्यां त्यांच्यांत क्वचितच साम्य असतें व अेकमेकांच्या भावना ओळखण्यास ते असमर्थ असतात. अपवादात्मक प्रसंगी दुसऱ्याच्या दृष्टीकोनाबद्दल व वैचारिक पार्श्वभूमिबद्दल बौद्धिक गुणग्राहकता दिसून येत असेल, पण त्यांत भावनेचा ओलावा नसतो, आणि भावनेचा ओलावा असल्याशिवाय, दुसऱ्या व्यक्तीची मनोभूमिका वास्तवरित्यां समजणें शक्य नाहीं

शिक्षा ! या शिक्षाहि मोठ्या वैशिष्ठ्यपूर्ण असतात. गुन्हयाची प्रवृत्ति कमी होण्याऐवजीं वाढत आहे, अशी समजूत करून घेऊन गुन्हेगाराला दहशत बसाविण्याच्या उद्देशाने शिक्षाहि अमानुष दिल्या जातात. कोर्ट आणि कोर्टामागील सत्तेला, कांहीं विशिष्ट कारणामुळेंच गुन्हे होतात, याची जाणीव नसते. या कारणांची चौकशी करून; त्यापैकीं कांहींना आळा घालतां येणें शक्य आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कडक कायद्यामुळें एकाद्या गटाची सामाजिक नीतिमत्ता जशी सुधारत नाहीं त्याचप्रमाणें, वाईट मार्गाला लागलेल्या व्यक्तीला कडक शासन केल्यामुळें तो ताळ्यावर येणेंहि शक्य नाहीं. राजकीय

व त्याचप्रमाणें अराजकीय गुन्हे निकालांत काढण्याचा त्यांना एकच उपाय माहित असतो व तो म्हणजे शिक्षा. जास्तींत जास्त कालमर्यादेच्या शिक्षा ठोठावून आरोपीला दहशत उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला जातो. सरकारच्या दृष्टीनें आक्षेपार्ह असें भाषण, गाणें किंवा काव्य याबद्दल साधारणतः दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली जाते, [सरहद्द प्रांतांत हीच शिक्षा तीन वर्षांची आहे.] व या शिक्षा सरसहा दिल्या जातात; पण विनाचौकशी ज्या लोकांना चार चार पांच पांच वर्षें किंवा बेमुदत कैदेत ठेवण्यांत येते, अशांशीं तुलना करतां, वरील शिक्षा क्षुल्लक वाटतील.

राजकीय खटले बरेचसें सरकारची मनस्थिति व बदलती परिस्थिति यावर अवलंबून असल्यामुळें फौजदारी कायद्याच्या नेहमींच्या अंमलबजावणीचा विचार करतांना त्याचा अुपयोग होत नाहीं. अर्थात कांहीं मर्यादेपर्यंत त्या दोन्हींचा परस्पर संबंध आहेच; अुदाहरणार्थ कोर्टांत आलेल्या पुष्कळशा शेतजमिनींच्या व मजूरविषयक खटल्यांचे मूळ खात्रीनें राजकीयच असतें. तसेंच राजकीय-दृष्टया जे लोक पोलिसांच्या डोळ्यांवर आलेले असतात, अशा लोकांना घाणे-रडा जीवनक्रम कंठण्याबाबत किंवा तशाच प्रकारच्या अेकाद्या कलमाखालीं पकडून कोणताहि विशिष्ट आरोप त्यांच्याविरुद्ध न आणतां तुरुंगांत कसें डांबून ठेविले जातें, हें सर्वश्रुतच आहे. असली अुदाहरणें बाजूस ठेवून, जे गुन्हे अुघड आहेत, त्यांचा विचार केला तर दोन गोष्टी लक्षांत येतात. त्या म्हणजे आरो-पींची संख्या व शिक्षेची कालमर्यादा वाढत चालली आहे. प्रत्येक वर्षांचे निरनिराळ्या प्रांतिक तुरुंगखात्यांचे अहवाल पाहिले तर असें दिसून येअील कीं कैद्यांची संख्या वाढत असून, या वाढत्या संख्येची तरतूद करण्याची आवश्यकता तुरुंगखात्यास भासते. कायदेभंगाची चळवळ कळसाला पोहोंचली होती, त्या कालांत हजारो लोक तुरुंगांत गेले, पण नंतर नेहमींची परिस्थिति येअूनहि तितके लोक तुरुंगांत असणे हा क़ायमचाच प्रकार होअून बसला. कांहीं वेळेला

अल्प मुदतीच्या शिक्षा झालेल्या लोकांना सोडून देऊन ही गैरसोय दूर केली जाते, पण अेकंदरींत पहातां तुरुंगांतील गर्दी कायम राहते.

मध्यवर्ति तुरुंग, जन्मठेप व त्याचप्रमाणें दीर्घ मुदतीच्या शिक्षा झालेल्या कैद्यांनीं भरलेले असतात. जन्मठेपीच्या कैद्यांपैकीं बहुतेकांची मोठीच्या मोठी टोळी कुठेंतरी दरोड्यामध्यें सापडलेली असतें. त्या टोळींतील बरेचसे लोक गुन्हेगार असणेंहि संभवनीय आहे, मला मात्र वाटतें कीं त्यांत बरेचसें निर्दोषी लोकसुद्धां गिरफदार केलें जात असावेत, कारण अशा खटल्यांत ओळख पटविणें हाच अेकमेव पुरावा. जनता व त्याचप्रमाणें खालचा मध्यमवर्ग यामधील वाढती बेकारी व दारिद्र्य या गोष्टीहि दरोड्यांच्या वाढत्या बुडाशीं असतात, हेंहि अुघड आहे. प्रचंड अशा बहुसंख्यांक लोकांपुढें ज्या तीव्र गरजा व अुपासमारीचा प्रश्न अुभा आहे, त्यामुळेंहि मालमत्तेसंबंधीचे अनेक फोजदारी गुन्हे निर्माण होतात.

आमच्या न्यायाधिशांना याची कल्पना असते कां? उपाशी बायको आणि मुलें पाहून सर्वसाधारण माणूससुद्धां कसा वैतागून जात असेल याचा त्यांनीं कधीं विचार केला आहे? नुसतें असहाय्यपणें बसून आपलीं आवडतीं माणसें ऋग्णशय्येवर पडलेली व अत्यंत साध्या मानवी गरजांभावी मृत्युच्या दाढेंत चाललेली त्यानें पाहावींत कां? असा मनुष्य घसरतो, त्याच्या हातून कायदा मोडला जातो, पण कायदा आणि कायदा पेलणारे कोर्ट तो पुन्हां कधींहि माणसांत न येअील, त्याला कोणताहि पोटाचा धंदा न करतां येअील अशीं दक्षता घेतात. तथाकथित गुन्हेगार जात निर्माण करावयाला ते मदत करतात आणि अशी गुन्हेगार जात अस्तित्वांत आहे, नव्हे सारखी ती वाढत आहे असें त्यांना कळून आलें कीं ते आश्चर्यचकित होतात.

मोठ्या गुन्ह्यांबद्दल जन्मठेप किंवा साधारणपणें दहा वर्षें मुदतीची शिक्षा दिली जातें. पण किरकोळ गुन्हे व ते निकालांत काढण्याची कोर्टाची तऱ्हा विशेष विचार करण्यासारखी आहे. अशा प्रकारचें बहुतेक खटले कोर्टाच्या

फायलींत दाबून ठेविलेले असतात; त्यांना प्रसिद्धी मिळत नाहीं, अगदीं क्वचित प्रसंगी असल्या खटल्यांचा वृत्तपत्रें अुल्लेख करतात. अगदीं अलीकडच्या वृत्तपत्रांत अितस्ततः आढळून आलेले अशा प्रकारचे तीन खटले खालीं देंत आहें.

रहमान हा अेक सरावलेला गुन्हेगार असून, त्याला पूर्वीं अेकंदर बारा-वेळां शिक्षा झाली होती. पहिली शिक्षा सन १९१३ मध्यें झाली. कांहीं किरकोळ किंमतीचे कपडे चोरल्याचा यावेळीं त्याच्यावर आरोप होता. रहमानने गुन्हा कबूल केला. त्यानें कोर्टाला विनंति केली कीं, ' मला रेफरमेटरींत किंवा जेथून मी पूर्णपणें सुधारून बाहेर पडेन अशा अेकाद्या ठिकाणीं पाठवा. ' हें कोर्ट सिंधच्या ज्युडिशियल कमिशनरचें होतें. रहमानची विनंति धिक्कारून त्याला सात वर्षांची शिक्षा देण्यांत आली. निकालपत्रांत कोर्टानें पुढील शेरा मारला. " जर या सात वर्षांच्या सक्तमजूरीच्या शिक्षेनेंहि तुझ्यांत सुधारणा झाली नाहीं तर, अेका परमेश्वराशिवाय तुला दुसरा मदत कोण करूं शकणार ? " (कराची, २३ में, १९३५.)

बद्री हा पूर्वीं चार वेळां शिक्षा झालेला अिसम. चोरीची चादर लबाडीनें घेतल्याबद्दल त्याला अिंडियन पीनल कोड कलम ४११।७५ प्रमाणें दोन वर्षें सक्तमजूरीची शिक्षा सांगण्यांत आली. (लखनौ, ३ जुलै, १९३५.)

कोणा अेका माणसाच्या खिशांतील अेक रुपया चोरल्याबद्दल गुलाम महंमद नांवाच्या अेका जुन्या गुन्हेगाराला तीन वर्षें सक्तमजूरीची शिक्षा झाली. (सियालकोट, ३ जुलै, १९३५.)

या किंवा अशा प्रकारच्या दुसऱ्या शिक्षा अिंडियन पीनल कोडच्या कलमाबरहुकूम असतील, पण त्यामुळें आपण आरोपींची सुधारणा करीत आहोंत, असें न्यायाधिशानें समजावें, याचेंच मला आश्चर्य वाटतें. सिंधमधील ज्युडिशिअल कमिशनरचें अुदाहरण घेतले तर त्याला, आपण दिलेल्या शिक्षेचा आरोपींत सुधारणा होण्याच्या दृष्टीनें कितपत अुपयोग होअील, याची शंकाच वाटत

होती असें दिसतें. पुढच्या खेपेला परमेश्वराला संधि द्यावी अशी सूचना, त्यामुळेंच त्यानें केली असावी.

न्यायाधीश कोर्टांत आपापल्या न्यायासनावर आरूढ होऊन बसलेलें असतात. दुर्दैवी प्राण्यांची मालिका त्यांच्यासमोरून अेकसारखी जात असते. कांहींची रवानगी सूळाकडे होतें, कांहीं फटके खाण्याकरितां जातात, तर कांहींच्या नशिबी कारागृहवास आणि अेकांतवासाची शिक्षा येते. न्याय व शिक्षा या-संबंधीच्या त्यांच्या ज्या विशिष्ट कल्पना त्याप्रमाणें ते आपलें कर्तव्य करीत असतात. आपण म्हणजे अनिष्ट अशा गुन्हेगार प्रवृत्तीपासून समाजाचा बचाव करणारे संरक्षक आहोंत, असें मानणें त्यांना भागच आहे. या ठाम कल्पना-पलिकडे त्यांचे विचार कधींतरी जाऊन त्यांच्यांत मानवी सहृदयता येते कां? आपल्यासमोरील दुर्दैवी आरोपी हा मनुष्यप्राणी असून त्याला आओबाप, बायको, मुलें, मित्र आहेत असा विचार त्यांच्या मनांत कधींतरी येतो कां? अेका व्यक्तींला ते शिक्षा ठोठावतात पण ही व्यक्तीगत शिक्षा म्हणजे अेका कुटुंबाला शिक्षा ठरते, त्याची वाट काय? त्याच्या यातनांचे तरंग पसरत दूरवर जातात. ज्यांना मृत्यूची शिक्षा होते, ते निदान झटपट मरून जातात, त्यांचें दुःख अल्पकालांतच संपते. पण जे तुरुंगांत प्रवेश करतात त्यांच्या यातना असीम असतात.

Behind the door within
locked, they sit the numbered ones...

[बंदीस्त-तुरुंगांत गजाच्या आड, हे बिचारे बंदीवान डांबून ठेविलेलें असतात.]

दोन वर्षें, तीन वर्षें, सात वर्षें. क्षणभंगुर आयुष्यांतील काळ अशा-रीतीनें हिरावून घेतला जातो. प्रत्येक वर्ष बारा महिन्यांचें, प्रत्येक महिना तीस दिवसांचा, प्रत्येक दिवस चोवीस तासांचा. कैद्याला हा काळ किती भयंकर वाटत असेल? त्याचें जीवन किती कंटाळवाणें होत असेल?

ही सर्व परिस्थिति खरोखरीच खेदजनक व शोचनीय आहे, यांत शंकाच

नाहीं. पण कोणी म्हणतील तिला गरीब बिचाऱ्या न्यायाधिशानें काय करावं ? भावनेच्या प्रवाहांत त्यानें वाहात जावं व कायद्याच्या विरुद्ध जाऊन गुन्हेगारांना शिक्षा करण्याचं सोडून द्यावं ? असा मृदु व भावनाप्रधान मनुष्य न्यायाधीशपदाला योग्य ठरणार नाहीं, त्याला आपली नोकरी सोडावी लागेल. न्यायाधिशानें आपल्यासमोर आलेल्या प्रत्येक आरोपीला आलिंगन द्यावें किंवा घरी जेवायला बोलवावं, अशी कोणाचीच अपेक्षा नसतें, पण खटल्याचें काम व शिक्षा यांत सहृदयता ठेविली तर परिस्थिती खात्रीनें सुधारेल. आमचे न्यायाधिश अतिशय व्यक्तिभावरहीत व अलिप्त वृत्तीचें असतात. ते जी शिक्षा देतात त्याच्या परिणामाची त्यांना क्वचीतच जाणीव असतें. ही जाणीव वाढवितां आली व त्याचप्रमाणें आरोपीबद्दल कळकळीची भावना ठेविली जाअील तर मोठाच सुपरिणाम होअील.अर्थात ते दोघेहि कमीअधिक प्रमाणांत अेकाच वर्गांतील असतील तरच ही गोष्ट शक्य आहे. सार्वजनिक पैशाचा अपहार करणाऱ्या धनिकाबद्दल न्यायाधिशाला सर्व तऱ्हेची सहानुभूति वाटेल, पण स्वतःची निकडीची गरज भागविण्याकरितां अेकादा रुपाया अुचलल्या किंवा चोरलेल्या गरीब बिचाऱ्याबद्दल मात्र ही सहानुभूति आढळून येत नाहीं. न्यायाधिश व सर्वसाधारण गुन्हेगार अेकाच वर्गांतील असायला सामाजिक रचनेंत मूलभूत बदल झाला पाहिजे. प्रत्येक मोठ्या सुधारणेचा तोच हेतु असतो. पण ही गोष्ट सोडली तरी अशी समाजरचना आज ना अुद्यां येणारच, असें गृहित धरून कांहींतरी खास करतां येण्याजोगें आहे.

मला वाटतें, खुद्द बर्नार्ड शॉनेंच, प्रत्येक न्यायाधिश, मॅजिस्ट्रेट व त्याचप्रमाणें तुरुंगाधिकाऱ्यानें, साधारण कैद्याप्रमाणें निदान कांहीं काल तरी तुरुंगांत घालवावा, अशी सूचना केली होती. शॉच्या मतें,त्यानंतरच, त्यांना लोकांना बंदिवासाची शिक्षा ठोठावण्याचा किंवा त्यांच्यावर हुकमत चालविण्याचा अधिकार प्राप्त होअील ही सूचना अंमलांत आणणें कठीण असलें तरी ती अुत्कृष्ट आहे. संयुक्तप्रांतांचे गृहमंत्रि व अिन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स यांच्यापुढें मी ही सूचना मांडून, त्यांनीं ती वैयक्तिकदृष्ट्या अंमलांत आणावी असें,

सूचविले होते, पण त्यांना ती पसंत पडल्याचें दिसलें नाहीं. मात्र शॉची ही सूचना प्रसिद्ध अशा अेका अधिकाऱ्यानें कां होअीना स्वीकारली. हा अधिकारी म्हणजे न्यूयॉर्कमधील सींग सॉंग तुरुंगाचा थॉमस मॉट ओसबर्न हा होय. कांहीं काळपर्यंत त्यानें स्वखुषीनें तुरुंगवास पत्करला व त्याचा परिणाम म्हणजे त्यानें पुढें कैद्यांची रहाणी व शिक्षण सुधारण्याकरितां अनेक महत्वाचे नियम जारी केले.

अशा प्रकारचा आत्मखुषीचा तुरुंगवास, आमचे न्यायाधीश, मॅजिस्ट्रेट, तुरुंगाधिकारी वगैरेंना, शारिरीक व मानासिकदृष्टयां खास उपकारक ठरेल, त्यामुळें त्यांना तुरुंगांतील जीवन अधिक सूक्ष्म रीतीनें न्याहाळतां येईल. पण अशा आत्मखुषीच्या तुरुंगामुळें मुख्य प्रश्न सर्वस्वीं सोडविला जाईल, असें समजणें चुकीचें ठरेल. शिक्षेतील कडवटपणा व त्याचप्रमाणें सरकारच्या सशस्त्र व बंदिस्त सत्तेच्या समोर कैद्याला वाटणारी विशिष्ट प्रकारची असहाय्यता व भग्न मनस्थिति या गोष्टींचा आत्मखुषीच्या तुरुंगवासांत अभाव असेल. त्याचप्रमाणें, आत्मखुषीच्या कैद्याला नोकरवर्गाकडून वाईट वागवणूकहि मिळणार नाहीं. शरीराच्या नासलेल्या अवयवांप्रमाणें आपण म्हणजे समाजांतून बहिष्कृत केलेले कोणीतरी दुर्दैवी प्राणी ही मानासिक पार्श्वभूमी म्हणजे तुरुंगपद्धति. ही पार्श्वभूमि आत्मखुषीच्या कैद्यांच्या बाबतींत नसणारच. पण हे सर्व दोष असले तरी हा अनुभव घेण्यासारखा आहे, त्यामुळें फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी अधिक सहृदय व उपकारक करण्याकडे प्रवृत्ति होईल. गेल्या असहकारितेच्या व कायदेभंगाच्या चळवळींत मध्यम वर्गीय लोक मोठ्या प्रमाणांत तुरुंगांत गेल्याचा एक अप्रत्यक्ष कां होईना ठळक परिणाम झाला आहे. या तुरुंगाच्या यात्रेकरूंना न्यायाधिश किंवा तुरुंगाधिकाऱ्यांच्या जागा न मिळाल्यामुळें प्रत्यक्ष परिणाम फारसा होणें संभवनीय नव्हतें, पण त्यामुळें तुरुंगांतील परिस्थितिची माहिती व कैद्यांविषयीं

सहानुभूति यांचा मोठ्या प्रमाणांत जनतेंत प्रादुर्भाव होत गेला. आणि लोकमत व कांहीं कॉंग्रेस कार्यकर्त्यांची नेटाची मोहीम तुरुंग सुधारण्याच्या दृष्टीनें बरीच प्रभावी ठरली.

मी अति हळव्या अन्तःकरणाचा आहे कीं, नाहीं, हें मला माहित नाहीं. पण मी हळवेपणा व भावनावशतेच्या आहारीं जाण्याची चूक सहसा करीत नाहीं. इतर लोकच काय पण खुद्द माझे निकटचे सहकारीसुद्धां मला कांहींसा कठोर समजत. एकदां देशबंधू दासांनीं अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटींत माझ्याबद्दल बोलतांना, ' मी थंड्या प्रवृत्तीचा आहे,' असा शेरा मारला होता. मला वाटतें तुलनेचीं जीं प्रमाणें ठरलीं आहेत त्यावर व त्याचप्रमाणें कांहींच्या भावना दुसऱ्यांपेक्षां किती अधिक प्रमाणांत व्यक्त होतात, यावर या सर्व गोष्टी अवलंबून असाव्यांत. तें कांहीं कां असेना, शिक्षा देण्यामागें जी कल्पना आहे, तिचा मला तिरस्कार वाटतो. विशेषतः दीर्घकालीन व मुद्दाम छळण्याकरितां ह्मणून दिलेल्या शिक्षांचा तर मला संताप येतो. सध्यांच्या कालांत, या शिक्षा अजिबात रद्द करणें शक्य नसेल, पण त्या कमी करणें किंवा त्यांना सौम्य स्वरूप देणें आणि त्यांत सहृदयता आणणें खात्रीनें शक्य आहे.

एके काळीं देहांतशासनाला माझा तीव्र विरोध होता व आजहि तत्वतः विरोध आहे.पण माझी आतां खात्री झाली आहे कीं,इतर कांहीं गोष्टी तर मृत्यूपेक्षांहि कितीतरी पटीनें वाईट. खुद्द माझ्यावर पाळी आली व शिक्षा पसंत करण्याचा प्रश्न माझ्यावरच सोंपविला तर मी जन्मठेपेपेक्षां मृत्यूची शिक्षाच बहुतेक पसंत करीन. पण त्याबरोबरच मला फांसावर लटकाविणें आवडणार नाहीं. मी सांगेन, मला गोळी घाला, शिरच्छेद करा किंवा झटपट मृत्यू येण्यासाठीं विद्‌युतप्रवाहाचा उपयोग करा. या सर्वांपेक्षांहि माझ्या मतें उत्तम उपाय ह्मणजे ग्रीक काळांतील सॉक्रेटीसप्रमाणें माझ्या हातांत विषाचा

पेला देणें. त्यामुळें मी कायमचा झोपी जाईन. ही शेवटची पद्धत मला सर्वांत सुधारलेली व सहृदय वाटते पण हिंदुस्थानांत फांसावर लटकाविण्याची पद्धत रुढ आहे. गेल्या वर्षीं तर कराची किंवा सिंधमध्यें कुठेंतरी अधिकाऱ्यांनीं जाहीररीत्या फांशीची शिक्षा अमलांत आणून आपली मनोवृत्ती कोणत्या तऱ्हेची आहे याचें प्रदर्शन केलें. पुढेंमागें गुन्हेगार होणाऱ्यांना दहशत बसविण्यासाठीं हें प्रदर्शन होतें. या प्रदर्शनाला एकाद्या प्रचंड मेळयाचें स्वरूप आलें व हजारो लोक हा अघोर प्रकार पहाण्यासीं गोळा झालें. पूर्वींची स्पॅनिश धर्मकोर्टांची चव्हाट्यावर शिक्षा अमलांत आणण्याची तऱ्हा व सध्यांचें हें सार्वजनिक शिक्षेचें प्रदर्शन यामागील मनोवृत्ती जवळजवळ एकच होय.

माझ्या एका मित्राला हायकोर्ट जज नेमण्यांत आलें. प्रथम जेव्हां एका माणसाला देहांत शासन फर्माविण्याची त्याला पाळी आली, तेव्हां त्याच्या मनांत मोठाच पेंचप्रसंग उद्भवला. त्याला ही कल्पना तिरस्करणीय वाटली. पण पुढें त्यानें तिचा सराव केला (करणें भागच होतें, नाहींतर नोकरी फार दिवस टिकली नसती,) आणि मला वाटतें, थोडीहि चलबिचल न होतां, लोकांना सूळावर पाठविण्यांत त्याला नंतर कांहींच वाटेनासे झालें. अर्थात असे न्यायाधीश अपवादादाखलच आढळून येतात. न्यायाधिशाच्या जागेवर असणाऱ्या किती लोकांच्या मनांत असा विकल्प संभवत असेल याची मला शंका वाटतें. कदाचित मृत्यूची शिक्षा फर्माविणें, हें ती अमलांत आलेली पहाण्यापेक्षां सोपं असावं. तरीहि लक्षांत घेण्याजोगी गोष्ट ह्मणजे हळव्या मनोवृत्तीच्या लोकांनासुद्धां पुढें पुढें असलीं दुःखदायक दृश्यें पहाण्याची संवय होते. माझ्या ओळखीचा आय. सी. एस. मधील एक तरुण इंग्लिश अधिकारी होता. नेमणुकीनंतर थोड्याच दिवसांनीं एका फांशीच्या वेळीं त्याला तुरुंगांत उपस्थित राहावें लागले. या पहिल्या फांशीच्या वेळीं

आपल्याला शिसारी आली व आपला सर्व दिवस वाईट गेला असें त्यानें मला सांगितले. पण पुढें हळुंहळूं अशा दृश्यांचा त्याच्यावर कसल्याहि प्रकारचा परिणाम होईनासा झाला. तो इतका निढावला कीं फांशीची शिक्षा पाहून आल्यावर तो सरळ घरीं जाऊन चमचमीत जेवायलाहि कमी करीत नसे.

फांशीची शिक्षा प्रत्यक्ष अमलांत आलेली मी कधींच पाहिलेली नाहीं. एका तुरुंगांतील अपवादात्मक असे तीन चार प्रसंग सोडले तर मी असलेल्या इतर बहुतेक तुरुंगात कोणाला फांशी देण्यांत आल्याचें दिसत नाहीं. वरील फांशी तुरुंगांपासून वेगळ्या अशा बंदिस्त जागेंत उरकून घेण्यांत आल्या, पण तुरुंगांतील लोकांना त्याची कुणकूण लागलीच. कारण त्या दिवशीं सकाळीं कोठड्यांची कुलुपें खोलण्यास नेहमींपेक्षां जरा उशीर झाला होता. सदर प्रसंगी मला एका विशिष्ट प्रकारचा अनुभव आला; जिकडे तिकडे भयाण शांतता पसरली होती व जो तो हलक्या आवाजांत बोले. खरं काय तें समजायला अर्थातच मार्ग नव्हता. कदाचित मी हें वर्णिलेलें वातावरण माझ्या कल्पनाशक्तीचा खेळ असूं शकेल.

माझा फांशीच्या शिक्षेला तीव्र विरोध असला तरी, त्याबरोबरच भयंकर प्रवृत्तीच्या माणसांचा नायनाट करण्याचें साधन असलें पाहिजे, असें मला वाटते. मात्र या साधनाचा विचारपूर्वक उपयोग केला गेला पाहिजे हें उघड आहे. देहांतशासन, त्याचप्रमाणें इतर शिक्षांना मूलतः आक्षेप घेतला जातो, त्याचें मुख्य कारण, त्यामुळें शिक्षा झालेल्या माणसाचें हाल होतात हे नव्हे; तर त्यामुळें जो वर्ग त्यांना संमति देतो तो आणि विशेषतः त्या अमलांत आणणाऱ्या व्यक्ती पाशवी बनतात, हें आहे. सध्यां हिंदुस्थानांत विशेष रुढ असलेल्या फटक्यांच्या शिक्षेच्या बाबतींत ही गोष्ट विशेष रीतीनें

आढळून येते. बलात्कार वगैरेसारख्या अघोर गुन्ह्यांकरितांच फटक्यांची शिक्षा देण्यांत येते, असें सरकारतर्फे समर्थन करण्यांत येतें. पण व्यवहारांत मात्र या शिक्षेचा बऱ्याच व्यापक प्रमाणांत उपयोग केला जातो. सन १९३२ मध्यें (पार्लमेंटमध्यें निवेदन केल्याप्रमाणें) कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतलेल्या ५०० बंदींना फटके मारण्यांत आले होते. हा झाला सरकारी आंकडा. तुरुंगांत ज्यांना फटके मारण्यांत आले, त्यांचा अनाधिकृत आंकडा यांत अंतर्भूत नाहीं. या बंद्यांना निव्वळ राजकीय गुन्ह्यांकरितां किंवा तुरुंगांतील शिस्त मोडल्याबद्दल हे फटके मारण्यांत आले, अत्याचार किंवा गुन्ह्यांबद्दल नव्हे. आतां तर, तुरुंगांतील अन्नसत्याग्रह वगैरेसारख्या गंभीर स्वरुपाच्या प्रकरणांत फटक्यांची शिक्षा द्यावी, असा नियम सरकारनें केला आहे. हा नियम करून ब्रिटीश सरकारनें असेंच दाखविले आहे कीं, अन्नत्याग किंवा तुरुंगांतील शिस्तीचा भंग यांत आणि बलात्कारासारखे गुन्हे यांत फरक नाहीं.

फटक्यांची शिक्षा अमलांत आणली जाते, ती बहुधां कोठल्या तरी खालच्या दर्जाच्या कैद्यांकडून. कोणत्याहि कैद्यालां हें काम आवडत नाहीं, पण तो त्याच्या पसंतीचा थोडाच प्रश्न असतो ! वरच्या वर्गांतील कैदी, हें कार्य करायचे अर्थातच नाकारतात, अितकेंच काय पण वॉर्डरसुद्धां तें करायला नाखूष असतात. माझ्या पहाण्यांतील अेक अुदाहरण देतो. अेका वॉर्डरला फटके मारावयास सांगण्यांत आले. त्यानें स्पष्ट नकार दिला व हुकूम मोडल्याबद्दल त्याला शिक्षा करण्यांत आली. फटक्याची शिक्षा ठोठावणारे आमचें न्यायाधिकारी व तुरुंगाधिकारी व सदर शिक्षेला संमति देणारे अितकेंच नव्हें तर तिचें समर्थन करणारे सरकार यांच्या वृत्तीशी कैदी व वॉर्डर यांच्या या हळवेपणाची तुलना करणें खास अुद्‌बोधक आहे.

नुकतीच मी ब्रिटनमधील चित्रपट नियंत्रणाबद्दलची माहिती वाचली. निर्दय असे देखावे चित्रपटांत येअूं न देणं हा नियंत्रणांतील मुख्य भाग आहे

B. S असें त्यांत म्हटलें होतें. चित्रपटांत जनावरांची हत्या दाखवायची नाहीं. ज्या चित्रपटांत जनावरांचें दुःख किंवा यातना मग त्या न कळत किंवा मुद्दाम दाखविलेल्या असोत, अशा चित्रपटांना बंदी असते. अशा दृश्यांमुळें प्रेक्षकांच्या विशेषतः मुलांच्या मनांवर वाओीट परिणाम होतो व नीतिमत्ता बिघडण्यास मदत होते, असें मानलें जातें.

हिंदुस्थानांत चित्रपट-नियंत्रक मंडळें असून, जनावरांच्या बाबतींतील क्रोयाला आळा घालण्याकरितां काम करणारी अेक संस्थाहि आहे. खेदाची गोष्ट ही कीं, मनुष्यमात्रांचा समावेश त्या प्राण्यांमध्यें होत नसल्यामुळें या संस्थेचा फायदा त्यांना मिळूं शकत नाहीं आणि आमच्या चित्रपट-नियंत्रक मंडळाबद्दल तर बोलावयासच नको. ' क्वेटा भूकंप ' ' राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांतील देखावे ' ' महात्मा गांधींचें गोलमेज परिषदेस प्रयाण ' वगैरेंसारख्या भयंकर (!) वार्तापटांनाहि येथें बंदी होते.

फांशी व फटक्यांची शिक्षा यामुळें आपल्या मनावर प्रतिकूल परिणाम होअून विषाद वाटणें सहाजिकच आहे. पण कोर्टांनीं शिक्षा दिलेल्या हजारो लोकांपैकीं फारच थोडे लोक अशा सदरांत येतात. तुरुंगात जाणाऱ्यांपैकीं मोठी संख्या अशाच लोकांचीच असतें कीं ज्यांना दीर्घ मुदतीची शिक्षा झालेली असतें. ही शिक्षा म्हणजे सदैव जाचणी किंवा असीम यातना. तीमुळें मन अुदास होतें आणि शरीर बधीर बनतें.आपले तुरुंग व फौजदारी कायद्याची घातकीं निष्पति म्हणजे गुन्हेगार प्रवृत्तीचा माणूस तयार होतो. हा मनुष्य तुरुंगांबाहेरच्या सामाजिक रचनेंत बसूं शकत नाहीं. कुठेंहि गेला तरी तो अडगळीप्रमाणें वाटतो. त्याला आधार नसतो, घर नसतें, प्रत्येकाचा त्याला संशय येतो व प्रत्येक ठिकाणीं त्याचा संशय घेतला जातो. शेवटीं हा दुर्दैवी प्राणी आपल्या अेकमेव विश्रांति गृहांत--तुरुंगांत पुन्हां येअून दाखल होतो. तेथील त्याचा विश्वासू सहकारी म्हणजे पत्र्याचा किंवा लोखंडाचा वाटगा. अशा रितीनें आपल्या अेकाद्या कृत्याचें किंवा निर्णयाचें अपरिहार्य परिणाम काय होतात, याचें संशोधन करण्याचा आमच्या न्यायाधीशांनी कधीं प्रयत्न केला आहे काय ? आपलीं कोर्टें व तुरुंग

म्हणजे गुन्हेगार जात तयार करण्याचें व गुन्हेगार जात म्हणून शिक्के मारण्याचें मुख्य कारखानें होत, याची जाणीव त्यांना कधींतरी झाली आहे काय ?

तुरुंगांत गेल्यानंतर अनुशासन संस्थेचा मूलभूत पाया कोणता हें विशेष रीतीनें कळून येते. पाशवी शक्ती, जबरदस्ती, व अत्याचार हेंच राज्यकर्त्यांचे आधारस्तंभ होत. ' सरकार म्हणजे समंजसपणा नव्हे, गोडवा नव्हे. सरकार म्हणजे पाशवी शक्ती ! सरकार म्हणजे विस्तवासारखा घातकी चाकर व भयानक मालक होय, ' असें जॉर्ज वॉशिंग्टननें म्हटलें आहे. सहकार्य, सतत प्रयत्न, व हजारों मार्गांनीं व्यक्त होणारा आपपरभाव यामुळें संस्कृति अुभारली जाते. पण आणिबाणीची परिस्थिती अुद्भवली किंवा सरकारला कोणत्या तरी संकटाची भीति वाटूं लागली कीं ही वरची अिमारत ढासळतें. निदान जुल्म व अत्याचार या मार्गांनीं स्वसंरक्षण करणें हें जें सरकारचें धोरण त्यापुढें संस्कृतीला गौणत्व येअून सैन्य, पोलीस व तुरुंग या त्रयीला विशेष महत्व प्राप्त होते. या तिन्हीपैकीं तुरुंग म्हणजे अनुशासन संस्थेची सर्वांत नागवी प्रतिकृति असें म्हणावयास हरकत नाहीं.

खरंच अनुशासन संस्था, सदैव जुल्म व जबरदस्ती यावरच आधारलेली असली पाहिजे ? अथवा ही घातकी प्रवृत्ति क्रमीत कमीं जवळजवळ नामशेष झाली आहे, असा दिवस अुगवणार आहे ? असा दिवस कधींकाळीं यायचा असला तरी फार दूर आहे. मध्यंतरी ज्या लोकांना ही अनुशासन संस्था अुखडून काढावयाची असते, असे दुसरे गट, राजकर्त्यांच्या जुल्माचा प्रतिकार जुल्मानें करावयास पुढें सरसावतात. जुलुमामुळें जुलुम वाढत जातो व अेक अनिष्ट चक्र फिरूं लागते. नैतिकदृष्ट्या हे दोन्ही प्रकारचे जुल्म सारखेंच टाकावू असतात. मला चमत्कारीक वाटते तें हें कीं जें सरकार स्वतः आत्यंतिक जुलुमावर अुभारलेले आहे, ते सरकार अितरांच्या जुलुमजबरदस्तीविरुद्ध नैतिक आक्षेप कसा घेअूं शकते ? स्वसंरक्षणाच्या मुद्द्यांवर सरकारला असा आक्षेप फारतर घेतां येअील.पण नैतिक तत्वांना त्यांत ओढण्याची काय जरुरी ? मला मान्य आहे कीं,सरकारी जुलुम खासगी जुलुमांपेक्षां अनेकदृष्ट्या ग्राह्य ठरतो.

अनेक किरकोळ जुलुमांपेक्षां अेक मोठा जुलुम पुष्कळ बरा. दुसरी गोष्ट म्हणजे सरकारचा जुलुम कमीअधिक प्रमाणांत शिस्तीचा जुलुम असतो. या दृष्टीनेंहि तो खासगी गटांच्या व व्यक्तींच्या अनागोंदी जुलुमांपेक्षां ग्राहय होय. जुलुम व जबरदस्तीची सत्ता यामुळें सरकार अधिक प्रभावी होते ही गोष्ट सोडली तर-- अनागोंदी जुलमापेक्षां शिस्तीचा जुलुम पुष्कळच बरा. पण जेव्हां सरकारच स्वतः बेजबाबदारपणें वाटेल तसें अत्याचार करूं लागते, तेव्हां मात्र परिस्थिति भलत्याच थराला जाते. कोणत्याहि खाजगी गटाला किंवा व्यक्तीला कधींच करतां येणार नाहीं, अितके अमानुष व पाशवी चाळे करून सरकार कळस करतें.

'कमलिनीचा जन्म चिखलांतच होतो,' असें नित्सी म्हणतो. खरं कां हें ? दुसरा कांहींच मार्ग नाहीं कां ? भूतदयेनें प्रेरित झालेल्या मनुष्यापुढें नेहमीं तीच तीच जुनीं अडचण अुभी राहातें.पण पाशवी सत्ता, हिंसा व क्रौर्य याविषयीं मनांत तिरस्कार असल्यामुळें तुसतें निष्क्रीय व स्वस्थ राहून भागणार नाहीं, हेंहि त्याला दिसत असते. अर्न्स्ट टॉलरच्या नाटकांत हेंच प्रतिपादन करण्यांत आलें आहे.

The sword as ever is a shift of fools
To hide their folly.
By force the smoky torch of violence,
We shall not find the way.

(आपला मूर्खपणा लपविण्याचं मूर्खांचे नेहमींचें साधन म्हणचे तरवार, हिंसेची काजळलेली ज्योत म्हणजे जबरदस्ती, पण तींमुळें आपल्याला माग दिसणार नाहीं.)

आज जिकडेतिकडे जुलुमजबरदस्तीचें साम्राज्य दिसत आहे. फक्त आपल्या देशांतच तेवढा पाशवी शक्तीशिवाय अितर मार्गांनीं त्यांना आळा घालण्याचा अुदात्त प्रयत्न चालू आहे. या प्रयत्नाची अंतिम फलश्रुती अंधःकारांत दडलेली असेल, पण भाग्याची गोष्ट ही कीं, त्या प्रयत्नामागील चेतन्य व ज्या महान

पुढाऱ्यानें आपल्या अनुपम विशुद्ध दृष्टीकोनानें आम्हांला खोल गर्तेंतून वर काढलें, त्याची स्फूर्ति अद्यापहि आमच्या पाठीशीं आहे.

पण हें झालें भव्य प्रश्न. न्यायाधिशांच्या शक्तीपलिकडेच आहेच तें कदाचित आम्हांला आमच्या हयातीत त्यांना उत्तर मिळणार नाहीं; व मिळालें तरी उच्छृंखलपणें वहावत चालल्लेल्या मनुष्यजातीवर आपण तें बिंबवूं शकणार नाही. मध्यंतरीच्या कालांत अनेक छोटेछोटे प्रश्न आमच्यापुढे उभें आहेत, त्याकडे आपल्याला दुर्लक्ष करतां येत नाहीं. न्यायाधिश-- तुरुंगाधिकारी यांना निदान अेवढें तरी आपल्याला खात्रीनें सांगतां येअील कीं, जाणून बुजून मानसिक व शारिरीक शासन करणें व टोंचणी लावणें हा सुधारण्याचा मार्ग नव्हें. त्यामुळें कदाचित कैदी चिरडला जाअील किंवा त्याला पीळ पडेल पण त्याच्यांत सुधारणा होणार नाही. उलट त्यामुळें शिक्षा सुनावणाराच पाशवी व नैतिकदृष्ट्यां विरुप होण्याचा संभव. वाढतें क्रोध व टोंचणी याचें अपरिहार्य पर्यवसान म्हणजे शिक्षा झालेला व शिक्षा देणारा या दोघांचीहि अधोगति होते.

मॉडर्न रिव्ह्यू, कलकत्ता, १९३५.

रस्त्यावरील एक प्रसंग

सर्व दिवसभर चिक्कार सभा व मिरवणुकी झाल्या होत्या. आंबालाहून आम्ही जे निघालो तें कर्नाळ, पानपत, सोनपत अशीं गांवें घेत रोहटकला आलों. शेवटीं अेकदांचा पंजाबचा धामधुमीचा व गर्दीचा दौरा संपला. मी सुटकेचा निश्वास सोडला, माझ्या श्रांत शरीरावर निद्रादेवीची छाया पडूं लागली. या निद्रेंतून लवकर जागें होण्याची अर्थातच आशा नव्हती.

रात्र झाली. रोहटकहून आम्ही दिल्लीला भरधांव निघालों. दिल्लीला जाअून आम्हांला रात्रीची गाडी पकडावयाची होती. पण रस्त्यांत अेकदम मोटारीला ब्रेक लावावा लागला. आमचा रस्ता आडवूनच स्त्री-पुरुषांचा अेक जमाव बसला होता. कांहींच्या हातांत मशाली होत्या. मोटार थांबल्यावर सारेजण आमच्याभोंवती गोळा झाले. आम्ही कोण आहोंत, याची त्यांनीं खात्री करून घेतली. आमच्याकरितां बिचारे तेथें दुपारपासून थांबले होते. हे सर्व लोक जाट असून, त्यांच्यापैकीं बहुतेक शेतकरी होते, त्यांना चार शब्द सांगितल्याशिवाय पुढें जाणेंच शक्य नव्हतें. आम्ही मोटारींतून खाली अुतरलों व साधारणतः अंधःकारांतच त्या हजारों जाटांच्या समुदायांत बसलों.

"स्वामी नारा" अेक कोणीतरी म्हणाला, आणि त्या हजारों लोकांनीं अेकमुखानें 'वंदे मातरम्' असा अुच्च स्वरांत त्रिवार जयघोष केला. या घोषानंतर 'भारतमाता कीं जय' वगैरे घोषणा पुकारल्या गेल्या.

" हे-वंदे मातरम्, भारतमाता कीं जय म्हणजे आहेत काय प्रकार ? " मी त्यांना विचारलें.

अुत्तर नाहीं. सर्वांनीं माझ्याकडे पाहिलें व नंतर अेकमेकांच्या तोंडाकडे ते पाहूं लागले. माझ्या प्रश्नामुळें ते थोडेसे बावरल्यासारखे झाले. मी त्यांना पुन्हां विचारलें, ' तुम्हाला या घोषणा पुकारून काय दर्शवावयाच होतं ? " तरीहि अुत्तर नाहीं. त्या भागांतील कॉंग्रेस कार्यकर्ता थोडासा अस्वस्थ झाला. तो स्पष्टीकरण करण्याकरितां पुढें आला, पण मी त्याला प्रोत्साहन दिलें नाहीं.

" जिला तुम्ही वंदन केलं, जिचा जयघोष केला, ती माता आहे कोण ? " मी पुन्हां पुन्हां विचारलं. तरीहि ते स्तब्धच. गोंधळून गेले होते ते. त्यांना पूर्वीं असले चमत्कारीक प्रश्न कोणीच विचारलें नव्हते. सर्व गोष्टी गृहित धरून चालावयाच्या, घोषणा करा म्हटलं कीं करावयाच्या, ही वृत्ती समजावून घेण्याचा मुळीं प्रयत्नच नाहीं. खरंच कॉंग्रेसवाल्यांनीं घोषणा करा. यला सांगितल्या म्हणून त्या अितक्या अुच्च स्वरानें व कां केल्या जाव्यात ? घोषणा चांगल्याच असल्या पाहिजेत म्हणून ? या घोषणांमुळें आपल्या मनाला आनंद वाटून शत्रूंवर अेक प्रकारची विषण्णतेची छाया येत असावी, हीहि भावना त्यांत असावी.

तरीहि मी प्रश्न विचारण्याचें सुरू ठेविलें. शेवटीं अेक अिसम मोठे धाडस करून पुढें आला. ' माता म्हणजे धरित्री, ' तो म्हणाला. बिचारं खेड--वळ मन. आअी व कृपादात्री अशा भूमीकडे वळलं.

' धरित्री पण कुठली ? तुमच्या गांवांतील, पंजाबमधील कीं साऱ्या जगांतील ? ' मी पुढें विचारलें.

माझ्या पेंचांत टाकणाऱ्या प्रश्नामुळें, ते पुन्हां विचारांत पडले, त्यांचा आणखी गोंधळ अुडाला, आणि नंतर अनेकांनीं अेक आवाजानें या सर्व गोष्टींची

माहिती सांगण्याबद्दल मला आग्रह केला. त्यांना या गोष्टी माहित नव्हत्या व माझ्याकडून त्या समजावून घेण्याची अिच्छा होती. मी सांगू लागलों:

" आपला हा देश म्हणजे भारत किंवा हिंदुस्थान. अुत्तरेकडे काश्मीर-हिमालयापासून, तों दक्षिणेकडे लंकेपर्यंत हा देश पसरला असून, त्यांत पंजाब, बंगाल, मुंबअी, मद्रास वगैरे मोठमोठे प्रांत येतात. या अफाट देशांत तुम्हां-सारखेच लाखों शेतकरी रहातात. तुम्हां सर्वांपुढील :प्रश्न सारखेच आहेत. सर्वांवर अेकाच प्रकारचं ओझं आहे. देशांत भेसूर दारिद्र्य व दुःख पसरलेलं आहे. आपला हा देश म्हणजेच, त्यांत रहाणाऱ्या आपणां सर्वांची भारतमाता. आपण तिचीं लेकरें आहोंत. भारतमाता म्हणजे चित्रांतून पुष्कळ वेळां रंगवितात त्याप्रमाणें अेकादी सुंदर व जमिनीपर्यंत जिचें केंस रुळत आहेत, अशी स्त्री नव्हे.

" भारतमाता कीं जय ! कोणाचा जय व्हावा अशी आपण घोषणा करतो ? जी सत्यसृष्टींत नाहीं, अशा अेका काल्पनिक स्त्रीचा खास नव्हे. मग जय कोणाचा ? हिंदुस्थानांतील डोंगर, नद्या, वाळवंटें, झाडें, दगड यांचा ? "

' नाहीं. ' सर्वजण अेकदम म्हणाले, पण त्यांना ठाम असें कांहींच अुत्तर देतां येअीना.

" अर्थात आपला हा जय हिंदुस्थानांतील लोकांचा. आपल्या शहरां-खेड्यांतून जे लाखों लोक रहातात त्यांना अुद्देशून आहे. ' मी निवेदन करू लागलो. माझं निवेदन त्यांना समाधानकारक वाटलं व तेंच बरोबर आहे, हेंहि त्यांना पटलें.

मी पुढें सांगू लागलो.

" हे लोक कोण ? अर्थात तुम्ही व तुमच्यासारखेच अितर लोक, आणि म्हणून ज्यावेळीं तुम्हीं भारत माता कीं जय म्हणून घोषणा करतां त्यावेळीं तो तुमचा व त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील तुमच्यासारख्या लाखों बंधू-भगिनींचा

जय असतो. लक्षांत ठेवा भारतमाता म्हणजे तुम्ही व हा खुद्द तुमचाच जय आहे. ' माझं म्हणणं ते लक्ष देऊन अैकत होतें. त्यांच्या मंद खेडवळ बुद्धीवर मोठाच प्रकाश पडल्यासारखा दिसला. जी घोषणा आपण आतापर्यंत करीत आलो, तिचा संबंध आपल्याशी— रोहटक जिल्ह्यांतील गरीब जाट शेत-कऱ्यांशीं— आहे, ही कल्पनाच त्यांना अपूर्व वाटली. होय तो त्यांचा जय होता. मग चला आपण सर्वजण अेकजुटीनें व मनापासून कळकळीनें घोषणा करूंया. भारतमाता की जय!

आणि त्यानंतर अंधःकारांतून मार्ग काढींत आमची मोटार दिल्ली शहरांत आली. आम्ही आगगाडी पकडली; मी दीर्घ निद्रेच्या आहारीं गेलो.

त्रिवेणी, मद्रास, १९३६.

इंदिरेस शेवटचें पत्र

अिंदु, माझं दीर्घ प्रवचन संपलं, मला आतां पुढं लिहावयाची गरज नाहीं. पण थोडासा रोमांचकारी शेवट करण्याच्या मोहानें मी हें आणखी अेक पत्र लिहीत आहे. शेवटचें पत्र !

तसं पाहिलं तर मला आतां संपविणंच भाग होतं. माझी दोन वर्षांची शिक्षेची मुदत संपत आली आहे. आजपासून तेहतीस दिवसांनीं--जेलरच्या म्हणण्याप्रमाणें त्याच्या अंत नसली तरी–माझी सुटका होअील. वस्तुतः दोन वर्षं अद्याप पुरी झालेलीं नाहींत. पण तुरुंगात चांगलं वागल्याबद्दल कैद्यांना शिक्षेंत जी माफी मिळतें, त्याप्रमाणें मला साडेतीन महिन्यांची माफी मिळाली आहे. मी म्हणे तुरुंगांत चांगलं वागलों, पण चांगल्या वर्तणुकीचं शिफारसपत्र मिळण्याजोगं मी काय केलं तेंच मला समजत नाहीं. माझी सहावी शिक्षा अशा रीतीनें संपल्यावर मी पुन्हां अुघड्या जगांत प्रवेश करीन. पण कशा-करितां ? चमत्कारीक नव्हें कां हें ? माझे बहुतेक मित्र आणि सहकारी अद्याप तुरुंगांत खितपत आहेत आणि सारा देश जणू काय अेक मोठा तुरुंग बनल्या-सारखा दिसतो.

आतांपर्यंत मी पत्रांचा केवढा मोठा ढीग लिहला आहे ? आणि किती शाअी आणि कागदाची अुधळपट्टी केली आहे ? खरंच या अुधळपट्टीचा अुपयोग होता कां ? हे कागद आणि शाअी तुला अुद्‌बोधक असा अेकादा

संदेश नेअून पोहोंचवतील कां ? तूं अर्थात ' हो ' म्हणशील. तुला वाटेल कीं, दुसरं कोणतांही अुत्तर दिलं तर मला दुःख होअील, आणि माझ्याविषयींचं तुझं प्रेम तुला असं करून देणार नाहीं. पण तुला कांहीं कां वाटेना, या दोन वर्षांच्या दीर्घ कालांत दिवसांमागून दिवस हीं पत्रें लिहीत असतांना मला जो आनंद वाटे, तो तुला नाकारतां येणार नाहीं. मी येथें आलों, तेव्हां हिंवाळा चालू होता. हिंवाळा गेला आणि वसंत ऋतू आला, पण अल्पकालांतच प्रखर अुन्हाळ्यापुढें त्याला पराभूत होअून पलायन करावं लागलं; आणि प्रखर अुष्णतेनं करपून निघालेली भूमाता रखरखीत झाली असतां व मनुष्यमात्र आणि सारी पशुसृष्टी धापा टाकीत असतांच, वर्षाकाळ नवीन आणि थंडगार जलधारांचें भूमातेवर स्वैर सिंचन करूं लागला. त्यानंतर हेमंत ऋतू आला. निरभ्र स्वच्छ आकाश व आल्हाददायक दोनप्रहरी हें हेमंताचें वैशिष्ठ्यवर्षांचं हें चक्र सतत चालूंच आहे. हिंवाळा, वसंत, अुन्हाळा आणि पावसाळा. अिवू, तुला लिहण्याकरितां मी येथें बसलों आहे. मनांत तुझेच विचार चालू असतांना, दृष्टीसमोरून अेकामागून अेक ऋतू भराभर गेले आणि आतां माझ्या बराकीच्या छपरावर पावसाचे थेंब टपटप गळत आहेत.

O doux bruit de la pluie,
Par terre et sur les toits !
Pour un coeur qui s' ennuie,
Oh ! le chant de la pluie !

(आकाशांतून भूमातेच्या अंकावर अुडी घेणाऱ्या पर्जन्यधारांचा मंजूळ निनाद म्हणजे वांच्छिताला टवटवी आणणारे संगीतच !)

बेंजामीन डिझरायली हा अेकोणीसाव्या शतकांतील महान अिंग्लिश मुत्सद्दी म्हणतो, " हद्दपारी व बंदीवासाची शिक्षा झालेले बहुतेक लोक जरी त्यांतून शिरसलामत बाहेर पडले तरी पुढें निराशेंत व्यग्र होतात. केवळ साहित्यिकांना हाच काल आपल्या आयुष्यांतील अत्यंत मधूर काल वाटणें संभवनीय

आहे. " सतरांव्या शतकांतील प्रख्यात डच कायदेपंडीत व तत्वज्ञानी ह्यूगो ग्रॉशस याला अुद्देशून, डिझरायलीनें हे अुद्‌गार काढले आहेत. ह्यूगोला जन्मठेपीची शिक्षा झाली होती, पण दोन वर्षांतच त्यानें आपली सुटका करून घेतली. तुरुंगांतील हीं दोन वर्षें त्यानें तत्वज्ञान व साहित्य-सेवेंत घालविलीं. ह्यूगोशिवाय आणखी कितींतरी प्रसिद्ध साहित्यिकांना तुरुंग-वास भोगावा लागला. 'डॉन क्विक्झॉट'चा लेखक करव्हॅन्टीस व 'दि पिलग्रीम्स प्रॉग्रेस' चा लेखक जॉन बन्यन हे अनुक्रमें सर्वख्यात स्पॅनिश व अिंग्लिश साहित्यिक त्यापैकींच होत.

मी अर्थात साहित्यिक नाही व तुरुंगवासांत काढलेला काल म्हणजे माझ्या आयुष्यांतील मधुर काल होता, असं म्हणायलाहि मी तयार नाहीं. तुरुंगांतील जीवन सह्य होण्यास मला लेखन व वाचनाची अपेक्षेबाहेर मदत झाली आहे, हें मात्र सत्य आहे. मी साहित्यिक नाहीं व अितिहासकारहि नाहीं; मग माझा धंदा काय ? या प्रश्नाचें अुत्तर देणं कठीण आहे. आतांपर्यंत मी कितीतरी गोष्टींत लुडबुड केली आहे; कॉलेज-शिक्षणाला मी शास्त्रीय विज्ञानाने प्रारंभ केला, त्यानंतर कायद्याकडे वळलो आणि शेवटीं हिंदुस्थानांतील लोक-प्रिय व व्यापक असा तुरुंगांत जाण्याचा धंदा पत्करला.

तूं असं समजूं नकोस कीं, मी या पत्रांतून जें कांहीं सांगितलं आहे, तें म्हणजे त्या त्या विषयावरील वेदवाक्यच. राजकारणी माणसाला प्रत्येक विषयावर कांहींतरी म्हणावसं वाटतं, आणि आपल्याला आहे त्यापेक्षां अधिक माहिती असल्याचं तो ढोंग करतो. अशा माणसावर डोळ्यांत तेल घालून नजर ठेविली पाहिजे. माझीं हीं पत्रें म्हणजे वरवरचीं शब्दचित्रें, त्यांना जोडणारा धागा बारीक आहे. मी बरेंच ठिकाणीं वहावत गेलो, शेंकडों वर्षांचा काल व कितीतरी महत्वाचे प्रसंग गाळले. याअुलट मला जी गोष्ट अुद्‌बोधक वाटली, तीवर मी दीर्घ काळ तळ ठोकला. तुला आढळून येअील की, माझ्या आवडीनिवडी आणि त्याचप्रमाणें तुरुंगांतील माझ्या विवक्षीत मनोवृत्तीचे स्पष्ट प्रतिबिंब त्यांत पडलें आहे. मी सांगितलेली सर्वच हकिकत तूं गृहित धरून चालूं नयेस,

तींत कितीतरी चूका असण्याचा संभव आहे. ग्रंथालय नाहीं व हातांशीं संदर्भ-ग्रंथहि नाहींत, असा तुरुंग ऐतिहासिक विषयांवर लिहिण्याला सर्वोत्कृष्ट स्थान खास होऊं शकत नाहीं. गेल्या बारा वर्षांत मी तुरुंगाच्या वाऱ्या करावयास सुरवात केल्यापासून जीं कित्येक टिपणें लिहलीं, त्यावरच मला संदर्भाकरितां बऱ्हंशीं अवलंबून रहावं लागलं. येथें माझ्याकडे पुष्कळ ग्रंथ आले, पण ते जसें आले तसेच गेले. कारण अिथं पुस्तकांचा संग्रह करणं शक्य नव्हतं. या पुस्तकांतील कितीतरी गोष्टी व कल्पना मी अगदी निर्लज्जपणें घेतल्या. मी जें कांहीं लिहलं आहे. त्यांत नवीन असं कांहींच नाहीं. कदाचित कांही प्रसंगी तुला माझीं पत्रें कळायला अवघड वाटली असतील, तेवढा भाग बेलाशक सोडून दे. कधी कधी माझ्यांतील प्रौढत्व जागें होअी आणि त्यामुळें मी जें लिहायला नको होतं तेंच लिहून जाअी.

मी तुला अितिहासाची अगदींच ढोबळ रुपरेखा सांगितली आहे; पण हा अितिहास नव्हे, भूतकाळाचीं धांवतीं चित्रें आहेत तीं. तुला जर अितिहास आवडत असेल, तर गतयुगाचे धागेदोरे उकलणारे कितीतरी ग्रंथ तुला मिळू शकतील. पण नुसतं वाचून कांहीं अुपयोग नाहीं. भूतकाल समजून घ्यावयाचा असेल तर त्याकडे सहानुभूति व समजुतीच्या दृष्टीनें पाहिले पाहिजे. फार पूर्वी होअून गेलेल्या माणसांची जर तुला माहिती करून घ्यावयाची असेल तर, त्यांच्या सभोंवारचें वातावरण, त्यावेळची परिस्थिती आणि त्यांच्या कल्पना या समजावून घेतल्या पाहिजेत. पूर्वीचें लोक सध्यांच्या काळांत वावरत आहेत, त्यांचे विचार आपल्यासारखेच आहेत असें समजून त्यांच्यासंबंधी मत देणें हांस्यास्पद आहे. आज कोणीहि गुलामगिरीचें समर्थन करीत नाहीं, पण प्लेटोसारखा थोर पुरुष गुलामगिरी आवश्यक आहे असें म्हणे. अगदीं अलीकडच्या काळांतहि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत गुलामगिरी कायम राखण्याकरितां हजारों लोकांनीं बलीदान केलें आहे. वर्तमानकाळाचीं अनुमानें आपण भूतकाळाला लावितां कामां नयेत; प्रत्येकजण ही गोष्ट खुषीनें मान्य करतो. पण भूतकाळाचें निष्कर्ष वर्तमानकाळाला लाविणें तितकेंच हास्यास्पद आहे, हें

मात्र प्रत्येकजण कबूलच करील असं नाहीं. निरनिराळ्या धर्मांनीं, विशेषतः जुन्या समजुती, श्रद्धा, चालिरीती अधिक दृढ करण्यास मदत केली आहे. ज्या काळांत आणि ज्या देशांत या धर्माचा उदय झाला, त्या काळांत आणि त्या देशांत त्यांचा उपयोगहि झाला असेल, पण आतांच्या आपल्या काळांत, त्या अगदींच निरर्थक आहेत.

म्हणून गत इतिहासाकडे तूं जर सहानुभूतीच्या दृष्टीनें पहाशील तर तुला आढळून येईल कीं, इतिहासाच्या सांगाड्यांत रक्तमांस भरून जीवन संचारलें आहे. तसेंच आपल्या नजरेसमोरून प्रत्येक काळांतील व देशांतील स्त्री-पुरुषांचें अपूर्व संचलन चालू असल्याचाहि भास तुला होईल. आपल्यापेक्षां वेगळीं अशीं हीं माणसं, तरीहि त्यांच्यांत व आपल्यांत किती साम्य! सगळ्यांतच बव्हंशी तेच मानवी गुणदोष आढळून येतात. इतिहास म्हणजे जादूचा खेळ नव्हे, पण ज्यांना डोळे आहेत, त्यांना त्यांत भरपूर जादू आढळून येईल.

इतिहासाच्या वस्तुसंग्रहालयांतील असंख्य चित्रें आपल्या डोळ्यांसमोरून भराभर जातात. इजिप्त– बाबीलोन– निनेवेह– प्राचीन हिंदी संस्कृति– आर्यांचें हिंदुस्थानांत आगमन व त्यांचा सर्व यूरोप आशियाभर झालेला प्रसार– चिनी संस्कृतीची आश्चर्यकारक हकिगत- नासोस व ग्रीस- बादशाही रोम व बायझन्टीयम–अरबांचा आशिया व यूरोप खंडातील विजयी मोर्चा– हिंदी संस्कृतीचें पुनरुज्जीवन व ऱ्हास– फारशी ज्ञात नसलेली अमेरिकेंतील मय व आझटेक संस्कृति– मोंगलांच्या प्रचंड मोहिमा– यूरोपांतील मध्ययुग व त्या काळांतिल अजब गोथीक प्रार्थनामंदिरें– इस्लामचें हिंदुस्थानांत आगमन व मोंगल साम्राज्य– पश्चिम यूरोपांतील कलाविद्यांचें पुनरुज्जीवन– अमेरिकेचा शोध व पूर्वेकडील समुद्रमार्ग– पौर्वात्यावरील पाश्चिमात्यांच्या आक्रमणास प्रारंभ– मोठ्या यंत्राचें आगमन व भांडवलशाहीचा विकास– औद्योगिकर-

णाचा विस्तार– यूरोपियनांचें वर्चस्व आणि साम्राज्यशाही– आणि आधुनिक जगांतील शास्त्रीय विज्ञानाचे चमत्कार.

मोठमोठीं साम्राज्यें उदयास आलीं व ऱ्हास पावलीं. हजारों वर्षे उलटली तरी माणसांना त्यांची जाणीवसुद्धां नसते. शेवटीं भूमीगत गडप झालेल्या या साम्राज्यांचे अवशेष संशोधकांना चिकाटीनें खोदून काढून प्रकाशांत आणावे लागतात. याउलट कितीतरी विचार आणि कल्पना या कालप्रवाहांतून टिकल्या असून, साम्राज्यापेक्षांहि त्या अधिक खंबीर व चिरस्थायी ठरल्या आहेत. मेरी कॉलरीज आपल्या एका कवितेंत ह्मणते,

"इजिप्तचें सामर्थ्य नष्ट झालें, काळाच्या प्रवाहांत त्याची स्मृतिहि राहिलेली नाहीं. ग्रीसचा ऱ्हास झाला, ट्राय नगरीहि नष्ट झाली. भाग्यशाली रोमचा मुगुट गेला आणि व्हेनिसचा डौल अंशमात्रहि शिल्लक नाहीं. पण तेथील माणसांची स्वप्नें ? त्यावेळचीं ती चंचल व पोकळ सांवलीप्रमाणें आभासात्मक व शेख महंमदी वाटणारीं स्वप्नें आजहि कायम आहेत."

भूतकाळापासून आपल्याला कितीतरी गोष्टी संपादन करतां आल्या; वस्तुतः संस्कृति, सुधारणा, शास्त्रीय विज्ञान किंवा कांहीं प्रमाणांत कां होईना सत्यदर्शन वगैरे आज आढळून येणाऱ्या गोष्टी त्या प्राचीन किंवा नजीकच्या भूतकाळापासूनच मिळाल्या आहेत. भूतकाळाचें ऋण आपण अर्थातच मान्य केलें पाहिजे. पण आपल्या कर्तव्याची किंवा ऋणाची समाप्ती तेथेंच होतां कामा नये. भविष्यकाळाविषयींहि आपलें कांहीं कर्तव्य आहे आणि भविष्यकाळाचें आपल्यावरील ऋण भूतकाळापेक्षांहि मोठें ठरेल. कारण भूतकाळ तो भूतकाळ. तो गेला, त्यांत आपण बदल करुं शकत नाहीं; भविष्यकाळ यावयाचा आहे व आपण तो थोडाफार बदलूं शकूंहि. जर

भूतकाळानें सत्याचे कांहीं पैलू आपल्या नजरेस आणलें असतील तर भविष्य काळानेंहि आपल्यापासून बरेच पैलू लपवून ठेविले आहेत. त्यांचा आपल्याला शोध करावयाचा आहे. पण भूतकाळाला भविष्यकाळाविषयीं मत्सर वाटत असल्यामुळें कीं काय तो आपल्याला मगरमिठींत धरून ठेवतो. भविष्य-काळाला तोंड देण्याकरितां व त्याकडे प्रगति करण्याकरितां, आपण झगडून या मगरमिठींतून सुटका करुन घेतली पाहिजे.

इतिहासापासून आपल्याला पुष्कळ धडे घेतां येतात, असें कांहींचे म्हणणें आहे, तर इतिहासाची पुनरावृत्ति कधींच होत नाहीं,असेंहि कांहींजण म्हणतात. दोन्ही बरोबर आहे; इतिहासाची नुसत्या गुलामी वृत्तीनें नकल करुन, किंवा त्याची पुनरावृत्ति होईल अगर तो स्थीर राहील, अशी आशा करुन आपल्याला कांहींच शिकतां येणार नाहीं; याउलट इतिहासाचे सूक्ष्म अवलोकन किंवा इतिहासाला गती देणाऱ्या प्रवृत्ती शोधण्याचा प्रयत्न करुन आपल्याला कांहींतरी धडे घेतां येतील. कार्ल मार्क्स म्हणतो, " इतिहास जुन्या प्रश्नांची, उत्तरें देतांना नवीन प्रश्न उभे करतो. "

पूर्वीचे दिवस श्रद्धेचे--अंध आणि निसंदिग्ध श्रद्धेचे होते. गेल्या अनेक शतकांत जीं आश्चर्यकारक देवालयें, मशिदी आणि प्रार्थनामंदिरें बांधलीं गेलीं, तीं तात्कालीन शिल्पकार, कारागीर व सर्वसाधारण जनतेच्या ठिकाणीं असलेल्या दुर्दमनीय श्रद्धेमुळेंच. त्यांनीं भक्तीनें एकावर एक चढविलेले दगड आणि त्यांत कोरलेल्या रमणीय आकृतिच त्यांच्या ठिकाणच्या श्रद्धेचीं द्योतक आहोत. प्राचीनकालच्या देवालयाचीं शिखरें, मशीदीवरील सुबक मनोरे, गोथीक प्रार्थनामंदिरें पहा, जणूं काय तीं पराकाष्ठेच्या भक्तीनें आकाशाकडे उर्ध्वाभिमुख झालीं असून त्यांच्या प्रत्येक पाषाणांतून प्रार्थनेचे स्वर उमटत आहेत असा भास होतो. ज्या प्राचीन

श्रद्धेच्या या कलाकृती ह्मणजे मूर्तिमंत प्रतिकें. ती श्रद्धा आपल्यांत नसली, तरी त्या पाहून आजहि आपलें अंतःकरण उचंबळून येते. पण श्रद्धेचे ते दिवस गेले व त्याबरोबरच हृदयंगम व हळुवार कलाहि गेली. आजहि हजारों देवालयें, मशिदी व प्रार्थनामंदिरें बांधली [redacted] आहेत, पण त्यांच्यांतील मध्ययुगीन कालांतील चैतन्य खेळविणारा [redacted]त्माच नाहींसा झाला आहे, असें वाटते. अलीकडे धार्मिक इमारती आणि आपल्या युगाच्या प्रातिनिधीक अशा व्यापारी कचेऱ्या यांत फारसा फरक नाहीं.

आपलं युग वेगळ्या तऱ्हेचं आहे; आपलं युग अभ्रम, शंका, अनिश्चितता व जिज्ञासेचे आहे. पूर्वींच्या समजुती व रुढीपैकीं कितीतरी आपल्याला ग्राह्य वाटत नाहींत; आशिया, यूरोप, अमेरिका वगैरे कोठेंच अशा गोष्टींवर विश्वास उरलेला नाहीं. सहाजिकच आपल्याभोंवतालच्या वातावरणाशीं तालबद्ध असें नवीननवीन मार्ग व सत्याचीं अंगोपांगें शोधण्याचा आपण प्रयत्न करतो, भांडतो आणि जगांत कितीतरी 'वाद' (Isms) आणि तत्वज्ञानांची भर घालतो. सॉक्रेटीसच्या कालाप्रमाणें आपण जिज्ञासायुगांत वावरत आहोंत, पण ही जिज्ञासा ॲथेन्ससारख्या एकाद्या शहरापुरती मर्यादित नसून ती जगभर पसरलेली आहे.

पुष्कळ वेळां जगांतील अन्याय, दुःख आणि पाशवी वृत्ति यामुळें आपलें अंतःकरण भारावून जातें, आपल्याला मार्ग दिसत नाहीं. मॅथ्यू ॲर्नोल्डच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, आपल्याला जगांत आशेचे किरण दिसत नाहींत. अशा वेळीं एकमेकाशी निष्ठेनें वागणें एवढाच मार्ग आपल्यापुढें शिलक रहातो. ॲर्नोल्ड आपल्या एका कवितेत म्हणतो.

" आपल्यापुढें पसरलेलें हें अफाट जग म्हणजे वैचित्र्यपूर्ण मोहक व नाविन्यपूर्ण असें कल्पनासाम्राज्यच. पण त्यांत आनंद नाहीं, प्रेम नाहीं, प्रकाश नाहीं, खात्री नाहीं, शांतता नाहीं, कीं दुःखविमोचन नाहीं. भयाण अंधःकारांत आपण वावरत असून, कलह आणि निराशेन आपल्याला घेरलें आहे. रात्रीच्या काळोखांत अजाण सैनिकांनीं लढण्यासारखीच आपली आज स्थिती आहे. "

पण आपण जर असा निराशमय दृष्टीकोन स्वीकारला तर जीवन किंवा अितिहास यापासून कांहींच बोध घेतला नाहीं, असें होअील. अितिहास आपल्यापुढें विकास आणि माणसाच्या अमर्याद प्रगतीच्या शक्यतेचे चित्र अुभे करतो. जीवन हें फुललेलं आणि वैचित्र्यपूर्ण आहे. जीवनांत पुष्कळ्शीं दलदल आणि चिखल असला तरी त्याबरोबरच त्यांत मोठमोठें सागर, पर्वत, हिमाच्छादित शिखरें हिमनद्या, तारकांचा चमचमाट असलेल्या रम्य रात्रीं [विशेषतः कारागृहांतील !], आप्तेष्ट व मित्रांचा प्रेमवर्षाव, समान ध्येय-साधनासाठीं लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा बंधूभाव, संगीत, ग्रंथ आणि कल्पनेचें साम्राज्य असतें. आपल्यापैकीं प्रत्येकाला असें म्हणतां येअील कीं:—

" हें परमेश्वरा, भूमातेचें बालक म्हणून मी या जगांत रहात असलो तरी, तारकांनीं प्रकाशीत झालेल्या आकाशानें माझें पितृपण केलेलें आहे. "

विश्वाच्या सौंदर्याचें कौतुक करीत, विचारांच्या आणि कल्पनांच्या साम्राज्यांत गुंग होणं सोपं आहे. पण अशा रीतीनें अितरांच्या यातनांपासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करणें किंवा त्यांची पर्वा न करणें हें धैर्याचें किंवा बंधूभावाचें लक्षण नव्हें. विचार हा कृतीला सज्ज करणारा असला पाहिजे. रोमाँ रोलाँ म्हणतात. " कृति ही विचाराची परिणती होय. कृतीविना विचार म्हणजे विश्वासघात किंवा गर्भपातच होय. जे विचाराचे सेवक आहेत, त्यांनीं कृतीचेहि सेवक बनले पाहिजे. "

लोक बहुधां कृति टाळतात, याचें कारण त्यांना परिणामाची भीति वाटते. कारण कृति म्हणजे धोका आणि संकट, दुरून संकट भयंकर वाटते. पण जवळून पाहिले तर तें तितकें भयंकर नसल्याचें आढळून येअील. आणि पुष्कळ वेळां तर संकट म्हणजे जीवनाच्या अुत्साहांत आणि आनंदांत भर घालणारा अेक मजेदार सहकारीच होय. ठराविक असा आयुष्यक्रम कांही कांही वेळां कंटाळवाणा होतो; पुढील गोष्टी आपण गृहीत धरून चालतो आणि त्यांत आनंद असत नाहीं. पण कांहीं काळ जीवनांतील नेहमीच्या गोष्टींना आपण मुकलो तर पुढें त्यांची आपल्याला किती किंमत वाटते !

पुष्कळ लोक अुंच अुंच पर्वतावरच्या मोहिमा काढतात. अशा मोहिमांत हातपाय मोडण्याची अितकेंच काय पण जीव गमविण्याचीहि भीति असते. पण अडचणी किंवा संकटावर विजय संपादन केल्याचा जो आनंद व अुन्माद मिळतो, त्यामुळें ते अशा धाडसाला प्रवृत्त होतात, आणि सभोंवार संकटांची घनदाट छाया पसरल्यामुळें कीं काय त्यांच्या मनोसंवेदना तीक्ष्ण होतात आणि नाजूक धाग्यावर लटकत असणारा त्यांचा जीवनानंद-त्यांत भर पडते.

आपल्यापुढें दोन मार्ग आहेत. पहिला म्हणजे आरोग्यविघातक अशा अभ्रें आणि धुक्यानें व्यापलेलें पण थोडेफार शारिरीक स्वास्थ्य देणारे खालच्या दऱ्याखोऱ्यांतील जीवन कंठणें हा आणि दुसरा मार्ग म्हणजे धोके आणि संकटे यांच्यासांगाती पर्वतारोहण करुन तेथील शुद्ध हवेंत स्वासोच्छ्वास करावयाचा, दूरवर सृष्टी निरीक्षण करावयाची आणि अुगवत्या सूर्याचें स्वागत करावयाचें. हा

मी या पत्रांत कवि-साहित्यिक वगैरेंची वचनें व अुतारें अुद्धृत केलेः आहेत. आतां रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलीतील खालील कविता किंवा प्रार्थना अुध्दृत करुन हें पत्र पुरें करतो.

" जेथें मन निर्भय असून मस्तक ताठ रहातें;

जेथें ज्ञानगंगा मुक्त आहे;

जेथें आकुंचित अशा अंतर्गत भिंती अुभारून जगाचें विभाग

पाडण्यांत आलेलें नाहींत;

जेथें सत्याच्या अनिवार तळमळींतून बोल बाहेर पडतात;

जेथें अविश्रांत परिश्रम, पूर्णतेच्या ध्येयाकडें नेत आहेत;

जेथें बुद्धीवादाचा स्वच्छ प्रवाह,मृत रुढींच्या रखरखींत वाळवंटांत गुप्त होत नाहीं;

जेथें, हे परमात्मन तूं, सतत विस्तार पावत असलेल्या विचार व कृतीकडे मनाला मार्गदर्शन करतोस;

अशा स्वातंत्र्याच्या नंदनवनांत; हे प्रभो, माझा देश जागृत होवो ! '

लाडके, सारा अितिहास संपला व हें शेवटचें पत्र पुरें झालें. शेवटचें पत्र ? खास नाहीं ! मी आणखी पुष्कळ पत्रें लिहीन पण या मालेंतील हें शेवटचें पत्र.

तमाम शुद !

ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी, १९३३

राष्ट्रीय योजना

आपल्याला हिंदुस्थानकरितां राष्ट्रीय योजना आंखायची आहे. या योजनेची तपशीलवार रचना फार तर पुढें वेळोवेळीं करतां येअील पण आज निदान तिची सर्वसाधारण रुपरेखा तयार करावयाची आहे. ज्या राष्ट्रीय प्रगतीच्या योजनेंत, देशांतील सर्व आधिभौतिक व सांस्कृतिक शाखांचा समावेश होण्याचा संभव, ती तयार करण्यापूर्वी, आपला अुद्देश व अशा योजनेंत कोणत्या मूलभूत गोष्टी याव्यात, योविषयींची स्पष्ट कल्पना आपल्या मनांत असली पाहिजे.

अेक गोष्ट स्पष्ट आहे. नियोजक किंवा योजना आंखण्याची ज्यांच्यावर जबाबदारी, त्यांच्या हातांत सदर योजना अंमलांत आणण्याची सत्ता असली पाहिजे. नाहींपेक्षां जी सर्वस्पर्शी राष्ट्रीय योजना म्हणून आंखली जाते, ती म्हणजे वस्तुस्थितिशी संबंध नसलेली व निव्वळ कागदी अशी अेक कृति ठरेल. जर योजना---समिती सत्ताहीन असेल किंवा तिचे अधिकार नियंत्रित किंवा निर्बंधित आणि कार्यक्षेत्र मर्यादित असेल तर या समितीला योजना आंखतां येणें शक्य नाहीं.

मी वर म्हटल्याप्रमाणें ज्या राष्ट्रीय समितीकडे योजना आंखण्याचें कार्य तिच्याकडे आपल्या योजनेला मूर्त स्वरुप देण्याची संपूर्ण सत्ता असली पाहिजेच, पण शिवाय अशा योजनेकरितां ज्या मूलभूत आवश्यकतेची जरुरी आहे, ती म्हणजे देशाचें संपूर्ण स्वातंत्र्य व परकीय सत्तेचें अुच्चाटन. आपला

देश व जनता यांच्या हिताकरितां देशांतील अनुशासन संस्थेला योग्य वाटतील असे कायदे करण्याची, धोरण स्वीकारण्याची व दुसऱ्या देशांशी संबंध जोडण्याची सार्वभौम सत्ता असली पाहिजे.

अर्थात, कधी काळीं स्वतंत्र व समान दर्जाच्या राष्ट्रांचा जागतिक संघ स्थापन झाला तर जागतिक नियोजन व सहकार्याकरितां, या संघातील प्रत्येक घटकाची सार्वभौम सत्ता प्रत्येकाच्या आपखुषीनें मर्यादित केली जाण्याचा संभव आहे. पण राष्ट्रीय नियोजनाच्या आड अशी घटना येऊं शकत नाहीं. उलट ही घटना योग्य प्रकारें घडून आली तर अेकाद्या राष्ट्रांतील अंतर्गत योजनेला ती उपकारकारकच ठरेल. पण ही झाली पुढची गोष्ट. आज तिचा आपणांस विचार करण्याचें कारण नाहीं.

वरीलप्रमाणें आपली योजना तिच्या सर्वविध स्वरुपांत मूर्त स्वरुपांत आणण्याकरितां आपणांस जें जें करावें लागेल, त्यापूर्वी राष्ट्रीय स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पायावर अशा तऱ्हेची योजना आंखणें शक्य नाहीं. आज हिंदुस्थानांत आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य नाहींच, पण उलट प्रत्येक ठिकाणीं आपल्या नियोजनांच्या व प्रगतीच्या मार्गांत विविध निर्बंध, संरक्षण बंधनें वगैरेंचीं कांटेरी कुंपणें व अडचणी उभ्या करण्यांत आल्या आहेत.

आपली राष्ट्रीय विकासाची योजना अेवढ्याचकरितां स्वतंत्र हिंदुस्थानकरितांच म्हणून आंखली गेली पाहिजे. याचा अर्थ नियोजित आर्थिक रचना करण्यापूर्वी आपण स्वातंत्र्य मिळण्याची वाट पाहिली पाहिजे, असा नव्हे. सद्यःस्थितींतहि, देशांतील सर्वसाधारण सामुग्री उपयोगांत आणून जनतेची स्थिती सुधारण्याचे शक्य ते प्रयत्न केलें पाहिजेत. मात्र, आपण स्वतंत्र हिंदुस्थानाकरितां म्हणून जी योजना तयार केलेली असेल ती मूर्त स्वरुपांत येण्याच्या दृष्टीनेंच आपल्या प्रयत्नाची दिशा असावी. आपल्या सदनशीर हक्कांवर आक्रमण करणाऱ्या अशा प्रचलीत नियंत्रणाची पक्कड त्यामुळें कमीं केली गेली पाहिजे. तसेंच आपल्या योजनेमुळें नवीन हितसंबंधीं वर्ग निर्माण होतां कामा

नयेत, किंवा ज्यामुळें आपल्या ध्येयपूर्तिच्या आणि आपली संपूर्ण योजना पुरी होणाऱ्या मार्गात नवीन अडचणी अुभ्या राहतील, असें चुकीचें धोरण स्वीकारलें जातां कामां नये.........

...तसेंच तीमुळें आज व आजच्या स्थितींत राष्ट्रीय कार्यांतील विविध शाखांत काय करतां येअील, हेंहि दिग्दर्शित झालें पाहिजे.

हिंदुस्थानांत स्वतंत्र व लोकशाही सरकार स्थापन करणें हें कॉंग्रेसचें ध्येय आहे. अशा प्रकारचें सरकार म्हणजे समानतेवर अुभारलेला समाज असा अर्थ अभिप्रेत आहे. अशा समाजव्यवस्थेंत, प्रत्येकाला आपलें विचार बोलून दाखविण्याकरितां व ध्येयसाध्याकरितां समान संधी दिली जाअील आणि हें समान संधीचे तत्व मूर्त स्वरुपांत येण्यासाठीं प्रत्येक माणसाला जीवनाचें कमींत कमी आवश्यक असें सुधारलेलें परिमाण मिळण्याची हमी राहील. आपल्या योजनेची पार्श्वभूमि अगर पाया हाच असावा.

हिंदुस्थानांतील प्रचलीत परिस्थिती लक्षांत घेअून, कॉंग्रेसनें ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्याकडे विशेष लक्ष दिलें आहे. कोणतीहि योजना आखतांना ही गोष्ट लक्षांत घेअून तिची रचना ग्रामोद्योगांच्या पायावर केली पाहिजे. याचा अर्थ मोठे कारखाने व ग्रामोद्योग यांच्यांत विरोध येअीलच असें नाहीं. देशाचें स्वातंत्र्य व प्रगति याकरितां आवश्यक असे बरेचसे मूलभूत धंदे अपरिहार्यरित्यां मोठ्या प्रमाणावरच काढावे लागतील. खुद्द ज्या ठरावामुळें आपली नियोजन—समिती नेमिली गेली, त्या ठरावांत मोठे मूलभूत धंदे, मध्यम स्वरुपाचे धंदे व ग्रामोद्योग या तिन्ही प्रकारच्या धंद्यांची तरतूद केली जावी, असें स्पष्ट म्हटलें आहे. औद्योगिकरण झाल्याशिवाय, देशाचें आर्थिक पुनरुज्जीवन होणार नाहीं, असेंहि सदर ठरावांत नमूद करण्यांत आले आहे. अेवढ्याचकरितां आपण औद्योगिकरणाची त्वरा करून महत्वाचे आणि मूलभूत धंदे कसें व कोठें सुरुं करतां येतील, हें दाखवून दिलें पाहिजे. तसेंच मोठे कारखाने व ग्रामोद्योग यांचीं क्षेत्रें शक्यतर निश्चित करुन, त्यांना संरक्षण व प्रोत्साहन देण्याकरितां राष्ट्रव्यापी प्रयत्नांचीहि आवश्यकता आहे.

कराची काँग्रेसमध्यें पास झालेल्या नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या ठरावांत स्पष्ट म्हटलें आहे कीं मूलभूत मोठे धंदे व सार्वजनिक--अुदाहरणार्थ खनिज पदार्थांच्या खाणी, रेल्वेज्, जलमार्ग, नौकायानें व अितर अुपयुक्ततेचीं साधनें सरकारी मालकीचीं रहातील. अितर कांहीं मोठे कारखाने कांहीं काल मक्तेदारी स्वरुपाचें रहाण्याचा संभव आहे. पण सर्वच मोठ्या कारखान्यांच्या बाबतींत वरील तत्व लावून तेंहि पुढेंमागें सरकारी मालकीचे केले गेले पाहिजेत हें अुघड आहे. अितकेंच नव्हे तर ज्या मोठ्या कारखान्यांवर सरकारचा ताबा नसेल, अशा कारखान्यांवरहि सरकारचें नियंत्रण व देखरेख असणें अिष्ट आहे.

ज्या अुद्योगधंद्यांत विशिष्ट वर्गाचें हितसंबंध पूर्वींच गुंतलें आहेत, अशा धंद्यांचा ताबा सरकारनें घ्यावा, असें म्हणणें आज कदाचीत अव्यवहार्य ठरेल. पण ज्या ज्या ठिकाणीं, खासगी देखरेखीखालील चांगला जम बसलेल्या कारखान्यालाहि, जर सरकारी मदत किंवा संरक्षण मिळत असेल किंवा अशा धंद्यांत जर मक्तेदारी येण्याचा संभव असेल किंवा सरकारच्या कामगार व ग्राहकांसंबंधीच्या सर्व धोरणाशीं या कारखान्यांचा विरोध येण्याचा संभव असेल तर अशा सर्व बाबतींत, आपलें मूलभूत धोरण व योजनेंत नमूद केलेल्या ध्येयाला सुसंगत अशा मार्गाचा अवलंब सरकारनें केला पाहिजे.

कराची काँग्रेसच्या याच ठरावांत पुढें म्हटलें आहे की :

(अ) देशांतील आर्थिक जीवनाची संघटना न्यायाच्या तत्वाला सुसंगत असली पाहिजे; त्यामुळें निदान योग्य असें जीवनाचें परिमाण प्रत्येक व्यक्तीला मिळालें पाहिजे.

(ब) सरकार, औद्योगिक कामगारांच्या हक्कांचें संरक्षण करील व त्याच प्रमाणें आवश्यक ते कायदे वगैरे जारी करून, त्यांना जीवनवेतन, कारखान्यांत आरोग्यदायक वातावरण व कामाचे मर्यादित तास, मालक व कामगार यांच्यामधील झगडे मिटविण्यासाठीं लवाद मंडळें स्थापन करणें, आणि वृद्धापकाळ, आजार व बेकारी वगैरेमुळें अुदभवणाऱ्या आर्थिक परिणामांचा संसर्ग त्यांना लागणार नाहीं, अशी दक्षता घेअील.

ज्या ठरावाद्वारें या समितीची निवड झाली आहे, त्या ठरावांत शेतकीचा अुघड अुल्लेख नाहीं. पण ज्या योजनेंत शेतकीचा समावेश नाहीं; अशा कोणत्याहि देशांतील— निदान हिंदुस्थानांतील--राष्ट्रीय योजनेचा विचार करणें अशक्य आहे. शेतकी हा आपल्या देशांतील अेकमेव असा सर्वांत मोठा धंदा आहे व पुढेंहि राहील. अनेक दुय्यम धंद्यांशी आपल्या शेतीचा अनोन्य संबंध आहे. शेतकींतील कोणतीहि सुधारणा किंवा बदल यांचा दूरगामी परिणाम देशाच्या आर्थिक परिस्थितीवर होअिल. ग्रामोद्योगांचा तर शेतकीशी जिव्हाळ्याचा संबंध आहे. शेतकऱ्यांना फुरसतीच्या वेळी दुय्यम धंद्यांसारखा त्यांचा अुपयोग होतो. अेवढ्याचकरितां या समितीनें, आपल्या राष्ट्रीय योजनेंत शेतकीचा अपरिहार्य विचार करणें जरुर आहे.

......आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं आमची योजना ही सर्वांगिण राष्ट्रीय प्रगतीची योजना असावी व तींत सर्व अंगोपांगांचा अेकमेकांशी मेळ असावा.

नॅशनल प्लॅनिंग कमिटीच्या सभासदांपुढें
मांडलेल्या विचारांतील कांहीं भाग, १९३८.

भाषेचा प्रश्न

अलीकडे कांहीं महिने हिंदी--अुर्दू वाद पुन्दां अुपस्थित झाला आहे. या वादामुळें मोठी खळबळ माजून राहिली असून, अेकमेकांवर आरोपप्रत्यारोप केले जात आहेत. विशेषत: जो विषय शांत व अभ्यासू वृत्तीनें विचार करावयाचा किंवा ज्यावर तात्विक वादविवाद होणें योग्य, त्याच विषयाला बाजारी चव्हाटया-वर खेंचण्यांत आलें असून जातीय भावनाहि त्यांत घुसडून देण्यांत आल्या आहेत. जे लोक वादविवादाच्या आखाड्यांत अुतरले आहेत; ते प्रामुख्यानें कशाचा विचार करत असतील तर सरकारी आज्ञापत्रें व कोर्टकचेऱ्यांतील चालू चलावू कामाचा. अभ्यासू वृत्ति किंवा केवळ भाषेचें प्रेम याशीं त्यांचा संबंध नाहीं. भाषा म्हणजे संस्कृतीचें प्रतिक, भाषा म्हणजे शब्दसंभार व वाक्शैली यांच्या धांग्यानीं विणलेला विचारांचा गालिचा, भाषा म्हणजे मूर्त स्वरुप दिले गेलेले कल्पनातरंग, आणि भाषा म्हणजेच भावार्थाचें अिंद्रधनुष्य, संगीत तालबद्धता, हृदयगंम संविधनक, शब्दलालित्य आणि जीवनाच्या विविध कलांचें चित्र. ज्या लोकांना भाषा या व अितर अनेक कारणाकरितां प्रिय वाटते त्यांना या हीन बाजारी चर्चेबद्दल विषाद वाटावा व तीपासून त्यांनीं अलिप्त रहावें यांत आश्चर्य तें काय ?

पण असें असलें तरी भाषेच्या प्रश्नापासून आपण दूर राहूं शकत नाहीं किंवा त्याकडे दुर्लक्षहि करतां येत नाहीं. आपणां सर्वांच्याच दृष्टीनें भाषेचा प्रश्न महत्वाचा आहे. हिंदुस्थान म्हणजे शेंकडों भाषाची बजबजपूरी असें विधान

पुष्कळ लोक अज्ञानामुळें करत असतात,म्हणून केवळ या प्रश्नाला महत्व आहे असें नव्हें. ज्यांनी या प्रश्नाचा विचार केला आहे, त्यांना असें दिसून येईल कीं, आपल्या देशाच्या मोठ्या विस्ताराच्या मानानें येथें अगदींच थोड्या भाषा असून शिवाय त्यांचा अेकमेकांशीं निकटचा संबंध आहे. दुसरी गोष्ट म्हणजे हिंदुस्थानांतील प्रमुख व विस्तृत प्रदेशांत प्रसार झालेली अशी अेकच भाषा असून तीच थोड्याफार फरकानें लक्षावधि लोक बोलतात. तरीहि हा प्रश्न सर्वस्वी सोडविण्याचा शिल्लक रहातो व तो आपण सोडविला पाहिजे.

आज भाषेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचें कारण म्हणजे त्यांत घुसलेलें राजकारण व जातीयता. पण या गोष्टी क्षणिक टिकणाऱ्या असून त्या काल-मानाबरोबर निघून जातील. आपल्यापुढील खरा प्रश्न म्हणजे सार्वत्रिक शिक्षणप्रसार व जनतेची सांस्कृतिक प्रगतिची योजना. याबाबत आपण कोणते धोरण स्वीकारले पाहिजे ? हिंदुस्थानचें अैक्य वृद्धिंगत करण्यास मदत करुनहि आपल्याला येथील परंपरेंतील संपन्न असें वैचित्र्य कसें राखतां येअील ?

जनतेच्या दृष्टीनें भाषेचा प्रश्न नेहमींच महत्वाचा असतो. बरोबर तीनशें वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध कवि मिल्टन, फ्लॉरेन्सहून आपल्या अेका मित्राला लिहलेल्या पत्रांत भाषेचें महत्व विशद करतांना म्हणतो. “ लोकांची भाषा कशी आहे, शुध्द कीं सरभेसळ, तसेंच ती बोलतांना तींत किती प्रमाणांत सांप्रदायिक वाक्प्रचार असतात, या गोष्टीचें महत्व कमी लेखून चालणार नाहीं....जशी भाषा तसे लोक. ज्या देशांतील भाषा कांहींशी बेंगरूळ, अुर्मट, हिणकस व अुच्चारांच्या दृष्टीनें हेंगाडी--त्या देशांतील लोक आळशी व सुस्त असले पाहि-जेत व त्यावरुन दीर्घ कालापासून गुलामगिरीचे केवढेंहि मोठे जूं घेण्याच्या दृष्टीनें त्यांची मनोवृत्ति तयार झाली असली पाहिजे, हें बऱ्याच प्रमाणांत सिध्द होत नाहीं काय ? याअुलट ज्या साम्राज्यांत किंवा राज्यांत स्वभाषेचें आवडीनें संगोपन केलें जातें, तें साम्राज्य अगर राज्य निदान थोड्याबहुत प्रमाणांत कां होअीना भरभराटींत नव्हतें, असें आपल्या कधीं कानावर आलें आहे काय ?

● जीवंत भाषा नेहमीं रसरशीत, जीवनस्पर्शी असते. ती सदां बदलते, विकास पावते व जे लोक ती बोलतात व लिहतात, त्यांच्या विचारांचें प्रतिबिंब तींत दिसतें. या भाषेवर अुभारलेली दृश्य अिमारत म्हणजे थोड्याफार लोकांच्या संस्कृतीचें प्रतिक असलें तरी तिचीं मुळें जनतेंत खोल रुजलेलीं असतात. अशा स्थितींत ठराव पास करून किंवा वरून फर्मानें सोडून ती आपण कशी बदलूं शकणार किंवा तिला निराळें वळण कसें देणार ? सध्यां अशी अेक समजूत मोठ्या प्रमाणांत रूढ आहे कीं, आपण मनांत आणूं त्याप्रमाणें भाषेला वळवूं शकूं. सार्वत्रिक शिक्षण आणि वृत्तपत्रें, छापील पुस्तकें, सिनेमा, रेडिओ वगैरे आधुनिक साधनाद्वारें तुफानी प्रचार यामुळें भाषेंत पूर्वीपेक्षां झपाट्याने बदल घडवून आणता येतो हें खरें आहे. जे लोक भाषेचा अुपयोग करतात, त्यांच्यामध्यें झपाट्यानें होणाऱ्या स्थित्यंतरांचा असा हा बदल केवळ दिखावूं आरसा होय. भाषेचीं लक्षणें म्हणजे चैतन्य, जोम व टवटवीतपणा. पण जनतेशी संबंध सुटला कीं तींतील जोम निघून जातो व ती कृत्रिम आणि निर्जीव बनते. अेकाद्या ठराविक मार्गानें भाषेला पुढें दामटण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळें तिला विपरीत स्वरुप येअून तिचें तेज मारलें जाण्याचाच संभव आहे.

● भाषेच्या बाबतींत सरकारचें काय धोरण असावें ? " अल्पसंख्यांक व त्याचप्रमाणें निरनिराळ्या भाषांवार प्रांतांतील संस्कृति, भाषा व लिपी यांचें संरक्षण केलें जाअील. " असें राष्ट्रीय सभेनें आपल्या नागरिक हक्कांवरील ठरावांत, थोडक्यांत पण निसंदिग्ध भाषेंत निश्चतपणें नमूद केलें आहे. या ठरावाला राष्ट्रीय सभा बांधली गेलेली असून, कोणत्याहि अल्पसंख्यांक किंवा भाषावार गटाला यापेक्षां व्यापक आश्वासनाची गरज नाहीं. याशिवाय राष्ट्रीय सभेनें आपल्या घटनेंत व त्याचप्रमाणें वेळोवेळीं केलेल्या ठरावांत म्हटलें आहे कीं, देशाची सामान्य भाषा हिंदुस्थानी असली तरी प्रांतिक भाषा, त्या त्या प्रांतांत प्रामुख्यानें चालाव्यात. भाषा ही केवळ ठराव करून लादतां येत नाहीं. कॉंग्रेसची कळकळीची अिच्छा अशी आहे कीं देशांत अेका सरीस भाषेचा विकास

व्हावा, पण त्याबरोबरच आपलें सर्व काम प्रांतिक भाषांतून चालावें. पण जर या भाषा प्रचलीत परिस्थिति व आपल्या गरजा यांना धरून नसतील, तर फलद्रूप होणार नाहींत. असो त्या कितपत फलद्रूप होण्याजोग्या आहेत, हें पाहूं.

पुष्कळ लोक समजतात, त्याप्रमाणें आपल्या प्रांतिक भाषा म्हणजे नुसत्या बोली किंवा प्रादेशीक भाषा नव्हेत. या भाषा पुरातन असून त्यांच्या-मागें अुज्वल परंपरा आहे. त्यापैकीं प्रत्येक भाषा लाखों लोक बोलतात व सर्व सामान्य जनता व त्याचप्रमाणें वरचा वर्ग यांचें जीवन, संस्कृति व कल्पनाशीं त्यांचा अभेद्य संबंध निगडीत झालेला आहे. जनता आपली शैक्षणिक व सांस्कृतीक प्रगति फक्त आपल्या भाषेच्या माध्यमांतूनच करून घेअूं शकते, हा ठाम सिद्धांत आहे. याचकरितां आम्हीं प्रांतिक भाषांवर वारंवार भर देअून त्यांतूनच आमचें कामकाज करण्याकडे लक्ष देतो. दुसऱ्या कोणत्याहि भाषेचा अुपयोग करणें म्हणजे जनतेपासून अल्पसंख्यांक सुशिक्षितांची फारकत करून, तिच्या प्रगतींत अडथळा आणणेंच होय. कॉंग्रेसनें प्रांतिक भाषांतून आपलें कामकाज करण्यास सुरवात केल्यापासून जनतेबरोबर आमचें संघटन झपाट्यानें येअूं लागले व सर्व देशभर कॉंग्रेसचें सामर्थ्य व वजन वाढलें. तसेंच कॉंग्रेसचा संदेश-दूरदूरच्या छोट्या छोट्या खेड्यांत पोहोंचून जनतेंतील राजकीय संवेदना वाढली. यावरून आपलें शैक्षणिक व सार्वजनिक कार्य प्रांतिक भाषांवरच आधारलेलें असलें पाहिजे, हें स्पष्ट होतें.

आणि या भाषा तरी कोणत्या ? पहिली हिंदुस्थानी. हिंदुस्थानीची हिंदी व अुर्दू हीं दोन मुख्य अंगें व शिवाय निरनिराळ्या बोली आहेत. यानंतर बंगाली, मराठी व गुजराथी या सर्व भाषांचें हिंदुस्थानीशीं निकटचें साम्य आहे. दक्षिण हिंदुस्थानांत तामीळ, तेलगू, कानडी व मल्याळी या भाषा अस्तित्वांत आहेत. याशिवाय अुरिया, आसामी, सिंधी, पंजाबी व वायव्य सरहद्द प्रांतांत पुश्तू या भाषा चालतात. या बारा भाषांच्या कक्षेंत सर्व हिंदुस्थान येतो. हिंदुस्थानीचा प्रचार अर्थात सर्वांत जास्त असून, तिला अेक प्रकारचें अखिल भारतीय स्वरुप आलेलें आहे.

प्रांतिक भाषांची कक्षा अजिबात कमी न करतां व्यवहाराच्या सोयींकरतां अखिल भारतीय अशा अेका भाषेची आवश्यकता आहे. कांहीं लोकांना वाटतें अिंग्लिशचा अशी भाषा म्हणून अुपयोग होअील व कांहीं मर्यादेपर्यंत आपल्यांतील वरच्या वर्गांना व त्याचप्रमाणें अखिल भारतीय राजकारणाच्या दृष्टीनें अिंग्लिशचा तसा अुपयोगहि झाला आहे. पण जनतेच्या दृष्टीनें विचार केला तर ही गोष्ट अगदीं गैर आहे. लाखों लोकांना परकीय भाषेंतून शिक्षण देणें शक्य नाहीं. अिंग्लिश भाषेबरोबरचें आपलें पूर्वीचें सहचर्य व जगांत तिला सध्यां असलेलें महत्व लक्षांत घेतां आमच्या दृष्टीनें ती अेक महत्वाची भाषा म्हणून राहणें अपरिहार्य आहे. तसेंच बाह्य जगाशीं दळणवळण ठेवितांना तिचा प्रमुख माध्यम म्हणून अुपयोग होअील. पण अिंग्लिश भाषा याकरितां शिक्षणाचे अेकमेव माध्यम म्हणून राहणार नाहीं, अशी मला आशा आहे. त्याकरितां फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश, अिटालियन, चिनी, जपानी या भाषाहि शिकाव्यात असे मला वाटतें. पण अिंग्लिश ही लाखों लोकांना सुबोध अशी अखिल भारतीय स्वरुपाची भाषा कधींच होअूं शकणार नाहीं.

अशा स्थितींत हिंदुस्थानी हीच केवळ अखिल भारतीय स्वरुपाची भाषा होअूं शकेल. आजच जवळजवळ १२ कोटी लोक ही भाषा बोलतात व अितर लाखों लोकांना ती थोडीबहुत समजते. तसेंच ज्या लोकांना ती अजिबात येत नाहीं, त्यांनासुद्धां,कोणत्याहि परकीय भाषेपेक्षां तीं फार लवकर शिकतां येअील. हिंदुस्थानांतील सर्व भाषांतून समान असे पुष्कळ शब्द आहेत, पण सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे या भाषांची सांस्कृतिक पार्श्वभूमि अेकच असून, त्यांच्यांत कल्पनांचें साम्य व बऱ्याच प्रमाणांत भाषिक ऋणानुबंध आढळून येतो. कोणाहि हिंदी माणसाला दुसरी कोणतीहि प्रांतिक भाषा शिकणें यामुळें सोपें जातें.

हिंदुस्थानी भाषा म्हणजे कोणती ? सध्यां बोलल्या जाणाऱ्या व विवक्षीत लिपींत लिहिल्या जाणाऱ्या हिंदी व अुर्दू या दोहोंचाहि तींत समावेश होतो असें आपण मोघमपणें म्हणतो. आपण त्या दोहोंतून सुवर्णमध्य काढून, तिलाच हिंदु-

स्थानीं असें नांव देतो. ही हिंदुस्थानी म्हणजे वास्तवतेचा पाया नसलेली नुसती कल्पनाच कीं तींत कांहींतरी अधिक आहे ?

सध्यां अुत्तर व मध्य हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत हिंदुस्थानीं बोलण्याचे व लिहिण्याचे विविध प्रकार आहेत. हिंदुस्थानीच्या अनेक बोली अस्तित्वांत आल्या आहेत. पण या बोली म्हणजे शिक्षणाभावाचें अपरिहार्य परिणाम होत. सार्वजनिक शिक्षणाबरोबर या बोलींची संख्या कमी कमी होत जाअून भाषेला अेक विवक्षीत प्रमाणबद्धता येत जाअील.

यानंतर लिपीचा प्रश्न येतो. देवनागरी व अुर्दू या दोन्ही लिपी अगदींच वेगवेगळ्या असल्यामुळें त्यांचा मिलाफ होण्याची शक्यता नाहीं. याकरितां सदर दोन्हीं लिपींना पूर्ण वाव देण्याचें आम्हीं अेकमतानें ठरविलें आहे. दोन्हीं लिपी शिकणाऱ्यांच्या दृष्टीनें हा अेक भारच, त्यामुळें कांहीं मर्यादेपर्यंत फुटीर वृत्तीलाहि प्रोत्साहन मिळेल. पण दुसरा कोणताच मार्ग मोकळा नसल्यामुळें या गैरसोयी सहन करणें प्राप्त आहे. या दोन्ही लिपी आपल्या भाषांविषयक अभिरुचीच्या प्रतीक होत. याशिवाय या प्रत्येक लिपींत वैशिष्ट्यपूर्ण असें वाङमय निर्माण झालें आहे, अितकेंच नव्हे त्यांच्याभोवतीं भावनांची भरीव व दुर्गम तटबंदी आहे. भविष्यकाळांत काय होअील, हें आज सांगता येत नाहीं. पण निदान आज तरी या दोन्ही लिपी प्रचारांत राहाणें क्रमप्राप्तच आहे.

लॅटीन लिपीमुळें आमचे कांहीं भाषाविषयक प्रश्न सुटूं शकतील असें म्हणतात. कामकाज जलद आटोपण्याच्या दृष्टीनें लॅटीन हिंदी किंवा अुर्दूपेक्षांहि कार्यक्षम आहे. सध्यांचें आपले जग टाअिपरायटर्स, डुप्लीकेटर्स वगैरे यांत्रिक साधनांचे आहे. हिंदी लिपीमुळें या साधनांचा जो पुरेपूर फायदा घेतां येत नाहीं, तो लॅटीन लिपीमुळें घेतां येतो. पण अितकें असूनहि, देवनागरी अगर अुर्दू लिपीच्या ठिकाणीं लॅटीन लिपी येअील असें मला मुळींच वाटत नाहीं. विशेषत:सध्यांच्या आपल्या परकीय राज्यकर्त्यांची लिपी म्हणून या लिपीबद्दलचा लोकांचा विरोध वाढता आहेच. त्याशिवाय ही लिपी न स्वीकारण्याची अितर अनेक भरीव कारणें आहेत. लिपी म्हणजे आमच्या वाङमयाचा मूलभूत भाग; त्यांच्याभावीं आपला प्राचीन वाङमयाशी असलेला संबंध तुटेल.

आपल्या लिपींत निदान कांहीं प्रमाणांत सुधारणा मात्र करतां येणें शक्य आहे. हिंदी व अुर्दू शिवाय सध्यां बंगाली, मराठी, गुजराथी या लिपीहि रुढ आहेत. या तिन्ही लिपींचे देवनागरी लिपीशीं साम्य आहे. या चार भाषांकरितां अेकच लिपी रुढ करणें सहज शक्य आहे. अर्थात त्याकरितां आज देवनागरी लिपी ज्या स्वरुपांत लिहली जाते,त्या स्वरुपांत ती रूढ करण्याची जरुरी नाहीं, तींत थोडा बदल केला तरी चालण्यासारखा आहे. हिंदी, बंगाली, गुजराथी व मराठी या चारी भाषांकरितां अेकच लिपी रूढ केल्यामुळें खात्रीनें फायदा होअील. त्यामुळें या चारहि भाषा बऱ्याच जवळ येतील.

दक्षिण हिंदुस्थानांतील द्राविडी भाषांकरितां अुत्तरेकडील ह्या दोन लिपी कितपत अुपयोगी पडतील किंवा सर्व द्राविडी लिपीकरितां अेक सामान्य लिपी अस्तित्वांत आणतां येअील कीं काय हें मला माहित नाहीं. ज्यांनीं त्यांचा अभ्यास केला असेल, त्यांनींच त्याबद्दल मत देणें रास्त होअील.

अुर्दू लिपी ही मूलतः आहे तशीच राहिली पाहिजे. मात्र तींत थोडीफार सुबोधता आणण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करण्यास हरकत नाहीं. सिंधी लिपीचें अुर्दूशीं खूपच साम्य असल्यामुळें, अुर्दू लिपींत सिंधीचा सहज समावेश करतां येअील.

वरीलप्रमाणें दोन लिपी आपण अुपयोगांत आणल्या पाहिजेत. देवनागरी —बंगाली–मराठी-गुजराथी ही अेक लिपी, दुसरी अुर्दू; आणि जरूर पडल्यास दक्षिणी लिपी. यापैकीं कोणत्याहि लिपीची गळेचेपी करतां कामां नये. मात्र विचारविनीमय होअून दक्षिण हिंदुस्थानी लोकांनीं द्राविडी भाषांकरितां अुत्तर हिंदुस्थानी लिपी स्वीकारण्यास संमती दिली तर तसें करावयास हरकत नाहीं. ही अुत्तर हिंदुस्थानी लिपी हिंदी असेल किंवा तींत थोडाफार फरक असेल.

आतां हिंदुस्थानीचा,अुत्तर व मध्य हिंदुस्थानची मातृभाषा व त्याचप्रमाणें अखिल भारतीय भाषा या दृष्टीनें विचार करूं. या दोहोंत फरक असल्यामुळें त्यांचा वेगवेगळा विचार केला पाहिजे.

हिंदुस्थानची दोन मुख्य अंगें म्हणजे हिंदी व अुर्दू असें दिसून येअील कीं या दोन्हीं अंगाचें अधिष्ठान अेकच, व्याकरण अेकच व प्रचारांतील शब्द घेण्याचें भांडार अेकच. वस्तुत:हिंदी व अुर्दू मिळून अेकच मूलभूत भाषा. तरीपण,

सध्यां त्यांच्यामध्यें बराच विरोध निर्माण झाला आहे. हिंदीमध्यें संस्कृतमधून तर अुर्दूमध्यें कांहीं प्रमाणांत पार्शियनमधून शब्दसंपत्ति घेतली जाते, असे म्हणतात. पण यावरुन हिंदी म्हणजे हिंदूंची व अुर्दू म्हणजे मुसलमानांची भाषा असें मानणें मूर्खपणाचें आहे. अुर्दू भाषा, लिपी सोडली तर खुद्द हिंदुस्थानांत प्रसवली गेली आहे व हिंदुस्थानबाहेर तिला स्थान नाहीं. अुत्तर हिंदुस्थानांतील पुष्कळ हिंदू कुटुंबांची घरगुती भाषा अजूनहि अुर्दू हीच आहे.

मोंगल राजकर्त्यांच्या हिंदुस्थानांतील आगमनाबरोबर पार्शियन ही दरबारी भाषा म्हणून आली व मोंगलांची कारकीर्द संपुष्टांत येअीपर्यंत पर्शियनचें तेंच स्थान कायम होतें. या सर्व काळांत अुत्तर व मध्य हिंदुस्थानांतील लोकांची भाषा हिंदी हीच होती. हिंदी ही जीवंत भाषा असल्यामुळें तिनें अनेक पर्शियन शब्द आत्मसात केले. हिंदीप्रमाणेंच गुजराती व मराठी या भाषांतहि बरेच पर्शियन शब्द आले, पण बरेच पर्शियन शब्द आले तरी हिंदी ही मूळतःच हिंदी राहिली. मोंगलांच्या दरबारी कचेऱ्यांतून हिंदीची बरीचशी पर्शियनकरण झालेली भाषा बोलली जाअूं लागली. या भाषेला रेखटा म्हणत. अुर्दू हा शब्द मोंगलांच्या कारकीर्दीत, मोंगली छावण्यांत प्रथम अुपयोगांत आणला जाऊन तो हिंदीला प्रतिशब्द म्हणून प्रचारांत आला असावा, असें वाटते. हिंदीचा एक वेगळा प्रकार हें देखील त्यावरुन निदर्शनास येत नव्हतें. लिपी सोडली तर थेट १८५७ सालच्या बंडापर्यंत उर्दू म्हणजे हिंदी असेंच समजण्यांत येत असें. हिंदींतील कांहीं कवि मुसलमान आहेत, हें प्रसिद्धच आहे. या बंडापर्यंत व पुढेंहि कांहीं काळ सदर भाषा सामान्यतः हिंदी म्हणूनच ओळखली जाई. हा उल्लेख लिपीला उद्देशून नसून भारताच्या बोलीला उद्देशून होता. जे मुसलमान लेखक उर्दू लिपींत लिहित, तेंसुद्धां भाषेला सामान्यतः हिंदीच म्हणत.

एकोणीसाव्या शतकाच्या उतरार्धापासून परिस्थिती बदलली. हिंदी व उर्दू हे शब्द एकमेकांपासून निराळें असें कांहीं तरी दर्शवूं लागलें, फुटीर वृत्ति

वाढत चालली. कदाचित नवीनच निर्माण झालेल्या वाढत्या राष्ट्रीय भावनांचा हा परिपाक असावा. या भावनांचा परिणाम प्रथम हिंदुंवर झाला व त्यांनीं शुध्द हिंदी व देवनगरी लिपीचा पुरस्कार करण्यास सुरवात केली. प्रारंभी राष्ट्रीयत्व म्हणजे हिंदू राष्ट्रीयत्व असें त्यांना अपरिहार्यरित्या वाटत असें. पुढें कांहीं कालानें मुसलमानांत राष्ट्रीयत्वाची ही वृत्ति हळुहळूं बळावत चालली व त्यांना उर्दूवर फक्त आपलाच हक्क असें वाटूं लागले. लिपीबद्दल वाद माजला व कोर्टकचेऱ्या-सार्वजनिक संस्था यामध्यें कोणती लिपी वापरावी हा प्रश्न उपस्थित झाला. अशा रीतीनें प्रारंभी कांहींशा जातीय पात्रांतून वहाणाऱ्या राजकीय व राष्ट्रीय भावनांची फलश्रुति म्हणजे भाषेंतील वाढती फारकत व लिपींमधील विरोध. पुढें जसजसें हें राष्ट्रीयत्व खरेंखुरें होत चाललें व लोक आपल्या समाजापेक्षां हिंदुस्थानच्या दृष्टीनें विचार करूं लागले तस-तशीं भाषेबाबतच्या फुटीर वृत्तीला आळा घालण्याची इच्छा बळावूं लागली व विचारी लोक हिंदी व उर्दू या भाषांतील असंख्य साम्य स्थळांवर जोर देऊं लागले. हिंदुस्थानी केवळ उत्तर व मध्य हिंदुस्थानचाचि नव्हेतर सर्व देशांचीच राष्ट्रीय भाषा होऊं शकेल, असें प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें. पण दुर्दैवाने हिंदुस्थानांत जातीयतेचा बराच पगडा असल्यामुळें ऐक्यवादी प्रवृत्तीबरोबर फुटीर वृत्तीहि येथें अस्तित्वांत आहेत. अर्थात राष्ट्रीयत्वाचा पूर्ण चंद्रमा उग-वल्यावर भाषेंतील ही फुटीर वृत्ति नाहींशी होईल. आपण ही गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे. कारण त्यामुळेंच अनर्थांचें बीज कोठें आहे हें आपल्याला कळून येईल. भाषेच्या फारकतीचा आग्रह धरणाऱ्या माणसाचा बुरखा फाडा की तो बहुधा जातीय दुराग्रही व पुष्कळ वेळां राजकीयदृष्टया प्रतिगामी असल्याचें दिसून येईल.

● जरी मोगलांच्या अंमदानींत दीर्घ काळपर्यंत हिंदी व उर्दू हे शब्दप्रयोग समान अर्थी रुढ असले तरी, उर्दू हा शब्द मोगलांच्या संमिश्र छावण्यांतील

भाषेबद्दलच विशेष वापरला जाअी. मोंगली दरबार व छावण्या यामध्यें अनेक पर्शियन शब्द प्रचलीत होते व हेंच पुढें भाषेत रूढ झाले. मोंगलांच्या दरबारी थाटाच्या रहाणीचीं केंद्रें सोडून खालीं दक्षिणेकडें गेले तर अुर्दू अधिक शुद्ध हिंदीमध्यें विलीन झाल्याचें दिसून येतें. दुसरी गोष्ट म्हणजे या दरबारी जीवनाचा परिणाम खेड्यांपेक्षां शहरांवर कितीतरी पटीनें अधिक व त्यांतल्या त्यांत मध्य हिंदुस्थानांतील शहरांपेक्षां अुत्तर हिंदुस्थानांतील शहरांवर झाला.

आज अुर्दू व हिंदी यांत खरा फरक कोणता आहे तें यावरून कळून येअील. अुर्दू म्हणजे नागरी भाषा, तर हिंदी ही खेड्यांची भाषा आहे. अर्थात हिंदी भाषा ही शहरांतूनहि बोललीं जाते, पण अुर्दू मात्र पूर्णपणें नागरी भाषा आहे. याप्रमाणें अुर्दू व हिंदी यांना निकट आणण्याच्या प्रयत्नालाच शहरें व खेडा यांना निकट आणण्याच्या विशाल प्रश्नांचें स्वरूप येतें. याव्यतिरिक्त चोखाळलेला अितर कोणताहि मार्ग टिकाअू न ठरतां वरवरचा ठरेल. भाषा बोलणारे लोक बदलले कीं, त्या भाषाहि आमूलाग्र बदलतात.

नेहमींच्या घरगुती बोलीच्या दृष्टीनें पाहिल्यास हिंदी व अुर्दूमध्यें फारसा फरक नाहीं, पण वाङमयीन भाषा म्हणून त्यांच्यांत अलीकडे तफावत पडली आहे. अक्षरवाङमयांत तर हा फरक भयंकरच आहे, यामुळें कांहीं लोकांची अशीं समजूत झाली कीं, या वृत्तीमागें कोणीतरी बदमाश लोक असावेत. अर्थात, फुटीर वृत्ति वाढविण्यांत कांहीं लोकांना मजा वाटत असली तरी वरील समजूत मात्र मूर्खपणाची आहे. ज्या भाषा जीवंत असतात, त्यांच्यांत अशा वृत्तीचा शिरकाव होत नाहीं किंवा कोणत्याहि व्यक्तीला त्यांना आपल्या लहरीप्रमाणें फारसें वळण देतां देत नाहीं. अशा स्थितींत वरवर दिसणाऱ्या या फारकतीचीं खोल मिमांसा करणें जरूरीचें आहे.

✗ ही फारकत दुर्दैवी असली तरी जिवंतपणाचें लक्षण आहे. दीर्घ कालपर्यंत हिंदी व उर्दू यांची सांठलेल्या डबक्यांप्रमाणें स्थिति होती. आत कोठें त्यांच्यांत चैतन्य निर्माण झाले असून त्या आगे कूच करीत आहेत.

नवीन विचारांना मूर्त स्वरुप देण्याची जशी त्यांची खटपट त्याचप्रमाणें जुन्या चाकोरींतून बाहेर येऊन वाङ्मयाला नवीन वळण देण्याकरितां त्या धडपडूं लागल्या आहेत. त्या दृष्टीनें पाहिल्यास दोहोंतील शब्दसंग्रह अपुरा आहे; पण त्याबरोबरच हेंहि खरें कीं दोघींच्या आटोक्यांत शब्दांचा संपन्न संग्रह आहे. एकीचें शब्दकोठार म्हणजे संस्कृत तर दुसरीचें पर्शियन. यामुळें घरगुती किंवा व्यवहारांतील भाषा सोडून आपण गूढ वातावरणांत प्रवेश केला कीं, ही फारकत वाढल्याचें दिसून येईल. विशेषतः स्वभाषेचें पावित्र्य राखण्याच्या अहमिहीकेनें वाङ्मयमंडळें या प्रवृत्तीचा अतिरेक करतात आणि त्याचा परिणाम एकमेकांवर, फुटीर प्रवृत्तीला प्रोत्साहन दिल्याचा आरोप केला जातो. त्यांना दुसऱ्यांच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें, पण स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं.

या सर्व गोष्टींचा तात्कालीक परिणाम म्हणजे हिंदी व उर्दू यामधील फूट वाढली आहे. कधीं कधीं असा समज होतो कीं, या दोन्ही भाषा अगदीं वेगवेगळ्या होणार ! पण हा समज अस्थानीं आहे, त्यामुळें घाबरून जाण्याचें कांहींच कारण नाहीं. हिंदी व उर्दू यांच्यांत नवचैतन्य खेळूं लागलें आहे, यामुळें त्यांच्यामधील अंतर तात्पुरतें वाढणें संभवनीय असलें तरी, एकंदरींत तें स्वागतार्हच आहे. आज हिंदी व उर्दू हे दोन्ही भाषा प्रकार, शास्त्रीय, राजकीय, आर्थिक, व्यापारी व कांहीं प्रसंगी सांस्कृतिक बाबतींतील नवीन विचारसरणी योग्य रीतीनें व्यक्त करुं शकत नाहींत, पण त्याबरोबरच दोहों-चीहि अद्यावत समाजाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें संपन्न होण्याची पराकाष्ठा चालूं असून त्यांत त्यांना यशहि येत आहे. अशा स्थितींत दोन्ही भाषांना एकमेकांबद्दल द्वेष कां वाटावा ? आपली भाषा शक्य तितकी सघन व्हावयाला पाहिजे, आणि जर आपण आपल्या विशिष्ट पार्श्वभूमीला जमत

नाहीं, म्हणून हिंदी अगर उर्दूची गळचेपी करूं लागलो तर ही गोष्ट शक्य होणार नाहीं. आपल्याला दोन्ही भाषा पाहिजेत व दोन्हींचाहि उपयोग केला पाहिजे. हिंदीची प्रगति म्हणजे अुर्दूची व त्याअुलट अुर्दूची प्रगति म्हणजे हिंदीची ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. त्यामुळें दोन्ही भाषांचा अेकमेकीवर मोठा परिणाम होअून त्यांचा शब्दसंग्रह वाढेल. नवीन नवीन शब्द व विचाराकरितां प्रत्येकानें आपलीं दारें सताड खुली ठेविली पाहिजेत. खुद्द मला तर वाटतें कीं, हिंदी व अुर्दू या दोन्हीं भाषांनीं, परकीय भाषेंतील शब्द व विचार आत्मसात करावेत. अिंग्लिश, फ्रेंच वगैरे परकीय भाषांतील व नेहमीं प्रचारांत असलेल्या शब्दांना, संस्कृत अगर पर्शियनमधून मुद्दाम प्रतिशब्द बनविणें हास्यास्पद आहे.

हिंदी व अुर्दू जवळ आल्या पाहिजेत, याबद्दल शंकाच नाहीं. दोन्ही भाषा निरनिराळ्या वावरत असल्या तरी पुढेंमागें दोन्ही मिळून अेकच भाषा होअील. त्यांच्या अेकीकरणाची प्रवृत्तिच अितकी जोरदार आहे कीं तीपुढे व्यक्तीच्या विरोधाचा टिकाव लागणें शक्य नाहीं. आपल्यामध्यें राष्ट्रीयत्व व हिंदुस्थानचें अैक्य साधण्याची सार्वत्रिक लालसा आहे व तिचा शेवटीं विजय होणारच. पण या अिच्छेपेक्षांहि द्रुतगतीचें दळणवळण, वहातुकीचीं साधनें, विचारांची देवाण घेवाण व आपल्या राजकीय व सामाजिक क्षेत्रांत होत असलेली परिवर्तनें या गोष्टी प्रभावी ठरत आहेत. जागतिक घडामोडींचा सुसाट प्रवाह आमच्यावरून वहात असतां, आपण आपल्या आकुंचित चाकोरींत कसें राहूं शकूं ? शिक्षणाचा प्रसार जनतेंत झाला कीं, प्रमाणबद्धता व अैक्य या गोष्टी येणें अपरिहार्य आहे.

हिंदी व अुर्दू यांचा भिन्नभिन्न मार्गे जो विकास होत आहे, त्याकडें आपण संशयास्पद दृष्टीनें पहातां कामा नये. हिंदीमध्यें जें नवीन चैतन्य निर्माण होत आहे, तें अुर्दूच्या चहात्यांना स्वागतार्ह वाटलें पाहिजे, त्याचप्रमाणें हिंदीच्या भक्तांनीं, अुर्दूच्या प्रगतिबद्दल चाललेल्या प्रयत्नांचें कौतुक केले पाहिजे. आज या दोन्ही भाषांचे प्रवाह समांतर (Parallel;) व अलगपणें वहात असले तरी त्यांचा संगम हा होणारच. मात्र आपण त्यांच्यामधील प्रचलित

विभक्तता स्वच्छेनें मान्य करीत असलों तरी दोहोंच्या या ऐक्य प्रवृत्तीला हातभार लावला पाहिजे. या ऐक्याचा पाया कोणता ? अर्थात जनता. जनता म्हणजे हिंदी व अुर्दू यांच्यामधील सामान्य दुवा असला पाहिजे. आपल्यांतील बेदिलीचीं बऱ्हंशीं कारणें म्हणजे जनतेच्या दृष्टीनें विचार न करतां आपण अति कृत्रिम वाङमयांत विहार करीत असतो. साहित्यिक लिहितात, पण तें कुणाकरितां ? ज्या वाचकवर्गावर आपल्या विचारांची छाप पाडावयाची किंवा ज्यांना तें मान्य करावयाला लावावयाचें त्यांचें चित्र प्रत्येक लेखकाच्या मानसचक्षुंपुढें कळत वा न कळत अुभें राहिलें पाहिजे. पण दुर्दैवानें आपल्यामधील अफाट निरक्षरतेमुळें अशा वाचकांची संख्या मर्यादित आहे. तरीहि मला वाटतें कीं, आज वाचकांची ही संख्या अगदींच कमी नाहीं व पुढें ती झपाट्यानें वाढतहि जाअील. मी वाङमयाच्या बाबतींत तज्ञ नाहीं, पण माझें असें मत झालें आहे कीं सध्यां जेवढ्या वाचकांचा अुपयोग करून घेतां येण्याजोगा आहे, तेवढ्यांचासुद्धां अुपयोग करून घेण्याची बुद्धी सर्वसाधारण हिंदी अगर अुर्दू लेखकाला होत नाहीं. बहुतेक लेखक, ज्या साहित्यिक मित्रांच्या वर्तुळांत वावरत असतात, त्यांचाचपुरता विचार करतात व त्यांना आवडेल अशाच भाषेंत लिहितात. त्यांचा आवाज व शब्द, अधिक व्यापक अशा जनसमूहापर्यंत जाअून पोहोंचत नाहींत व पोहोंचले तर ते त्यांना दुर्बोध असतात. अशा स्थितींत हिंदी व अुर्दू पुस्तकांचा खप मर्यादित असल्यास त्यांत नवल तें काय ? आमच्या हिंदी व अुर्दू नियतकालिकांचीसुद्धां हीच स्थिति. या नियतकालिकांतून अशी प्रौढ भाषा वापरण्यांत येते कीं, प्रचंड अशा सामान्य वाचकवर्गाला ती कळणें कठीण.

याकरितां आमच्या लेखकांनीं बहुजनसमाजांतील वाचकवर्ग व ग्राहक यांच्या दृष्टीनें विचार करून, मुद्दाम त्यांच्याकरितांच लिहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळें भाषेंत सुबोधता येअील. तसेंच भाषेच्या ऱ्हासाचीं लक्षणें म्हणून समजण्यांत येणारीं कृत्रिम व अलंकारिक अशी शब्द आणि वाक्यरचना जाअून त्या जागीं जोरदार वाङमय निर्माण होअूं लागेल. संस्कृती व वाङमय म्हणजे दरबारी वातावरणाची अपत्यें किंवा भांवडें या संभ्रमणांतून आपण अद्याप जागे

झालेलों नाहीं. त्या दृष्टीनेंच केवळ आपण विचार करीत राहिलों तर आकुंचित वातावरणांतच सतत पिचत राहूं व जनतेच्या अंतःकरणाचा कधींच ठाव घेऊं शकणार नाहीं. जनता हा संस्कृतीचा व्यापक पाया असला पाहिजे व भाषा ही अर्थात संस्कृतीचें मूर्त स्वरूप असल्यामुळें तिला तोच पाया लाभला पाहिजे.

पण जनतेच्या निकट येणें याचा अर्थ केवळ शब्द व वाक्यें सोपीं वापरणें असा नव्हे. या सोप्या लिखाणांतून कसले विचार व कसला भावार्थ पुढें मांडण्यांत येतो, यालाहि महत्व आहे. ज्या भाषेद्वारें जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घ्यावयाचा असेल तींत तिचीं सुखदुःखें, आशा-आकांक्षा यांची मूर्तिमंत चित्रें अुभी केलीं पाहिजेत. वाङमय म्हणजे सामुदायिकरित्या जनतेचें प्रातिनिधीक, तींत जनतेच्या जीवनाचें प्रतिबिंब अुमटलें पाहिजे; वरच्या वर्गांतील मूठभर लोकांचें नव्हे. भाषेचीं मुळें खोलवर चांगली रुजण्याकरितां ह्या गोष्टीची आवश्यकता आहे.

केवळ हिंदी व अुर्दू नव्हे तर सर्वच हिंदी भाषांना ही गोष्ट लागू पडते. अलीकडे सर्वच देशी भाषांतून ही विचारसरणी दृग्गोचर होत असून, त्या अधिकाधिक जनताभिमुख होऊं लागल्या आहेत. या प्रवृत्तीला जोराची गति दिली पाहिजे व आमच्या लेखकांनीं तिला चालना देण्याची जाणूनबुजून प्रयत्न केला पाहिजे.

मला वाटतें, परकीय देशांतील प्राचीन व त्याचप्रमाणें आधुनिक अशा ग्रंथांचा अनुवाद वगेरे मार्गांनीं पाश्चात्य वाङमयाशीं आमच्या लेखकांनीं अधिकाधिक सहवास ठेविणें अिष्ट आहे, यामुळें अितर राष्ट्रांतील सांस्कृतिक, वाङमयीन व सामाजिक चळवळींची आपणांस नियमितपणें माहिती होत राहीलच, पण त्याशिवाय अद्यावत विचारसरणी आपल्या भाषेंत येऊन, ती जोमदार होअील.

मला वाटतें सर्व हिंदी भाषांत, बंगाली भाषेनें जनतासंघर्ष जास्त प्रमाणांत घडवून आणलेला आहे. बंगाली वाङमय हें सर्वसामान्य बंगाली लोकांपासून वेगळें किंवा त्यांच्या आटोक्यापलिकडचें नाहीं. रवींद्रनाथ टागोर

यांनीं आपल्या अलौकिक प्रभावानें वरच्या वर्गांतील मूठभर सुसंस्कृत लोक व जनता यांच्यामधील अंतर नष्ट केलें असून, त्यांच्या कविता व गाणीं आज बंगालमधील अत्यंत साध्या झोंपडींतहि गायिली जातात. रवींद्रनाथांनीं आपल्या लिखाणानें हि बंगाली वाङमयांत महत्वाची भर घातली आहे, अितकेंच नव्हे तर तेथील जनतेचें वाङमयीन जीवन संपन्न करण्याचें श्रेय घेतलें आहे. आज बंगाली भाषेचा अत्यंत सुटसुटीत शब्दांत अत्युत्कृष्ट वाङमनीय कलाकृती निर्माण करण्याचें प्रभावी साधन म्हणून जो लौकिक स्थापन झाला आहे, त्याचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. रवींद्रनाथासारखे प्रभावीं साहित्यिक निर्माण करण्याचें आपल्या हातांत नाहीं, पण त्यांच्या अुदाहरणावरून बोध घेअून त्याप्रमाणें आपल्याला मार्ग आंखता येअील. या बाबतींत गुजराथीं भाषेचा अुल्लेख करणेंहि जरूर आहे. गांधीजींच्या साध्या पण प्रभावी लेखनाचा परिणाम सध्यांच्या गुजराथी भाषेवर फार झाला आहे, असें म्हणतात.

आतां हिंदुस्थानीचा 'अखिल भारतीय भाषा' या दृष्टीनें विचार करूं. हा विचार करतांना आपण लक्षांत ठेविलें पाहिजे कीं हिंदुस्थानी भाषा ही प्रांतिक भाषांची विरोधी नाहीं किंवा तिचें त्यांच्यावर आक्रमण होण्याचाहि प्रश्न अुद्भवत नाहीं. तसेंच लिपीचा प्रश्नहि सध्यां बाजूला ठेवूं. कारण दोन्हीं लिपींना पूर्ण वाव असला पाहिजे, हें अुघड आहे. अर्थात प्रत्येकानें दोन्हीं लिपी शिकल्या पाहिजेत, असा आग्रह आपण धरूं शकत नाहीं. तसें सांगणें म्हणजे जनतेवर नसता भार लादण्यासारख्या आहे. सरकारनें दोन्हीं लिपींना प्रोत्साहन द्यावें व ज्यांना त्यापैकीं कोणतीहि अेक लिपी शिकावयाची असेल त्यांच्या अगर त्यांच्या पालकांच्या मर्जीवर सदर लिपी शिकण्याचें सोपवावें. असो. लिपीव्यतीरिक्त फक्त भाषेचाच आपण विचार करूं.

व्यापक प्रसार व हिंदुस्थानवर पडलेली छाप या गोष्टी वगळ्ल्या तरी, अखिल भारतीय भाषा होण्याच्या दृष्टीनेंहि हिंदुस्थानी बरीच सोयीची आहे. तुलनात्मकदृष्ट्यां ही भाषा शिकायला सोपी असून लिंगभेद वगैरेबाबत अुद्भवणारा थोडाफार गोंधळ सोडला, तर तिचें व्याकरण सुटसुटीत आहे. हिंदुस्थानी आणखी सोपी करण्याची शक्यता आहे ?

या बाबतींत अेका अत्यंत यशस्वी झालेल्या प्रयोगाचा आपल्याला अुपयोग होण्यासारखा आहे. हा प्रयोग म्हणजे बेसीक अिंग्लशचा. बऱ्याच अिंग्लिश तज्ञांनीं दीर्घ काळपर्यंत श्रम करुन मूलतः अिंग्लशच पण अत्यंत सुलभ अशी भाषेची ही रीत तयार केली असून शिकण्याच्या दृष्टीनें ती फारच सोपी आहे. थोडेफार साधे नियम सोडले तर त्यांत व्याकरण जवळजवळ कांहींच नाहीं व शास्त्रीय, तांत्रिक व व्यापारी पारिभाषिक शब्द वगळतां, अितर शब्दसंग्रह फक्त ८५० शब्दांचा आहे. हा सर्व शब्दसंग्रह व व्याकरण फक्त अेका कागदावर अुतरून घेतां येतो व साधारण बुद्धीमान माणसाला तो शिकायला दोनतीन आठवड्यांहून अधिक काळ लागत नाहीं. अर्थात व्यवहारांत तिचा अुपयोग करावयाचा सराव मात्र पाहिजेच.

बेसिक अिंग्लशचा प्रयोग, पूर्वींच्या व्होलॅपक, अेस्पेरँटो वगैरे अेक सर्वसाधारण जागतिक भाषा तयार करण्याच्या पूर्वींच्या प्रयोगापेक्षां अगदींच निराळा आहे. या भाषा जरी सुलभ असल्या तरी फारच कृत्रिम असून, त्या शिकण्याकरितां जादा ताण सहन करावा लागत असे. त्यांच्यांत जीवंतपणा नव्हता. सहाजिकच त्यांचा मोठ्या प्रमाणांत पुरस्कार कधींच केला गेला नाहीं. बेसिक अिंग्लशमध्यें, त्यांतील सर्व सोयी आहेतच, पण मुख्य गोष्ट म्हणजे तींत कृत्रिमतेचा अभाव व चैतन्य आहे. ज्यांना बेसिक अिंग्लिश येते, त्यांना आपलें मनोगत सोप्या व परिणामकारक भाषेंत व्यक्त करतां येतेंच, पण शिवाय त्यामुळें, त्यांना जर अिच्छा असेल तर अभिजात अिंग्लिश हि साध्य करुन घेतां येअील.

बेसिक अिंग्लिशचा जो मी अुत्साहानें पाठपुरावा करीत आहे, त्यामुळें लोक मला विचारतील " मग हीच अखिल भारतीय भाषा कां करुं नये ? " मी म्हणतो, तें शक्य नाहीं. कारण या सर्व भाषेची रचनाच मुळीं आपल्या लोकांच्या दृष्टीनें परकीय आहे. बेसिक अिंग्लश अखिल भाषा म्हणून लादण्यापूर्वीं, आपल्याला तींत आमूलाग्र बदल घडवून आणावा लागेल. शिवाय हिंदुस्थानी जशी सर्व हिंदुस्थानभर माहित आहे, तशी बेसिक अिंग्लिश नसल्यामुळें व्यावहारिक अडचणीहि बऱ्याच अुद्भवतील.

पण मला वाटतं, ज्या ठिकाणीं अिंग्लिश ही परकीय भाषा म्हणून शिकविली जाते व जेथें तिचा व्यापक अुपयोग करावा लागतो, त्या ठिकाणीं बेसिक अिंग्लिश शिकवावयास हरकत नाहीं. ज्यांना सदर भाषेचा विशेष अभ्यास करावयाचा असेल त्यांनींच स्टँडर्ड अिंग्लिश शिकावें.

बेसिक अिंग्लिशप्रमाणें आपल्याला बेसिक हिंदुस्थानी तयार करतां येअील कां? आपल्या देशांतील विद्वान लोकांनीं लक्ष घातलें तर करणें शक्य आहे. या भाषेचें व्याकरण शक्य तितकें--किंवा जवळजवळ आहे असें वाटणार नाहीं-अितकें सोपें असावें, मात्र त्यामुळें सध्यांच्या हिंदुस्थानी व्याकरणावर गदा येतां कामां नये.मुख्य जी गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.ती ही कीं बेसिक भाषा ही जरी व्यवहारांतील विचार व्यक्त करण्याचें साधन असलें तरीहि तिचा अुपयोग भाषेचा पुढील अभ्यास करण्याच्या मार्गांतील टप्याप्रमाणें झाला पाहिजे. बेसिक हिंदुस्थानीचा शब्दसंग्रह सुमारें हजार अेक शब्दांचा असावा. हिंदी भाषांतून आढळून येणारे साधारण शब्द, अेवढ्याच दृष्टीनें शब्दांची अितःस्तता निवड केली जाअूं नये. हा शब्दसंग्रह शक्य तितका परिपूर्ण व नेहमींच्या लिहिण्या बोलण्याकरितां विशेष मदत घेण्याची पाळी येणार नाहीं, असा असावा.

अशा प्रकारची बेसिक हिंदुस्थानी अखिल भारतीय भाषा करावी. सरकारनें थोडासा प्रयत्न केला तर ही भाषा अतिशय झपाट्यानें देशभर पसरेल व त्यामुळें आपणां सर्वांना हवें असलेलें राष्ट्रीय अैक्य घडून येअील. तीमुळें हिंदी व अुर्दू निकट येअून, हिंदुस्थानांतील सर्व भाषांचें अैक्य घडून येअील आणि या समान व खंबीर भाषिक पायामुळें, वैचित्र्य किंवा विविधता आली, तरी विभक्तता येणार नाहीं. ज्यांना आपल्या हिंदुस्थानीच्या ज्ञानांत भर पडावी असें वाटतें, त्यांना तसें सहज करतां येअील आणि ज्यांचें केवळ बेसिक हिंदुस्थानीवर समाधान होत असेल, त्यांनाहि राष्ट्राच्या व्यापक जीवनांत भाग घेतां येअील.

हिंदी किंवा अुर्दू यांची अलग अलग वाढ होण्यास आपण हरकत घेतां कामा नये, असें मी पूर्वी म्हटलें आहे. हिंदी किंवा अुर्दू यापैकीं कोणत्याहि भाषेंतून येणारे शब्द जर परिस्थित्यानुसार व जनतेंतून आलेले त्याचप्रमाणे जीवनस्पर्शी व जोमदार असतील तर त्यामुळें आपली भाषांविषयक परंपरा अधिक संपन्न होओील. पण केवळ गरज म्हणून ओढूनताणून नवीन कृत्रिम शब्द तयार करण्याला कांहींच अर्थ नाहीं. देशाच्या राजकीय, आर्थिक, शास्त्रीय व व्यापारी गरजा लक्षांत घेअून आपल्याला नवीन असें कांहीं शब्द बनवावे लाग- तील हें खरें असले तरी असे शब्द बनवितांना आपण दुटप्पीपणा व कुटीर वृत्ति यापासून अलिप्त राहिले पाहिजे. मला वाटतें, जे शब्द जगाच्या बऱ्याच भागांत रूळलेले आहेत, असे परकीय तांत्रिक शब्द आपण जसेंच्या तसें घेअून हिंदु- स्थानी भाषेंत समाविष्ट करावेत. त्याहिपुढें जाअून मी म्हणेन कीं, असे शब्द सर्वच हिंदी भाषांनीं घ्यावेत. यामुळें हिंदी व परकीय अशा विविध भाषेंतील शास्त्रीय व तांत्रिक ग्रंथ आमच्या लोकांना सहजरित्यां वाचतां येतील. याअुलट दुसरा कोणताहि मार्ग अवलंबिला तर विद्यार्थ्यांचा गोंधळ अुडेल. त्यांना किती तरी तांत्रिक शब्द शिकावे व दुसऱ्या भाषांतील अनेक महत्वाचीं पुस्तकें वाचावीं लागतात, हें विसरून चालणार नाहीं. शास्त्रीय शब्दांचा वेगळा शब्दसंग्रह करणें म्हणजे आपल्या शास्त्रीय विज्ञानाची कोंडी करून वाढ खुंटविण्यासारखे आहे. त्यामुळें आपला शिक्षकवर्ग व विद्यार्थी यांच्यावरहि असह्य असा बोजा पडेल. आपल्याला असें दिसून येतें कीं, जगांतील सार्वजनिक जीवन व घडामोडी आजच अेकत्र गुंफल्या गेल्या आहेत, त्यांचा परस्पर संबंध आहे. आपल्या लोकांना त्या सहजगत्या आकलन होअून, त्यांत भाग घेता येअील अशी व्यवस्था केली पाहिजे. तसेंच परकीय लोकांनाहि त्यामुळें आपल्या सार्वजनिक घडामोडींची माहिती झाली पाहिजे.

अशा रीतीनें बरेच परकीय शब्द घेतां येतील व घेतलें जाणें अवश्य आहे, पण बरेच तांत्रिक शब्द खुद्द आपल्या भाषेंतूनहि घ्यावे लागतील. अशा प्रकारच्या सर्वसाधारण अुपयोगांतील शब्दांची यादी आपल्या भाषातज्ञ व तंत्र-

ज्ञानीं करावी. यामुळें भाषेंतील घेडगुजरी व मोघमपणा यासारखे अगदीं अनावश्यक प्रकार जाअून तींत सुसंबद्धता व अचूकपणा येअील. पण त्याशिवाय हास्यास्पद वाक्यरचना व बोलीलाहि आळा बसेल. परकीय भाषेंतील वाक्यें व शब्द यांचा अर्थ न लक्षांत घेतां, त्यांना प्रतिवाक्यें व शब्द निर्माण करण्याची आमच्या वृत्तपत्रकारांना घातुक संवय लागली आहे आणि याचा परिणाम म्हणजे पुढें हे स्वैर शब्द भाषेंत रुढ होअून, त्यामुळें विचारांत गोंधळ माजतो. बरेच लोक *Trade Union* चें भाषांतर व्यापार संघ असें करतात. शब्दशः भाषांतर, पण वस्तुस्थितीला अगदीं सोडून सर्वांत *Imperial preference* चें भाषांतर करण्यांत आलें आहे, तें बहारीचें आहे. अेका अुत्साही पत्रकारानें या शब्दाचें ' शाहीपसंत " असें भाषांतर केलें आहे.

मग भाषेच्या बाबतींत सरकारचें धोरण काय असावें ? सरकारी कचेऱ्या शिक्षण संस्था यांच्या दृष्टीनें सरकारनें या प्रश्नांचा विचार केला पाहिजे.

प्रत्येक प्रांतांतील प्रांतिक भाषा हीच सरकारी कामकाजाची भाषा असावी पण त्याबरोबरच अखिल भारतीय भाषा म्हणून हिंदुस्थानीला अधिकृतरीत्या मान्यता असावी व देवनागरी आणि अुर्दू या दोन्हीं लिपींत लिहलेले कागदपत्र दाखल करून घ्यावेंत. ज्या प्रांतांत हिंदुस्थानी भाषा चालू आहे, तेथें सदर दोन्हीं लिपींना अधिकृत मान्यता व दोन्हींपैकीं कोणत्याहि लिपींत कोर्टकचेऱ्यांना अुद्देशून लिहिण्याची परवानगी असावी. कोणत्याहि विशिष्ट लिपींत नकला वगैरे सादर करण्याचें बंधन नसावें. कोर्ट-कचेऱ्यांनी प्रसंगानुसार कोणतीहि लिपी अुपयोगांत आणावी पण प्रत्येक कामकाज दोन्हीं लिपींतून केलें गेलें पाहिजे, असा नियम करणें हास्यास्पद ठरेल. विवक्षीत प्रदेशांत जी लिपी चालू असेल तीच तेथील कोर्टकचेऱ्यांची प्रामुख्यानें लिपी होअील, पण सरकारी जाहीरनामे मात्र दोन्हीं लिपींतून काढावेत.

विद्यार्थ्यांची जी भाषा त्याच भाषेंत शिक्षण देण्याचें सरकारी धोरण असावें. याप्रमाणें प्रत्येक भाषिक प्रदेशांत तेथील भाषाच शिक्षणाचें माध्यम असावें. पण मी आणखी अेक पाअूल पुढें जातो. ज्या प्रदेशांत वेगळीं भाषा

चालतें, त्या ठिकाणीं विवक्षीत भाषा बोलणाऱ्या लोकांची पुरेशी संख्या असली तर त्यांना, स्वतःच्या भाषेंतून शिक्षण मिळण्याबद्दल प्रांताच्या सरकारकडे मागणी करतां येअील. अेकाद्या सोयीच्या केंद्रांत किती विद्यार्थी येतात, यावर ही गोष्ट अवलंबून आहे. हा नियम प्राथमिक व विद्यार्थ्यांची संख्या भरपूर असेल तर दुय्यम शिक्षणालाहि लागूं करण्यास हरकत नाहीं. अुदाहरणार्थ कलकत्ता येथें शिक्षणाचें माध्यम बंगाली हें राहील. पण ज्यांच्या मातृभाषाच हिंदुस्थानी, तामीळ, तेलगू, गुजराथी वगैरे आहेत,अशांची संख्याहि तेथें बरीच आहे. यापैकीं प्रत्येक गटाला आपल्या प्राथमिक शाळांत स्वतःची मातृभाषाच चालावी, अशी सरकारकडे मागणी करतां येअील. हा नियम दुय्यम शिक्षणाला कितपत लावतां येअील, याची मला खात्री नाहीं. विद्यार्थ्यांची संख्या व अितर बऱ्याच गोष्टींवर हें अवलंबून आहे. ज्या प्रदेशांत त्यांचें वास्तव्य तेथील भाषा म्हणून त्यांना बंगाली शिकावें लागेल; पण ही गोष्ट दुय्यम शिक्षणाच्या आरंभीच्या अवस्थेंत व पुढेंहि करतां येअील.

हिंदुस्थानीं प्रांतांत देवनागरी व अुर्दू या दोन्हीं लिपी शिकविण्यांत येतील व त्याकरितां विद्यार्थी अगर त्यांच्या पालकांना दोन्हींपैकीं कोणतीहि अेक लिपी पसंत करावी लागेल. प्राथमिक अवस्थेंत अेकच लिपी अुपयोगांत आणावी, पण दुय्यम शिक्षणांत, दुसऱ्या लिपीलाहि प्रोत्साहन द्यावें.

ज्या प्रांतांत हिंदुस्थानी नाहीं,तेथें दुय्यम शिक्षणक्रमांत बेसिक हिंदुस्थानी शिकवावी. लिपीचा प्रश्न ज्याच्या त्याच्या मर्जीवर सोंपवावा.

विश्वविद्यालयीन शिक्षण प्रांतिक भाषेंतून द्यावें, मात्र हिंदुस्थानी (दोहोंपैकीं अेक लिपी) व कोणतीहि अेक परकी भाषा अभ्यासक्रमांत अंतर्भूत असावी. तांत्रिक शिक्षणक्रमांत मात्र ही सक्ती नसावी. आपल्या दुय्यम शाळांतून परकी व त्याचप्रमाणें देशांतील अभिजात भाषा शिकविण्याची तरतूद असावी, पण कांहीं विवक्षीत अभ्यासक्रम व विश्वविद्यालयीन अभ्यासाची तयारी याव्यतिरिक्त, त्याबाबत सक्ती मात्र नसावी.

प्रांतिक भाषांत, मी पुस्तू व पंजाबी यांचा अुल्लेख केला आहे. मला

वाटतें, प्राथमिक शिक्षण सदर भाषांतून द्यावें, पण त्या विशेष प्रकर्ष पावलेल्या भाषा नसल्यामुळें त्यांतून अुच्च शिक्षण कितपत देतां येअील याबद्दल संशय असून त्याचा विचार करावा लागेल. कदाचित या प्रदेशांत हिंदुस्थानी हें अुच्च शिक्षणाचें अुपयुक्त माध्यम ठरेल.

मी मोठ्या आढ्यतेनें प्राथमिक शिक्षणापासून तो दुय्यम शिक्षणापर्यंत अनेक सूचना केल्या आहेत. मी अर्थात, शिक्षण किंवा भाषातज्ञ नसल्यामुळें, माझ्या लेखांत जीं विधानें केलीं गेलीं आहेत, त्यावर सहज टीका करतां येअील किंवा त्यांच्या अंमलबजावणीच्या मार्गांतील अडचणी दाखवितां येतील. पण अेका दृष्टीनें माझी अतज्ञता अुपकारकच ठरते, त्यामुळें या प्रश्नाचा मी नवशिक्या माणसाच्या दृष्टीनें व त्याचप्रमाणें पूर्वग्रहविरहित विचार करूं शकतो. त्याप्रमाणेंच मला हेंहि स्पष्ट करावेसे वाटतें कीं, मी या लेखांत शिक्षणासारख्या महत्वाच्या व अवघड विषयाचा अेकंदर समुच्चयानें विचार करीत नाहीं. मी सदर विषयाच्या अेका अंगाचा— भाषेचा अुहापोह करीत आहे. जेव्हां आपण सर्व शिक्षणाचा सामुदायिक विचार करूं लागूं, तेव्हां जें सरकार व जो समाज निर्माण करणें आपलें ध्येय आहे, त्यांच्या दृष्टीनें शिक्षणाचा विचार करावा लागेल; आपल्या देशांतील नागरिक कसें असावेत व त्यांचे अुद्योगधंदे कोणते रहावेत, हें त्यावेळीं ठरवावें लागेल; अशा शिक्षणक्रमांशी त्यांचें जीवन व धंदे यांची सांगड घालावी लागेल; त्यांच्या खासगी, सामाजिक व सार्वजनिक जीवनांत आपल्याला अेकतानता व समतोलपणा आणावा लागेल. तसेंच आधुनिक जगांत आपल्याला योग्य स्थान मिळावें असें वाटत असेल तर तांत्रिक व शास्त्रीय शिक्षणावर कितीतरी अधिक जोर द्यावा लागेल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्याला या व अितर बऱ्या गोष्टींना मूर्त स्वरूप द्यावें लागेल व त्याकरितां सध्यांची नालायक, अकार्यक्षम व खर्चिक शैक्षणिक पद्धति रसातळाला नेअून, त्या ठिकाणीं भक्कम पायावर नवीन रचना करावी लागेल.

असो. सध्यां आपण फक्त भाषेचा विचार करूं व त्याबाबत कांही सर्वसाधारण मार्ग निघतो कां अेवढेंच पाहूं. मी हा लेख या विषयाचा व्यापक

दृष्टीकोनांतून विचार व्हावा, अेवढ्याचकरितां लिहिला आहे. मी ज्या सर्व-साधारण तत्वांचा अूहापोह केला आहे, त्यावर जर अेकमत झाले तर त्यांची अंमलबजावणी करणें कठीण नाहीं. आज तथाकथित प्रांतिक स्वायत्तता असूनहि यापैकीं बहुतेक तत्वें मूर्त स्वरुपांत आणतां येत नाहींत. आम्हांला पैशाचें पाठबळ नाहीं व शिवाय आमचे हात अनेक तऱ्हेनें बांधून टाकण्यांत आलेले आहेत. पण ज्या मर्यादेपर्यंत हीं तत्वें अंमलांत आणतां येतील, तेवढ्या मर्यादे-पर्यंत आणावयास हरकत नाहीं.

माझ्या या लेखांत भाषावार प्रदेश व प्रांतिक भाषा असा वारंवार अुल्लेख आला आहे. प्रांतिक घटक हे भाषावार प्रदेशाला अनुरुप असले पाहिजेत, अेव-ढेंच त्यांत मला सूचवावयाचे आहे. असो.

शेवटीं सोयीकरितां मी माझ्या मुख्य सूचनापैकीं कांहीं येथें देत आहे.

१ आपलें सार्वजनिक कामकाज व सरकारी शिक्षण ज्या त्या भाषावार प्रदेशांतील भाषेंतून दिलें जावें. त्या त्या प्रदेशांत सदर भाषेला प्राधान्य असावें. या कारणाकरितां ज्या भाषांना अधिकृतरित्यां मान्यता मिळाली पाहिजे, त्या भाषा पुढीलप्रमाणे होत. हिंदुस्थानी [हिंदी व अुर्दू,] बंगाली, गुजराथी, मराठी, तामीळ, तेलगू, कानडी, मल्याळी, अुरिया, आसामी, सिंधी व कांहीं प्रमाणांत पुश्तू व पंजाबी.

२ हिंदुस्थानी बोलीच्या विभागांत हिंदी व अुर्दू या भाषांना त्याच्या लिपीसह अधिकृत मान्यता द्यावी. सार्वजनिक जाहिरनामे दोन्ही लिपींतून काढावेत. कोर्टकचेऱ्याकडे कोणत्याहि अेका लिपींत लिहण्याची मुभा असावी व दुसऱ्या लिपींत नकला पुरविण्याबाबत त्यांच्यावर बंधन नसावें.

३ हिंदुस्थानी विभागांत शिक्षणाचें माध्यम हिंदुस्थानी हें असावें. दोन्ही लिपींना मान्यता द्यावी व दोन्हीहि प्रचारांत असाव्यात. लिपीची पसंती विद्यार्थी किंवा त्याच्या पालकांवर सोंपवावी. दोन्ही लिपी शिकण्याबद्दल विद्यार्थ्यांवर

सक्ती असणार नाहीं, पण दुय्यम शिक्षणावस्थेंत दोन्ही लिपींना अुत्तेजन असावे.

४ हिंदुस्थानीला [दोन्ही लिपींत] अखिल भारतीय भाषा म्हणून मान्यता असावी. अखिलभारतीय भाषा म्हणून हिंदुस्थानांतील कोणत्याहि भागांतील माणसाला कोर्टकचेऱ्यांकडे, हिंदुस्थानांतील (दोन्हींपैकीं अेका लिपींत) लिहिण्यास मोकळीक असून, दुसऱ्या लिपींत अगर भाषेंत नकला हजर करण्याची त्याच्यावर सक्ती नसावी.

५ देवनागरी, बंगाली, गुजराथी व मराठी या लिपींचें अेकीकरण करून, त्यांतून छपाअी, टायपिंग व अितर अद्यावत यांत्रिक साधनांकरितां अुपयुक्त अशी अेक संमिश्र लिपी बनविण्याचा प्रयत्न व्हावा.

६ सिंधी लिपी अुर्दूमध्यें सामील करावी व खुद्द अुर्दू लिपी,छपाअी, टायपिंग वगैरेकरितां जितकी सुलभ करतां येअील, तेवढी करावी.

७ देवनागरी व दक्षिणी लिपी यांच्यामधील तफावत कमी करण्याची कितपत शक्यता आहे, हें पहावें. ही गोष्ट व्यवहार्य वाटत नसेल तर तामिळी, तेलगू, कानडी व मल्याळी आदिकरून दक्षिणी भाषांकरितां अेक सामान्य लिपी तयार करण्याचा प्रयत्न व्हावा.

८ लॅटीन लिपी अनेकदृष्टीनें सोयीची आहे, पण निदान सध्यांतरी आपल्या भाषांकरितां या लिपीचा स्वीकार करतां येणें शक्य नाहीं. याकरितां सध्यां आपल्याला दोन लिपींची आवश्यकता आहे:—देवनागरी-बंगाली-गुजराथी — मराठी अशी संमिश्र लिपी; दुसरी अुर्दू--सिंधी लिपी; आणि दक्षिणी भाषाकरितां-देवनागरीचा अुपयोग होत नसेल तर जरूर पडल्यास स्वतंत्र लिपी.

९ हिंदुस्थानी विभागांत, हिंदी व अुर्दू यांच्यामध्यें परांगमुख होण्याची व पृथक्‌पणें विकास पावण्याची जी प्रवृत्ती दिसून येतें, त्यामुळें भेदरून जाण्याचें किंवा त्यांच्या प्रगतीच्या मार्गांत अडथळे आणण्याचेंहि कारण नाहीं. नवीन नवीन व अज्ञेय विचारसरणी भाषेंत येअूं लागली कीं कांही मर्यादेपर्यंत असें होणें स्वाभाविक आहे. हिंदुस्थानी व अुर्दू यापैकीं कोणत्याहि

भाषेच्या विकासामुळें भाषा संपन्न होईल. जागतिक घडामोडी व राष्ट्रीयत्व यांच्या वाढत्या दडपणाखालीं, पुढेंमागें, त्याच्यामध्यें तडजोड होणें अपरिहार्य आहे व सार्वत्रिक शिक्षणप्रसाराबरोबर दोन्हींमध्यें कांहींशी नियमबद्धता व अेकसारखेपणाहि येअील.

१० जनताभिमुख भाषा (हिंदी-अुर्दू वगैरे कोणतीहि भाषा) या तत्वांवर आपण जोर दिला पाहिजे व जनतेच्या दृष्टीनेंच भाषेचा विचार केला पाहिजे. जनतेला सुबोध अशा भाषेंत लेखकांनीं वाङमय लिहून, त्यांच्या विषयींच्या प्रश्नांचा अुहापोह केला पाहिजे. दरबारी आणि कृत्रिम भाषाशैली व त्याचप्रमाणें अलंकारिक वाक्यरचना व वापरतां सोप्या आणि जोरदार भाषेला प्रोत्साहन दिलें पाहिजे. यामुळें अितर होणारे फायदे सोडले तरीं हिंदू व अुर्दू यांचा समन्वय घडून येअील.

११ बेसिक अिंग्लीशच्या धर्तीवर हिंदुस्थानीपासून बेसिक हिंदुस्थानी बनवावी. ही बेसिक हिंदुस्थानी सोपी असून तींत व्याकरण फारच थोडे रहावें; शब्दसंग्रह सुमारें हजार शब्दांचा असावा. नेहमीचें लेखन व संभाषण या दृष्टीनें सोयीची अशी ही परिपूर्ण भाषा असावी, पण ती हिंदुस्थानीच्या कक्षेंत राहून, तिचा हिंदुस्थानीच्या पुढील अभ्यासाकरितां अुपयोग झाला पाहिजे.

१२ बेसिक हिंदुस्थानीव्यतिरिक्त हिंदुस्थानी (हिंदी व अुर्दू दोन्हीहि) व त्याचप्रमाणें शक्य झाल्यास अितर हिंदी भाषांकरितां जे शास्त्रीय, तांत्रिक, राजकीय व व्यापारी शब्द लागतात ते ठरवावेत. जरूर पडेल तर हे शब्द परकीय भाषांतून जसेच्या तसें घ्यावेत. आपल्या स्वतःच्या भाषेंतील शब्दांचीहि अेक जंत्री तयार करण्यांत यावी. अेवढ्याचकरितां तांत्रिक वगैरे शब्दांचा स्पष्ट व सामान्य शब्दसंग्रह आपल्याकडे तयार असावा.

१३ सरकारी शिक्षणाच्या बाबतींत जें धोरण ठेवावयाचे तें म्हणजे जे शिक्षण द्यावयाचें तें विद्यार्थ्यांच्या भाषेंत. प्रत्येक भाषावार प्रदेशांत, प्राथमिक शिक्षणापासून तो विश्वविद्यालयापर्यंतचें सर्व शिक्षण प्रांतिक भाषेंतून देण्यांत येअील अितकेंच काय पण अेकाद्या विवक्षीत भाषावार प्रदेशांत दुसरी प्रांतिक

भाषा बोलणाऱ्यांची संख्या पुरेशी असेल, तर त्यांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेंतून मिळण्याचा हक्क आहे.मात्र अेकाद्या सोयीच्या शिक्षणकेंद्रांतून असे विद्यार्थी सहज मिळूं शकतील याची खात्री पाहिजे. अशा विद्यार्थ्यांची संख्या जर पुष्कळच असेल तर दुय्यम शिक्षणहि त्यांच्या मातृभाषेंतून देणें शक्य होअील. मात्र अशा सर्व विद्यार्थ्यांनीं ज्या भाषावार प्रदेशांत ते रहातात, तेथील भाषा अनैच्छिक विषय म्हणून घेतला पाहिजे.

१४ हिंदुस्थानीव्यतिरिक्त अितर भागांत, दुय्यम शिक्षणक्रमांत, बेसिक हिंदुस्थानी शिकवावी. लिपीचा प्रश्न ज्याच्या त्याच्या पसंतीवर ठेवावा.

१५ विश्वविद्यालयीन शिक्षणाचें माध्यम म्हणून ज्या त्या भाषावार प्रदेशांतील भाषाच राहील. मात्र हिंदुस्थानी (हिंदी किंवा अुर्दू लिपी) व अेकादी परकीय भाषा अभ्यासक्रमांत असाव्यात. अुच्च तांत्रिक शिक्षणक्रमांत, जादा भाषा शिकण्याची— जरी तेथेंहि त्यांचे ज्ञान आवश्यक असले तरी— सक्ती करण्याची जरूरी नाहीं.

१६ परकीय व त्याचप्रमाणें आपल्या प्राचीन अभिजात भाषा शिकविण्याची व्यवस्था, आपल्या दुय्यम शाळांतून करण्यांत यावी. पण कांहीं विवक्षीत कोर्स किंवा विश्वविद्यालयीन अभ्यासक्रम सोडला तर या भाषा शिकण्याची सक्ती असूं नये.

१७ परकीय वाङमयांतील अभिजात व त्याचप्रमाणें अलीकडच्या वाङमयकृतींचें भाषांतर करण्यांत यावे. त्यामुळें आपल्या भाषांचा, अितर देशांतील सांस्कृतिक, वाङमयीन व सामाजिक चळवळीशीं संबंध येअून, त्या अधिक जोमदार होतील.

अलाहाबाद, १९३७.

घटना समिती

राजकीयदृष्ट्यां ज्यांचे आमच्याशीं मूलभूत मतभेद आहेत; ज्यांची स्वातंत्र्याची कल्पना ब्रिटीश पार्लमेंटच्या मर्जीवर उभारलेली आहे; ज्यांना क्रांतिकारक परिवर्तनांची भीति वाटते, आणि हिंदी राजकीय रंगभूमीवर जनतेचें संचलन सुरू झाले आहे, या कल्पनादृश्यांमुळेंच ज्यांच्या छातींत धडकी भरते, अशा लोकांच्या टीकेचा अर्थ मला —जरी ती पटत नसली तरी— समजूं शकतो. पण जे लोक स्वतःला हिंदी स्वातंत्र्याचे कडवे पुरस्कर्ते समजतात, अशांनीं — त्यांची संख्या फार नाहीं— या टीकाकारांच्या मालिकेंत सामील व्हावे, याचें मला आश्चर्य वाटतें.

मला मनःपूर्वक वाटतें कीं शुद्ध लोकशाही स्वातंत्र्य हें आपलें ध्येय असेल तर तें संपादन करण्याचा घटना समितीव्यतिरिक्त दुसरा मार्ग नाहीं. घटना समितीला दुसरे विकल्प ह्मणजे (१) ब्रिटीश पार्लमेंटची सत्ता कमी अधिक प्रमाणांत आहे तशीच राहूं देणें. [२] फॅसिस्ट किंवा लष्करी प्रकारची सर्वाधिकारशाही किंवा सर्वाधिकारशाह्या. [३] हिंदुस्थानच्या कांहीं भागांत सोव्हिएट कॉम्युनिझम व इतरत्र अनागोंदी कारभार व गोंधळ. (४] सर्व देशभर अनागोंदी कारभार व गोंधळ.

खुद मला सर्व हिंदुस्थानांत सोव्हिएट अर्थव्यवस्था अंमलांत यावी असें वाटतें व सध्यांच्या सोव्हिएट राज्यव्यवस्थेंत हिंदुस्थानच्या परिस्थितीला अनुरूप असे विवक्षीत बदल व फेरफार केलें तर ती येथेंहि इष्ट ठरेल. रशियन पद्धत किंवा तऱ्हा जशीच्या तशीच स्वीकारावी, असें मी ह्मणत नाहीं. मात्र त्या पद्धतींत बऱ्याच व्यापक व खऱ्याखुऱ्या लोकशाहीला वाव आहे, असें माझें मत आहे. पण आज किंवा नजीकच्या काळांत हिंदुस्थानांत सोव्हिएट राज्यपद्धती जारी करण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे भयंकर झगडे व गोंधळाला आव्हान देण्यासारखे आहे, यांत मुळींच संशय नाहीं.

या परिस्थितींत, घटना समिती हा एकमेव मार्ग आहे, अशी माझी खात्री झाली आहे. पण एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, घटना समितीचा मार्ग म्हणजे वसाहतीच्या दर्जाकडे नेणारा मार्ग नव्हें. घटना समिती म्हणजे साम्राज्यशाहीच्या आर्थिक व्यवस्थेपासून फारकत करून घेणें. चार विद्वान कायदेपंडीतांच्या बैठकींत या गोष्टीचा जसा निर्णय लागणें शक्य नाहीं, त्याचप्रमाणें घटना तयार करण्याच्या नांवाखालीं परस्परांचें हितसंबंध तोलून पाहणाऱ्या मर्यादित लोकांच्या समितींतहि तिला मूर्त स्वरुप येणार नाहीं. आणि बाह्य सत्तेच्या छायेखालीं तर तिचा विचारच करायला नको. राजकीय व मानसिकदृष्ट्यां अनुकुल अशीं परिस्थिती व त्याचप्रमाणें जनतेची मागणी व संमति इतक्या गोष्टींचा समन्वय झाला तरच वरील गोष्ट परिणामकारकरित्यां घडून येईल. वयांत आलेल्या व्यक्तींच्या सार्वत्रिक मतदानाला मूलभूत महत्व आहे ते याचकरितां.

पण आपण आपल्या देशाचा विचार करूं लागलो तर अशा तऱ्हेची राजकीय व आत्मीय पार्श्वभूमि येथें अस्तित्वांत असल्याचें आढळून येते कां ? अर्थातच नाहीं. अशी पार्श्वभूमि असती तर घटना–समिती केव्हांच अस्तित्वांत

आली असती. उद्यां काय होईल, हें मी अर्थातच सांगू शकत नाहीं. आपण आज क्रांतीकारक वर्तमान काळांत वावरत असून त्यांत निरनिराळ्या प्रवृत्तींची एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया चालू आहे, हें विसरतां कामा नये.

खरंच, आपण ब्रिटीश सरकारकडे घटना समितीची मागणी कां करतो ? स्पष्ट बोलावयाचें म्हणजे ही आपली मागणी म्हणजे याचना नव्हे. आपल्याला काय पाहिजे व पुढें मागें आपण काय करूं इच्छितो, हेंच आज आम्हीं पुढें मांडत आहोंत.घटनासमिती आपण पुरेसें समर्थ झाल्यावरच मिळेल. अगोदर नाहीं व कदाचित तीकरितां आपल्याला लढ्याच्या दिव्यांतून जावें लागेल. पण एकादी गोष्ट आज आपल्याला मिळत नाहीं, म्हणून तीं पाहिजे किंवा ती मिळविणें आपलें ध्येय आहे. असें म्हणण्याचा आपल्याला हक्क नाहीं कां ? दुसरा आपण असा विचार केला पाहिजे कीं आपली वाढती शक्ती व जागतिक घडामोडी यामुळें कल्पनेपेक्षांहि आपला हेतू लवकर साध्य होणें अशक्य नाहीं. अशीं शक्यता गृहीत धरण्यापासून आपला खास तोटा नाहीं. फक्त त्यामुळें अल्प समाधानी वृत्ति व लढ्याचें ध्येय या बाबतींत शरणांगती न येईल एवढी काळजी घेतली म्हणजे झालें.

ब्रिटीश सरकारनें हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा हक्क मान्य करावा, असें आपण कां म्हणतो ? त्यामुळें कांही फरक पडेल कां ? अर्थातच पडेल. त्याचा अर्थ असा नव्हे कीं हा हक्क मान्य झाल्याबरोबर आपले ध्येय साध्य झालें किंवा ब्रिटीश सरकार पुढें वचनभंग करणार नाहीं. ब्रिटिश सरकार हा हक्क नाकारतें, यावरूनच स्वातंत्र्याच्या घोषणेला त्यांच्या दृष्टीनें किती महत्व आहे, हें कळून येते हिंदी स्वातंत्र्याची अशा प्रकारची स्पष्ट घोषणा करून कोणत्याहि बाह्य हस्तक्षेपाशिवाय सार्वत्रिक मतदानानें निवडलेल्या घटना समितीच्यामार्फत

आपली राज्यघटना तयार करण्याचा हिंदी जनतेचा हक्क मान्य केला गेला तर देशांतील सद्य:स्थितींत क्रांतिकारक बदल होऊन जाईल. केवळ तेवढ्यामुळेंच जरी आपण आपल्या ध्येयाप्रत जाऊन पोहोंचणार नसलों, तरी त्यामुळें आपली बाजू कितीतरी बळकट होईल व 'जनतेला' पुढाकार प्राप्त होईल.

घटना समितीचा प्रश्न म्हणजे आपणां सर्वांची कसोटीच होय. आपण सर्वजण कोठें उभे आहोंत, हें त्यामुळें कळतें. ब्रिटन घटना समिती नाकारते याचें कारण ब्रिटनला साम्राज्याचें विसर्जन करण्याची इच्छा नाहीं. हिंदुस्थानांतील प्रागतिक, मुस्लीम लीग किंवा इतर विरोधक या समितीला विरोध करतात, याचें कारण त्यांना खरें स्वातंत्र्यच नको. नवीन अशा राज्यव्यवस्थेचा विचारच त्यांच्या डोक्यांत येत नाहीं व आला तर तीबद्दल तिरस्कार वाटतो. प्रचलीत गोष्टीबद्दल त्यांना कितीहि असमाधान वाटत असो, पण ज्या अनुशासन संस्थेंत जनतेला कर्तुमकर्तुम सत्ता मिळण्याचा संभव, अशा राज्यघटनेपेक्षां चालू परिस्थितींत रहाणेंच त्यांना अधिक पसंत पडते. वयांत आलेल्या सर्वांना मतदानाचा अधिकार देण्याविरुद्ध इतकेंच काय पण पुष्कळ लोकांना राज्यकारभारांत समभागी करण्याविरुद्धसुध्दां त्यांचा यासाठींच आक्षेप होय. या लोकांकडून कांहीं निवडक लोकांच्या समित्या सुचविल्या जातात पण या समित्यांचें प्रामुख्यानें कार्य म्हणजे सरकारनें आंखून दिलेल्या मर्यादेंतच भ्रमण करून, जातीय मागण्या-प्रतिमागण्यांची कधींहि न संपणारी चर्चा करणें.

हिंदी स्वातंत्र्य किंवा जी राज्यघटना आम्हांला उभारावयाची आहे तीबद्दलची आमची कल्पना मात्र इतकी आकुंचित नाहीं.

अलाहाबाद, १९४०.

हिंदुस्थानचें ऐक्य

अमेरिकन लोक लोकशाही परंपरेंत वाढलेलें असल्यामुळें त्यांच्यापैकीं बहुतेकांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याविषयीं सहानुभूति वाटतें. या परंपरेमुळें साम्राज्य आणि साम्राज्यशाही व त्याचप्रमाणें अेका देशाचें दुसऱ्या देशांवरील वर्चस्व आणि पिळवणूक या गोष्टी त्यांना रुचत नाहींत. पण हिंदी प्रश्नाचा प्रत्यक्ष विचार करण्याची पाळी आली कीं, त्यांचा गोंधळ अुडाल्याशिवाय रहात नाहीं. सध्यांच्या हिंदी जीवनक्रमांत दिसणारे भिन्नभिन्न प्रवाह त्यांतून संघटीत व प्रगत असें राष्ट्र कितपत निर्माण होअूं शकेल, याबद्दल त्यांना शंका वाटते. आतापर्यंतच्या येथील प्रवृत्ति, विविध धर्म व संस्कृती यांचा झगडा, भाषेंतील वैचित्र्य, सरंजामशाहीवर अुभारलेलीं अशीं हिंदी संस्थानांतील मध्ययुगीन परिस्थिती, सामाजिक तंटे व हिंदुस्थानांतील सर्वसाधारण मागासलेपणा यांचीच चित्रें त्यांच्या डोळ्यांपुढें अुभी केलीं गेलीं होती. साहजिकच त्यांच्या मनांत संभ्रम अुत्पन्न होतो कीं, या सर्वांचा मेळ घालून स्वतंत्र हिंदुस्थान निर्माण होणार कसा ? तसेंच अशा डळमळींत व विरोधी पायावर लोकशाही अुभारतां येअील कां ? ब्रिटीश सत्ता काढून घेतली तर हिंदुस्थान स्वतःच्या पायांवर व स्वतंत्र राहूं शकेल ?

या शंकाकुशंका अर्थातच स्वाभाविक आहेत, पण त्या ज्या प्रश्नांतून अुद्भवतात, त्यांचा आपण विकाररहीत दृष्टीनें विचार करून त्यांना योग्य

अुत्तरें शोधून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्र व जनता यांच्या दृष्टीनें स्वातंत्र्य परिणामी हितकारक असेल व आहेहि; पण अेकंदरींत विचार करतां असें दिसून येअील कीं, खुद्द स्वातंत्र्य हेंच मुळीं अेका विशिष्ट साध्याचें साधन आहे. हें साध्य म्हणजे राष्ट्रांतील लोकांचा दर्जा वाढविण्यांचा प्रयत्न करणें. पर्यायानें त्यामुळें अखिल मानवजातीचीहि सामुदायिक प्रगति होतेच. सध्यां हिंदुस्थानपुढें असलेला जीवनस्पर्शी व सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे जनतेचें भीषण दारिद्र्य. हें दारिद्र्य व त्यापासून अुद्भवणाऱ्या अनेक अनिष्ट प्रकारांना आमच्या राजकीय स्वातंत्र्यामुळें आळा घालतां येअील कां ?

वस्तुतः ब्रिटीशांची हिंदुस्थानवर गेलीं दीडशें वर्षें भक्कम पक्कड असून या मुदतींत त्यांना काय वाटेल तें करतां आलें असतें. त्यांच्यावर लोकशाही किंवा अितर कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण नव्हतें. ब्रिटीश पार्लमेंट फार दूर व हिंदुस्थानविषयक अनाभिज्ञतेमुळें तें येथील कारभारांत फारसें हस्तक्षेप करूं शकत नव्हतें. हिंदुस्थान हा देश खाद्यधान्यें, खनीज संपत्ती व मनुष्यबळ वगैरे दृष्टीनें सधन होता व आहे; फक्त येथील लोक निष्कांचन आहेत. हिंदुस्थानांतील संपत्तीमुळेंच परकीय साहसी लोकांच्या टोळ्यांमागून टोळ्या अिकडे आकर्षिल्या गेल्या. अितकी साधनसामुग्री व मनुष्यबळ हाताशीं असतांना व जवळजवळ दिडशें वर्षं अनियंत्रित सत्ता असूनहि ब्रिटीशांनीं भरीव असें काय केलें हें विचारण्याचा कोणालाहि हक्क आहे. या कालांत, यूरोपांत कल्पनेबाहेर परिवर्तन झालें, जपाननें थक्क करणाऱ्या गतीनें देशांत बदल घडवून आणला, आणि खुद्द अमेरिका जगांतील सर्वांत धनाढ्य राष्ट्र बनलें. पण हिंदुस्थानांत मात्र अद्यापहि भेसूर दारिद्र्य,सार्वत्रिक निरक्षरता व आरोग्य वैद्यकीय अित्यादि सोयींचा अभाव आहे.थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जीवनांतील सर्व हितावह गोष्टींची येथें अुणीव आहे. अर्थात, ब्रिटीश सत्तेच्या आगमनामुळें कांहीं सुधारणाहि घडून आल्या. विशेषतः कालवाअीत क्षेत्रांत झालेली प्रगति या दृष्टीनें अुल्लेखनीय आहे, पण जें कार्य होअू शकलें असतें त्यांशीं तुलना करतां हें झालेलें कार्य किती क्षुल्लक आहे !

हिंदी लोकांना या परिस्थितीबद्दल दोष देणें चुकीचें ठरेल, कारण त्यांच्या मतांना काडीचाहि वाव ठेविण्यांत आलेला नाहीं. प्रजाजनांचा मागासलेपणा म्हणजे सरकारच्या नालायकीचा पुरावा. हिंदुस्थानांतील ब्रिटीश सत्तेची ही ढळढळीत निष्पत्ति दिसत असतां, तिच्या अपेशांची मालिका दाखवून देण्याकरितां अधिक कारणमिमांसा करण्याची जरुरी नाहीं. पण ही चूक अुघड झाल्यामुळें आतां आपले प्रश्न सुटण्याच्या बेतांत आहेत, असें म्हणणें वस्तुस्थितीला सोडून होअील. आपण अेक गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे व ती म्हणजे ब्रिटीश साम्राज्यशाही सत्तेची रचनाच मुळीं अशी आहे कीं, तीमुळें आमचे प्रश्न न सुटतां ते वाढत जावेत. हे प्रश्न सोडविणें भाग आहे, पण ते सोडविण्याचा मार्ग मात्र ब्रिटिश साम्राज्यशाही कक्षेपलिकडेच आहे.

हिंदुस्थान अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपेक्षां [United States] लहान असला तरी अेकंदरींत विस्तृत असून, हिंदुस्थानची लोकसंख्याहि युनायटेड स्टेट्सपेक्षां कितीतरी अधिक आहे. अेका दृष्टीनें आमचे प्रश्न अेखाद्या खंडाला शोभेसे आहेत. आधुनिक दळणवळण व वहातुकीचीं साधनें अुपलब्ध होअीपर्यंत अेवढा मोठा प्रदेश राजकीयदृष्ट्यां अेका सत्तेखालीं फार काळ ठेविणें कठीण होते. हिंदुस्थानप्रमाणेंच युनायटेड स्टेटस हें राष्ट्रसुद्धां अफाट आहे, पण दळणवळण व वहातुकीच्या साधनांच्या प्रसारामुळे तें चलाढय झाले. सध्यांचें विज्ञानशास्त्र व औद्योगिक वाढ यामुळें युनायटेड स्टेट्सच्या जीवनांत जी क्रांती झालेली दिसत आहे, ती होण्यापूर्वींचा असा हजारों वर्षांचा अितिहास अमेरिकेच्या मागे असतां तर यूरोपप्रमाणेंच तेथें कदाचित छोटीं छोटीं राज्यें अस्तित्वांत आलीं असतीं. हिंदुस्थानच्या दीर्घकालीन अितिहासाचें अवलोकन केलें तर राजकीयदृष्ट्यां तो नेहमींच विभागलेला होता असें दिसून येअील. तत्कालीन परिस्थितींत ही गोष्ट अपरिहार्यहि असेल,तरीहि हिंदुस्थानचें राजकीय अैक्य घडवून आणण्याची कल्पना नेहमींच जागृत असून अनेक राजकर्त्यांनीं तिला मूर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न केला आहे. अशोकनें असें अैक्य दोन हजार वर्षांपूर्वी घडवून आणले होतें. आज ब्रिटीशांचें हिंदुस्थानांत जेवढें

साम्राज्य आहे, त्यापेक्षां अशोकाचें साम्राज्य कितीतरी मोठें होतें. अफगाणिस्थानसुद्धां थेट मध्य आशियापर्यंत तें पसरलें होतें. फक्त दक्षिण हिंदुस्थानांतील अेक छोटासा पट्टा त्याच्या साम्राज्याबाहेर होता. विजयामागून विजय संपादन करीत चाललेल्या अशोकाला हा भाग जिंकणें अशक्य नव्हतें. पण युद्धांतील निर्दय कत्तली व रक्तपात यांचा वीट आल्यामुळें, त्यानें तो बेत सोडून दिला. अशोकनंतर आणखी कांही राजकर्त्यांनीं हिंदुस्थानचें राजकीय अैक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्यांना कांहीं प्रमाणांत यशहि आलें. पण साधनसामुग्रीच्या अभावीं सर्व देशांवरच मुळीं अभंग राजकीय नियंत्रण प्रस्थापित करण्याची कल्पना मूर्त स्वरूपांत येअुं शकली नाहीं. मात्र हिंदुस्थानांत ब्रिटीश सत्तेचें आगमन व त्याबरोबरच वहातुक, दळणवळण व आधुनिक अुद्योगधंदे यांची वाढ अेकदमच झाल्यामुळें, ब्रिटीश सत्तेला टिकावूं असें राजकीय अैक्य स्थापन करतां आलें.

राष्ट्रीयत्वाचें आगमन होण्यापूर्वी अितर देशाप्रमाणेंच हिंदुस्थानांतील राजकीय अैक्याची कल्पना केवळ राजेलोक किंवा विजेते यांच्या अिच्छेवर अवलंबून असे. या कल्पनेशीं जनतेचा फारसा संबंध नव्हता. अनंत कालपर्यंत हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणांत ग्रामीण स्वायत्तता होती व लोक वरच्या राज्ययंत्राकडे लक्ष देण्यापेक्षां आपलें ग्रामीण स्वातंत्र्य व हक्कांविषयींच अधिक जागरुक असत. राजसत्ता सारखीं बदलत असे, पण जे नवीन राज्यकर्ते येत, तें स्थानिक ग्रामीण रचनेंत ढवळाढवळ न करतां ती तशींच चालूं देत. यामुळें यूरोपप्रमाणें हिंदुस्थानांत राजे लोक व जनता यांच्यामध्यें लढे अुद्भवलें नाहींत. यूरोपांत या लढ्यांचें निमित्त पुढें करून राजकर्त्यांनीं आपली अेकतंत्री सत्ता कशी बळकट केलीं हें प्रसिद्धच आहे.

वरीलप्रमाणें, पूर्वी अखिल भारतीय अैक्य शक्य नव्हतें. अशा स्थितींत हिंदी जीवनक्रमांत मूलभूत अेकीकरण सांधणाऱ्या किंवा दूरावणाऱ्या अशा कोणत्या प्रवृत्ति होत्या हें पहाणें अधिक महत्वाचें आहे. यामुळे प्रचलित परिस्थिती समजावून घेअून भविष्यकाळाला वळण देणें आपल्याला शक्य होअील.

पाश्चात्य देशांत आजच्या अुद्योगधंद्यांमुळें अेक ठरावीक परिमाण निर्माण झालें आहे. या परिमाणांत वाढलेले लोक—त्यांनीं हिंदुस्थानला धांवत्या भेटी देअून वरवर निरीक्षण करावयाचें; सहाजिकच येथील वैचित्र्य व भिन्नभिन्नता या गोष्टीच त्यांच्या डोळ्यांत भरण्याचा संभव. हिंदुस्थानची अभंगता त्यांच्या नजरेंत येत नाहीं; पण हिंदुस्थानच्या बाबतींत महत्वाची व मूलभूत अशी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे अनंत काळापासून चालत आलेलें मूलग्राही अैक्य. हिंदुस्थानचा हजारों वर्षांचा अितिहास आहे व आधुनिक राष्ट्रांपैकीं फक्त चीन अपवादादाखल सोडलें तर अितर कोणत्याहि देशाच्या मागें संस्कृतीची अशी अखंड व पुरातन पार्श्वभूमी नाहीं. पांचसहा हजार वर्षांपूर्वींची मोहेंजोदारो संस्कृती घ्या. ही संस्कृति सर्व अुत्तर हिंदुस्थानांत तळपलीच, पण तिचा थोडा फार स्पर्श दक्षिण हिंदुस्थानलाहि झाला. त्या वेळींहि ही संस्कृति अतिशय विकास पावली असून, तिच्यामागें शेंकडो वर्षांची प्रगति होती. अितिहासाच्या प्रारंभकाळापासून भारताच्या विस्तीर्ण खोऱ्याकडे मध्य आशियांतील असंख्य लोकांची--विजेते वसाहतवाले, यात्रेकरू व विद्यार्थी यांची--रीघ लागली होती. या लोकांची हिंदी जीवन, संस्कृती व कलांवर छाप पडली, पण हिंदुस्थानने त्यांना आत्मसात करून टाकलें. या लोकांच्या संघर्षामुळें हिंदुस्थानांत परिवर्तन झालें, पण तरीहि या देशानें मूलतः आपलें ' स्वत्व ' आहे तसेंच राखिलें. महासागराप्रमाणें, हिंदुस्थाननें हजारो सरितांच्या जलाहेराचा स्वीकार केला, या सागराच्या पृष्ठभागावर पुष्कळ वेळां खळबळीच्या लाटा अुद्भवल्या व झंजावात निर्माण झाले, पण अेकंदरींत हिंदुस्थानची स्थिती सागराप्रमाणेंच राहिली. दुसऱ्यांना आत्मसात करून घेण्याची वृत्ति हिंदुस्थाननें यशस्वीरीत्यां कशीं राखली, हें पहाणें अुद्बोधक आहे. बाहेरून आलेल्या माणसानेंहि स्वीकृत करण्याअितकी मूलभूत अैक्याची कल्पना खोल रुजली असल्यामुळें व त्याच-प्रमाणें हिंदी संस्कृति लवचीक व बदलत्या परिस्थितीशी जमवून घेणारी असल्या-मुळेंच ही गोष्ट शक्य झाली.

व्हिन्सेन्ट स्मिथ हे आपल्या " ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ अिंडिया " या

पुस्तकांत म्हणतातः— " भौगोलिक अखंडता किंवा राजकीय अेकतंत्री अंमल यामुळें निर्माण झालेल्या अेक्यापेक्षां, कितीतरी पटीनें अधिक असें मूलभूत अेक्य हिंदुस्थानांत सुप्त रीतीनें वास करीत आहे. वंश, वर्ण, भाषा, पोषाख, चालीरिती व धर्मपंथ वगैरे आढळून येणारे भिन्नभिन्न प्रवाह या अेक्यापुढें लोपले जातात." सर फ्रेड्रीक व्हाअिट यांनीं " दि फ्यूचर ऑफ अिस्ट अँन्ड वेस्ट " या आपल्या ग्रंथांतहि या अेक्यावर भर दिला आहे. हिंदुस्थानांतील प्रचंड तफावतीचा प्रथम अुल्लेख करूनहि ते म्हणतात," हिंदुस्थानांतील मोठ्यांत मोठा विरोधाभास म्हणजे, ही तफावत महान अशा अेक्याखालीं झांकून गेलीं आहे. ही अभंगता ताबडतोब दिसून येत नाहीं,याचें कारण अैतिहासिकदृष्ट्यां देशाचें राजकीय अैक्य घडवून आणण्याच्या बाबतींत ही अभंगता अयशस्वी ठरली आहे, पण त्याबरोबरच ही अभंगता म्हणजे अितकें मोठें सत्य व प्रभावी आहे कीं, हिंदुस्थानांतील मुसलमानांनासुद्धां, तिचा आपल्यावर खोल परिणाम झाला आहे, हें कबूल करावें लागलें आहे. "

हिंदुस्थानची ही पार्श्वभूमी व अभंगता मूलतः सांस्कृतिक असून धर्माचा रुढ असा आकुंचित अर्थ त्यांच्यामागें नव्हता. प्रारंभी ही हिंदी संस्कृति संकुचित किंवा असहिष्णु नसून तिच्यांत ग्राहकता व मीलनात्मक प्रवृत्ति होतीं आणि अनेक वर्षांच्या महत्स्थानांमुळें या संस्कृतीचीं मूळें खोलवर रुजून तिला स्थैर्य आलें होतें. अनेक वादळें झाली तरी ती कोलमडली नाहीं. अुदार दृष्टीकोनाचा या संस्कृतींत परिपोष दिसून येतो. आपल्या सामर्थ्याविषयीं खात्री असल्यामुळेंच कीं काय या संस्कृतीला सहिष्णु व विशाल होणें परवडलें, याअुलट केवळ या सहिष्णुतेमुळें तिच्यांत वाढतें सामर्थ्य व ग्राहकता निर्माण झाली. जवळजवळ अिसवी सनाचा प्रारंभ होअीपर्यंत या संस्कृतींत अेक प्रकारचा सूज्ञपणा किंवा थोडाफार शास्त्रीय दृष्टीकोन असून तीवर कट्टरपणाची छाया पडली नव्हती. अर्थात ही संस्कृति व सूज्ञपणा बव्हंशी वरच्या वर्गांपुरता मर्यादित असला तरी जनतेवरहि त्यांचे थोडेफार तुषार आलें. हळुंहळूं या सांस्कृतिक वातावरणांत अंध समजुती, कट्टरपणा व कित्येक अनिष्ट रुढींचा शिरकाव झाला.

बौद्ध धर्म म्हणजे त्यांविरुद्ध बंडखोरी.पण त्यावेळींसुद्धां जीवनाच्या जुन्या रीतीच प्रभावी होत्या. अितिहासांतील अेक आश्चर्य म्हणजे या बौद्धधर्मालाहि हिंदुस्थाननें लौकिक झगड्याशिवाय आत्मसात करून टाकलें. बौद्ध धर्माचा सर्व हिंदुस्थानभर प्रसार होअून शिवाय पश्चिम आशियापासून तो मध्य व पूर्व आशियापर्यंतहि या धर्माची प्रगति झाली होती. पण ज्या भूमींत त्याचा जन्म तेथून मात्र तो क्रमशः अस्तंगत झाला. अिसवी सनापूर्वी आठव्या शतकांत होअून गेलेल्या शंकराचार्यांनें बव्हंशी हें कार्य केलें. शंकराचार्य ही असामान्य बुद्धीमत्तेची व्यक्ती होती. सर्व हिंदुस्थानांत संचार करून अल्पकाळांत त्याने (वयाच्या ३२ व्या वर्षी तो मरण पावला.) चर्चा, वादविवाद यांच्या द्वारें प्रचंड जनसमुदायाला आपलें म्हणणें पटविलें व या देशाच्या मनोवृत्तींत बदल घडवून आणला.शंकराचार्यांनें जनतेच्या सूक्ष्म व वैचारिक भावनांना चालना दिली; हिंसात्मक प्रवृत्तीला नव्हे.

धार्मिक वादविवाद करणें व धर्मसभा भरविणें या गोष्टी त्याकाळीं सर्व हिंदुस्थानभर सर्रास रूढ असून काश्मिरपासून रामेश्वरपर्यंत भरलेल्या अशा अनेक महत्वाच्या सभांची हकीगत नमूद आहे. देशांतील राजकीय विभाग कसें कां असे-नात, वैचारीक मतप्रणालीचा फैलाव झपाट्यानें होअून त्यावर कडाक्याची चर्चाहि होअी. सांस्कृतिकदृष्ट्यां हिंदुस्थान अभंग होता व प्रत्येक ठिकाणीं जनतेची मान-सिक पार्श्वभूमि सामान्यतः अेकाच प्रकारची होती. अितकेंच काय पण निरनिराळ्या विभागांतील जनतेंतसुद्धां विचार व दृष्टीकोन यादृष्टयां फरक नव्हता. शंकराचा-र्यांनें यात्रेचीं जीं प्रमुख तीर्थस्थानें ठरविलीं होतीं, तीहि हिंदुस्थानच्या चार टोकांना वसलेली होतीं. अुत्तरेकडे हिमालयांतील बद्रीनाथ, दक्षिणेकडे केप कामोरीनजवळील रामेश्वर, पश्चिमेकडे अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील द्वारका व पूर्वेकडील बंगालच्या अुपसागरावरील पुरी. या काळांतसुद्धां वेगवेगळ्या विभा-गांतील लोकांचा अेकमेकांशीं सतत संघर्ष चाले. हिंदुस्थान सर्वांचीच पुण्यभूमि होती.

हिंदुस्थानच्या सर्व अितिहासांत, धार्मिक बाबतींत जी सहिष्णुता दिसून

येतें, तीबरोबर यूरोपांतील असहिष्णुतेची तुलना करणें अुद्‌बोधक आहे. यूरोपला फारशी जाणीवहि नव्हती, त्या काळांत म्हणजे अिसवी सनाच्या पहिल्या शतकांत ख्रिश्चन धर्माचें हिंदुस्थानांत आगमन झालें. कसलाहि विरोध न होतां या धर्माचें येथें स्वागत केलें जाअून, त्याला येथें आश्रय मिळाला. आरंभाचें नेस्टोरीयन, सिरीयन ख्रिचन वगैरे पंथ कीं, जे यूरोपांत नेस्तनाबूद करण्यांत आलें, ते आजहि हिंदुस्थानांत आढळून येतात. ज्यू लोक हिंदुस्थानांत आठराशें वर्षांपूर्वी आले व त्यांचेहि स्वागत झालें. पूर्वीप्रमाणेंच आजहि त्यांचें येथें सामुदायिक जीवन चालूं असून, ते रहात असलेल्या प्राचीन शहरांतील कांहीं भागांत पुरातन येरुसलेमचें प्रतिबिंब दिसतें असें म्हणतात. अिराणमधून घालवून दिलेल्या पारशीं लोकांनीहि हिंदुस्थानचा आश्रय घेतला व तेव्हांपासून हिंदुस्थानच त्यांची मातृभूमि झाली आहे. अिस्लामच्या अुदयानंतर मुसलमानहि येथें आलें. त्यांनाहि ताबडतोब प्रवेश व आश्रय मिळून आपल्या धर्माचा प्रसार अनिर्बंध करतां येअूं लागला. सरहद्दीवरील प्रदेश सोडला तर त्याकाळीं हिंदुस्थानांत हिंदू--मुसलमानांचे झगडे अुद्‌भवत नव्हते. ज्यावेळीं विजेते आक्रमक म्हणून मुसलमानांच्या स्वाऱ्या होअूं लागल्या, तेव्हांच हिंदु-मुसल्मानांत तेढ निर्माण झाली.

मुसलमानांच्या आगमनामुळें हिंदुस्थानला अर्थातच धक्के बसले. कांहीं काळ जुन्यानव्यामध्यें झगडा अुद्‌भवला, पण लवकरच हिंदुस्थानांतील प्राचीन परंपरेचा प्रभाव दिसूं लागला व जुन्यानव्याचे अेकीकरण घडवून आणण्याचे प्रयत्न चालूं झाले. धर्म म्हणजे अत्यंत नाजूक विषय. पण या धार्मिक क्षेत्रांतहि मीलन घडवून आणण्याचे प्रयत्न नानक, कबीर वगैरेंनीं केलें. खुद्द मुसलमान राज्यकर्त्यांनींहि सामान्यतः हिंदी जीवन व संस्कृतीची पार्श्वभूमि मान्य केली. फक्त तींत पर्शियन सांस्कृतिक कल्पनांना अनुसरून थोडा फरक केला गेला अेवढेंच. तसेंच प्राचीन काळांत नवीन कल्पनांशी मिळवून घेण्यांतहि कसलीच आडकाठी अुद्‌भवली नाहीं. शिल्प-कला व चित्रकला यांत नवीन तऱ्हा आल्या. या तऱ्हा म्हणजे, दोहोंचें खरेखुरे समीकरण असलें तरी, त्या मूलतः हिंदीच होत. तीच गोष्ट संगीताची.

पोशाखाच्या बाबतींतहि अेक विवक्षित प्रकार आला व अेक समान भाषा अुदयास आली.

अशा रीतीनें हिंदुस्थानचा गेल्या हजारों वर्षांचा अितिहास पाहिला तर, त्या त्या देशाची मूलभूत अभंगता, जोमदारपणा व सांस्कृतिकदृष्टयां मीलनात्मक वृत्ति दिसून येते. याच जोमानें, हिंदी कला, विचार व धर्मांचा संदेश अतिपूर्वेपर्यंत नेअून भिडविला व त्यांतूनच मलाया, जावा, सुमात्रा व फिलिपाअीन्समधील वसाहती करण्याच्या मोठमोठ्या मोहिमा अुद्‌भवल्या. या वसाहतींतील शेकडों वर्षांपूर्वींची प्राचीन स्मारकें याची साक्ष देतील.

या सांस्कृतीक अभंगतेच्या मागें व तिला बळकटी आणणारी आणखी अेक प्रवृत्ति होती व ती म्हणजे अंतर्मन व अैहिक बाहय वातावरण यांच्यांत अेकरुपता आणण्याचा अविरत प्रयत्न चालू होता.कांहीं मर्यादेपर्यंत मध्ययुगीन यूरोपांतहि हीच स्थिती होती हें खरें असलें तरी त्या बाबतींत हिंदी प्रवृत्ति मात्र यूरोपपेक्षां कांहींतरी अधिक दर्शवितें. त्या काळीं फायद्याकडे फारशी दृष्टी नसे व अितरत्र प्रमाणें संपत्तीलाहि अितकें महत्व दिलें जात नसे. यूरोपच्या अगदीं अुलट म्हणजे मानाच्या जागा विद्वान लोक, आणि राज्याची किंवा समाजाची सेवा करणाऱ्या व्यक्तीकरितां राखून ठेविल्या जात. तरवार गाजविणारे सैनिक किंवा धनिक यांना दुय्यम-तिय्यम स्थान दिलें जाअी. अेका बाजूला पाश्चिमात्य देशांत बाहय प्रगति झपाट्यानें चालू असता, हिंदुस्थान राजकीयदृष्टयां दुर्बल व मागासलेला राहिला याचें कारण, अैहिक परिस्थितिवर तितका जोर दिला गेला नाहीं, हेंच असावें.

अर्थात हिंदी सांस्कृतिक दृढभावाचा गतेतिहास डोळ्यापुढें आणणें आज आपल्याला अुपकारक ठरेलच असें नाहीं. आज आपल्याला प्रामुख्यानें प्रचलीत प्रश्न सोडवावयाचे आहेत. अशा स्थितींत पूर्वींच्या स्मृति आठवून फारसा अुपयोग होणार नाहीं, हें पूर्णपणें खरें आहे. पण त्याबरोबरच दुसरीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. हिंदुस्थानसारख्या पुरातन राष्ट्राचीं बीजें गत काळांत खोलवर रुजली आहेत हें नाकारून चालणार नाहीं. आज आप-

त्यांत जें कांहीं बरेंवाअीट आढळून येतें, त्याचा अुगम या प्राचीन बीजांत आहे. त्यामुळें जसें आपल्याला सामर्थ्य व स्फूर्ति मिळाली आहे, त्याच-प्रमाणें त्यांचा निष्कारण भारहि आपल्यावर पडला आहे व अनेक घातक रुढी-रिवाजांचें लोढणें त्यांनीं आमच्या गळ्यांत अडकविलें आहे. हिंदुस्थानचा ऱ्हास होअून, त्याच्यातील चैतन्यशक्ति कमी होत गेली हें निःसंशय. हिंदु-स्थानची मीलनात्मक व आत्मसात करण्याची शक्ती खचली व येथील विचार व समाजरचनेंतील लवचीकपणा जावून, त्यांत ताठरपणा आला. तडफ जाअून दिवसेंदिवस अगतिकता येत गेली. सूज्ञपणा व शास्त्रशुद्ध विचारसरणी कांहीं लोकांपुरतीच मर्यादित राहिली, आणि बाकीचे सर्व लोक असमंजसपणा व अंध रुढींच्या आहारी गेले. चातुर्वर्ण्यपध्दति प्रथम गुणकर्मांवर असून ती कडक नव्हती, पण हळुंहळूं तींत घातकी कट्टरपणा येत गेला व ही पध्दति म्हणजे प्रति-गामी वृत्तीचा बालेकिल्ला व जनतेची पिळवणूक करण्याचें साधन बनली. याचा परिणाम म्हणजे गेलीं कित्येक शतकें हिंदुस्थानची प्रगति खुंटून राष्ट्रांतील जोम नष्ट झाला. अशा स्थितींत अधिक चांगल्या साधनसामुग्रीनें युक्त, अधिक जोमदार व यांत्रिकदृष्टयां प्रगत अशा पाश्चिमात्य देशांच्या हिंदुस्थान सहजासहजीं आहारीं जाणें अपरिहार्यच होतें.

याचें पर्यवसान म्हणजे सनातनी वृत्ती बळावत गेली व स्वसंरक्षणाकरितां धडपडणारा हिंदुस्थान अधिकच संकुचित वृत्तीचा होत गेला. ब्रिटीश राजवटीनें अनेक बदलत्या चालिरीती मुद्दाम स्थगित व कायदेवजा स्वरुपाच्या करून, ही अनिष्ट प्रवृत्ति आणखी वाढविली. हिंदुस्थान मागें रहाण्याचें आणखी अेक प्रमुख कारण म्हणजे ब्रिटीश सत्तेनें अुभारलेली आर्थिक रचना. सरंजामी अशी हिंदी संस्थानी पद्धत, येथील नकली राजे महाराजे व नबाब, जमीनदारीं पद्धत म्हणजे प्रामुख्यानें ब्रिटीशांचीच निर्मिती होय. दुर्दैवानें आजहि ही पद्धत आमच्या बोकांडी बसली आहे. पण हिंदुस्थानची रचना अशा रीतीनें सरंजामी राखण्याची ब्रिटीशांची कितीहि अिच्छा असली तरी, त्यामुळें नवीन कल्पना येण्यास व नव्या परिस्थितीचा अुदय होण्यास प्रतिबंध होणें अशक्य आहे. औद्योगि-

करणाच्या आगमनामुळें, जगांत जी लाट उसळली तिच्या सामर्थ्यावर आज पौर्वात्य देशांत ब्रिटीशांची भरभराट दिसत आहे. आणि हिंदुस्थानवरहि ही लाट अपरिहार्यरित्यां येऊन आदळली आहे. स्वार्थाकरितां व आपल्या पकडीला स्थैर्य आणण्याकरितां कां होइना त्यांना रेल्वे वगैरे आधुनिक राज्यव्यवस्थेची साधनें अस्तित्वांत आणावीं लागली, ब्रिटीशांनीं हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति थांबविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हिंदुस्थान केवळ कच्चा माल निर्माण करणारा व आपल्या पक्क्या मालाची बाजारपेठ म्हणून राहावा, ही त्यांची इच्छा, पण सरकारनें कितीहि अडथळा केला तरी औद्योगिक क्रांति हळुहळू कां होइना, हिंदुस्थानांत येणें अपरिहार्य होतें.

ब्रिटीशामुळें हिंदुस्थानांत राजकीय ऐक्य प्रस्थापित झालें. दळणवळण व वहातुकीचीं साधनें यामुळें हें ऐक्य प्रस्थापित होऊं शकलें. सर्वसामान्य गुलामगिरीचें तें द्योतक असलें तरी त्यांतून एकराष्ट्रीयत्वाची भावना उदयास आली आहे. हिंदुस्थान संघटीत व संयुक्त असला पाहिजे या कल्पनेनें जनतेच्या मनाची पक्कड घेतली. ही कल्पना वरून लादलेली अशी दिखाऊं नव्हती, पण जें ऐक्य गेलीं हजारों वर्षें हिंदी जीवनक्रमांत वावरत होतें, त्याची ती स्वाभाविक परिणती होती. त्यांत फरक पडला तो पुढें राजकीय प्रश्नांवर भर देण्यांत येऊं लागल्यामुळें. या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं सरकारनें धार्मिक भेदांवर भर देण्याचा प्रयत्न केलाच, पण त्याशिवाय ज्यामुळें अशा भेदांना प्रोत्साहन मिळून तेढ उद्भवेल, असें धोरण स्वीकारलें. ब्रिटीशांच्या या धोरणाला कांहीं प्रमाणांत यशहि आलें, पण सर्व पौर्वात्य राष्ट्रांप्रमाणेंच हिंदुस्थानांतहि आज राष्ट्रीयत्वाचा प्रभाव दिसत असून परिणामी त्याचाच जय होणार हें निश्चित. राष्ट्रीय प्रश्नांत भर म्हणून कीं काय आर्थिक प्रश्न पुढें येत आहेत. पण राजकारणांपेक्षांहि आर्थिक कारणांची धर्मकारणांशीं अधिक फारकत. राजकीय क्षेत्रांत धार्मिक गटबाजी करण्याचा मध्ययुगीन दृष्टीकोन अर्थव्यवस्थेला संमत नाहीं.

हिंदी राष्ट्रीय सभा म्हणजे येथील जोरदार राष्ट्रीय चळवळीच्या प्रगतीची प्रतिक होय. तीमुळें हिंदुस्थानचें राजकीय ऐक्यहि व्यक्त झालें आहे. असें दिसून येतें कीं, गेल्या दोन तपांच्या काळांत या देशांत आसेतुहिमाचल अशा शांततामय बंडाच्या स्वरुपांत ज्या प्रचंड चळवळी झाल्या त्यामुळें साम्राज्य सत्तेचा पायाच डळमळला आहे. लक्षावधी लोक आपखुषीनें जिच्याशी बद्ध झाले अशा या महान संस्थेनें हिंदी जनतेच्या मनांत राष्ट्रीय ऐक्याची भावना बिंबविण्याच्या बाबतींत महत्वाची कामगिरी केली आहे. जनतेनें राष्ट्रीय ध्येया-करितां जें संघटीत कार्य व शीस्तशीर त्याग केला त्यावरून हेंच दिसून येते कीं, हिंदी ऐक्य केवळ शक्यच नसून, तें आजहि मूर्त स्वरुपांत वास करीत आहे. राजकीय मतें किंवा धार्मिक पंथ कोणतेहि असोत, राष्ट्रीय ऐक्याव्यतिरिक्त इतर कोणताहि विचार हिंदी माणसाच्या मनांत येत नाहीं.

अर्थात हिंदुस्थानांत भेदाभेद आणि त्याचप्रमाणें विभक्त प्रवृत्ति असल्या तरी त्यांचासुद्धां राष्ट्रीय स्वातंत्र्य किंवा ऐक्याला विरोध नाहीं. त्यांना केवळ विशिष्ट गटांकरितां विशेष सवलती पाहिजे असतात व तेवढ्याचकरितां कधींकधीं त्यांच्याकडून राष्ट्रीय चळवळींत व्यत्यय येतो. तसेंच धार्मिक मतभेदां-मुळें कधींकधीं लक्ष वेधलें जात असलें तरी एकंदरींत राजकारणांतील अशा मतभेदांचे प्रस्थ दिवसेंदिवस कमी होऊं लागले आहे हें नक्की. आज हिंदु-स्थानपुढें सांस्कृतिक अगर धार्मिक प्रश्न नाहींत. आज ज्या धार्मिक व जातीय प्रश्नांचें बुजगावणें पुढें केलें जातें, त्यांचे स्वरूप "केवळ वरच्या वर्गांतील लोकांचें नोकऱ्यांच्या तुकड्याकरितां किंवा कायदेमंडळांत प्रतिनिधित्व मिळवि-ण्याकरितां भांडण" याहून अधिक नाही. या प्रश्नांचा निकाल खात्रीनें सामो-पचारानें करितां येईल.

हिंदुस्थानांत भाषाविषयक असे असंख्य विभाग आहेत असें विधान केलें जातें. सेन्ससच्या अहवालाप्रमाणें हिंदुस्थानांत २२२ भाषा किंवा बोली आहेत. मला वाटतें, युनायटेड स्टेटस् सेन्ससच्या अहवालांतहि कितीतरी

भाषा असल्याचें नमूद आहे, तसेंच जर्मनींतहि साठांवर भाषा प्रचारांत आहेत. पण यापैकीं बहुतेक भाषा स्थानिक बोलीच्या स्वरुपाच्या असून, त्या फारच थोडे लोक बोलतात. हिंदुस्थानांत सार्वत्रिक शिक्षण नसल्यामुळें बोलींची संख्या वाढली आहे. वस्तुतः भाषेच्या दृष्टीनें विचार केला तर हिंदुस्थान खात्रीनें अखंड आहे. येथील व्यापक प्रदेशांत मुख्य अशा फक्त बारा भाषा असून त्या एकमेकींशीं निगडीत आहेत. या भाषांचे दोन वर्ग आहेत. एक वर्ग ह्मणजे उत्तर, मध्य व पश्चिम हिंदुस्थानांत बोलल्या जाणाऱ्या हिंदी-आर्य भाषांचा व दुसरा पूर्व व दक्षिणी हिंदुस्थानांतील द्राविडी भाषांचा. हिंदी-आर्य भाषांचा उगम संस्कृतमध्यें असून, त्यापैकीं कोणतीहि एक भाषा येणाऱ्याला दुसरी भाषा शिकणें सहजशक्य होतें. द्राविडी भाषा वेगळया आहेत, त्यांतसुद्धां पन्नास टक्के किंवा त्याहूनहि अधिक संस्कृत शब्दांचा भरणा आहे. हिंदुस्थानांतील मुख्य भाषा ह्मणजे हिंदुस्थानी (हिंदी किंवा उर्दू). जवळजवळ बारा कोट लोक ही भाषा बोलतात, आणि इतर दोनवर कोटी लोकांना ती थोडीबहुत समजते. पुढेंमागें हिंदी भाषाच अखिल हिंदुस्थानची भाषा होईल. मात्र तीमुळें सध्यांच्या महान प्रांतिक भाषांचे उच्चाटन होणार नसून, हिंदी भाषा केवळ सक्तीची अशी दुय्यम भाषा ह्मणून राहील. सरकारनें सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न हातांत घेतला तर ही गोष्ट घडून येणें अवघड नाहीं. आजहि सिनेमा, रेडिओ वगैरेंतहि हिंदुस्थानीचें क्षेत्र झपाट्यानें वाढत आहे. प्रस्तुत लेखकाला सर्व हिंदुस्थानभर मोठमोठ्या सभांतून भाषणें करावी लागली आहेत व दक्षिण हिंदुस्थान व्यतिरिक्त इतरत्र त्यानें हिंदुस्थानीमधूनच भाषणें केलीं व ती बव्हंशी लोकांना समजलीहि. हिंदुस्थानपुढें अनेकविध अवघड प्रश्न आहेत, पण भाषेचा प्रश्न

अशापैकीं एक खासच नाहीं. हा प्रश्न आजच यशस्वीरीत्यां सुटण्याच्या मार्गावर आहे.

यावरून दिसून येईल कीं, हिंदुस्थानच्या ऐक्याला पूरक अशा प्रवृत्ति जोरदार व खूपच आहेत. अशा स्थितींत या ऐक्याचा भंग करणाऱ्या प्रवृत्तींची कल्पनासुद्धां मनांत येत नाहीं. कांहीं प्रमुख हिंदी संस्थानिकांत ही प्रवृत्ति असेलहि, पण हे संस्थानिक आपल्या अंतस्थ सामर्थ्यावर जगत नसून, त्यांना ब्रिटीश सत्तेचा आधार आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हा आधार नाहींसा झाला कीं, त्यांना आपल्या जनतेच्या इच्छेला मान तुकवावी लागेल. आज संस्थानी प्रजेंतहि राष्ट्रीयत्वाची भावना मोठ्या प्रमाणांत पसरलेली आहे.

वरील विवेचनावरून कोणी असें समजूं नाहीं कीं, आपल्यापुढील प्रश्न सहज सुटण्यासारखे आहेत. आज जगाला भेडसविणाऱ्या प्रत्येक प्रश्नाइतकेच हे प्रश्न अवघड आहेत व कदाचित त्यांची उकल होणें आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय घडामोडीवर अवलंबून राहील. पण हिंदुस्थानपुढें जे खरें प्रश्न उभे आहेत, ते बाकीच्या जगाप्रमाणेंच आर्थिक आहेत. हें प्रश्न इतकें गुंतागुंतीचें आहेत कीं, प्रत्येक प्रश्नाचा पृथकपणें विचार करणें कठीण आहे. हिंदुस्थानचा एक मूलभूत प्रश्न म्हणजे शेतकीचा आणि शेतकी व शेती पद्धतींत क्रांतिकारक बदल झाल्याशिवाय हा प्रश्न कायमचा सुटेल असें वाटत नाहीं. सरंजामी अवशेष व जमीनदारी पध्दतीची प्रगतीच्या मार्गांत आडकाठी येते व त्यांचें उच्चाटन झालें पाहिजे. माणशीं पाव एकरसुद्धां वांटणीला यणार नाहींत इतकें छोटे असें शेतजमिनींचें तुकडे—आर्थिकदृष्टयां अशा जमिनींत शेती करणें निष्फळ व निष्कारण खर्चाचें काम आहेच, पण त्यांत शेतकीच्या अद्यावत शास्त्रीय साधनांचाहि उपयोग करतां येत नाहीं. त्याऐवजीं

मोठ्या प्रमाणांवर सरकारी आणि सामुदायिक किंवा सहकारी शेती अस्तित्वांत आणली पाहिजे. आणि ही गोष्ट शेतीच्या क्षेत्रांतील हितसंबधी वर्गांचें उच्चाटन केल्याशिवाय शक्य नाहीं. इतकें होऊनहि शहरें व खेड्यांतील बेसुमार बेकारी कमी होईलच असें नाहीं. त्याकरितां व इतर कारणाकरितांहि देशाच्या औद्योगिकरणाला चालना दिली गेली पाहिजे आणि औद्योगिकरणाबरोबर शिक्षण, आरोग्य वगैरे उपयुक्त गोष्टींची प्रगति होणें अपरिहार्य ठरतें. अशा-रीतीनें या प्रश्नाचीं अनेकविध अंगें असून, त्यांचा संबंध शेती, उद्योगधंदे व जीवनाच्या सर्व प्रश्नांशी येतो. ज्या योजनेंत विशिष्ट वर्गांचा अडथळा येणार नाहीं अशा राष्ट्रीय नियोजनेमुळेंच हे प्रश्न सुटूं शकतील, हे स्पष्ट आहे. एवढ्याकरितां आमच्यापैकीं पुष्कळ हिंदी लोकांना समाजसत्तावादी रचना आवश्यक वाटतें. समाजसत्तावादाशिवाय नियोजन करण्याचा किंवा तें मूर्त स्वरुपांत आणण्याचा दुसरा मार्ग दिसत नाहीं.

पण नेमकें याच वेळीं हितसंबंधी वर्ग पुढें येतात. खरी अडचण व खरी तेढ याच वेळीं उद्‌भवेल. मोठ्यांत मोठे हितसंबंधी म्हणजे ब्रिटीश संपत्ती व उद्योगधंद्यांचा गड्डा असें लंडन शहर. मूलभूत हितसंबंधाच्या बाबतींत हिंदुस्थान सरकार म्हणजे लंडनच्या हातांतील बाहुलें. लंडनशिवाय साम्राज्यशाही नोकरवर्ग, हिंदुस्थानांतील हितसंबंधी गट, संस्थानिक वगैरे आहेतच. १९३५ च्या घटना कायद्यान्वयें हिंदुस्थानांत अमलांत आलेल्या नवीन राज्यघटनेंत मतदान विस्तृत झाल्यामुळें प्रांतिक कारभारांत जरी विवक्षीत अधिकार मिळाले असले तरी ही घटना प्रामुख्यानें विशिष्ट हितसंबंधी लोकांना संरक्षण देणें व त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील ब्रिटीश साम्राज्य शाबूद राखण्याकरितां तयार करण्यांत आली होती. खुद्द प्रांतांतहि खरी सत्ता गव्हर्नरांच्या हातांत असून प्रांतांची जमाबंदी बव्हंशी वरील हितसंबंधी वर्गाकडेच गहाण पडली आहे. आज प्रांतिक सरकारमागें जें सामर्थ्य असल्याचें दिसतें, तें घटना

कायद्यापेक्षां बऱ्हंशी राष्ट्रीय चळवळीचीच फलश्रुति होय. राष्ट्रीय चळवळी-बरोबर तेढ येईल व त्यामुळें सर्व घटना तहकूब करावी लागेल, या भीतीनेः प्रांतिक सरकारच्या कारभारात फारशी ढवळाढवळ होत नसावी. पण एकंदरींत विचार केला तर हिंदुस्थानांतील सारी परिस्थिति मूलतः अस्थीर असून खुद्द घटनेंतच झगड्याचीं बीजें सुप्त असल्याचें स्पष्ट होतें. दुसरी गोष्ट म्हणजे, सध्यांच्या आर्थिक तरतूदी व राखीव खातीं यामुळें लोकोपयोगी अशीं मोठी कामें हातीं घेणें अशक्य झालें आहे.

पण या घटनेंतील सर्वांत वाईट भाग कोणता असेल तर तो मध्यवर्ती संयुक्त घटनेसंबंधीचा. हिंदुस्थानांतील सरंजामी संस्थानांना या घटनेमुळेः चिरंजीव करण्यांत आलें आहेच, पण त्याशिवाय संस्थानेतर हिंदुस्थानच्या कारभारांत हस्तक्षेप करण्याचा अधिकारहि त्यांना देण्यांत आला आहे. साम्राज्यशाही, सरंजामशाही व लोकशाही यांची मोट बांधण्याचा हा प्रयत्न हास्यास्पद असून, त्यांतून एकच अर्थ निघतो व तो म्हणजे सर्व प्रतिगामी प्रवृत्तींना हात देण्याची सरकारची इच्छा आहे. हिंदी संस्थानें ही शंभर सव्वाशें वर्षांचीं जुनी असून या मधल्या काळांत त्यांच्यांत क्वचितच बदल झाला आहे. या काळांत यूरोप व बाकीच्या जगांत कल्पनेबाहेर बदल झाला. अशा स्थितींतहि सर्व प्रकारच्या प्रगतीला अडथळा करणारीं संस्थानें आमच्यावर कायमची लादली जावीत, ही अमानुषपणाची परमावधी होय. संयुक्त राज्यघटना व एकंदरींत सर्व घटना कायद्याला जो उग्र विरोध होत आहे, त्याचें कारण वरीलप्रमाणें आहे.

स्वातंत्र्य व लोकशाही अनुशासन संस्था हें राष्ट्रीय सभेचें ध्येय आहे. काँग्रेसनें असें सुचविलें आहे कीं, कोणत्याहि तऱ्हेची बाहेरून ढवळाढवळ न होतां, वयांत आलेल्या माणसांच्या सार्वत्रिक मतदानानें निवडल्या गेलेल्या घटना समितीलाच हिंदुस्थानची राज्यघटना तयार करण्याचा अधिकार आहे. लोक-शाहीला अनुरुप असा हा मार्ग आहे. इच्छित ध्येय साध्य करण्याचा दुसरा एकमेव मार्ग म्हणजे क्रांति हा. सार्वत्रिक मतदानानें नियुक्त झालेली घटना समिती जनतेची प्रातिनिधीक असेल व छोटया गटांतील क्षुल्लक भांडणापेक्षां अशा

घटना समितींत जनतेच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांकडे विशेष लक्ष दिलें जाअील हें अुघड आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे फारशीं अडचण न येतां तींत जातीय वगैरे प्रश्न सोडविलें जातील. आर्थिक प्रश्न अर्थातच तितकें सुलभपणें सुटलें जाणार नाहींत, पण आर्थिक बाबतींतील येथील विविध हितासंबंधांतील तेढ बाकीच्या जगांत आढळून येणाऱ्या तेढीप्रमाणें आहे. आज सर्व जगभर विविध विचारप्रणाली व राजकीय तत्त्वें यांचा झगडा चालूं आहे. या झगडयांत हिंदुस्थान लोकशाहीच्या बाजूला असून तो फॅसिझम व हुकुमशाहीच्या विरुद्ध आहे. निरनिराळ्या देशांत व सहकार्य नांदावे व पर्यायानें जागतिक संघटना निर्माण व्हावी, असें हिंदुस्थानला वाटतें.

खरंच, स्वतंत्र हिंदुस्थान बाह्य आक्रमण व स्वारीपासून स्वसरंक्षण करण्याअितका समर्थ होअील ? ज्या ब्रिटीश साम्राज्यशाहीची अितकीं दीर्घकाल हिंदुस्थानवर पोलादी पक्कड आहे, त्या साम्राज्यशाहीपासून स्वातंत्र्य संपादन करण्याअितका हिंदुस्थान समर्थ झाला, तर त्यावरून आपोआपच निष्कर्ष निघतो कीं कोणत्याहि बाह्य अशा नवीन आक्रमणाला तो तोंड देअूं शकेल. राष्ट्राची शक्ती म्हणजे परस्परांवलंबी गोष्ट. कितीतरी अंतर्गत व बाह्य बाबींवर ती अवलंबून असतें. आज स्वतंत्र असलेल्या देशांपैकीं बहुतेक देश परकीय बलाढ्य सत्तेच्या आक्रमणाला प्रतिकार करायला समर्थ नाहींत.

तसेंच कोणतेंहि अेक बलाढ्य राष्ट्र दुसऱ्या दोन मोठ्या राष्ट्रांच्या संयुक्त आघातापुढें पराभूत होणें अशक्य नाहीं. युनायटेड स्टेट्स हेंच अेक राष्ट्र अशा रीतीनें वसलें आहे व अितकें समर्थ असावें कीं, जें शत्रू राष्ट्रांच्या संयुक्त गटाला कदाचित तोंड देअूं शकेल. बाकीचीं सर्व राष्ट्रें स्वातंत्र्य-संरक्षणाकरितां थोडीफार स्वसामर्थ्यावर, पण विशेषतः परिस्थितीनें दोस्त बनलेल्या राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून असतात.

हिंदुस्थान, अर्थातच स्वसंरक्षणाच्या दृष्टीनें समर्थ होण्याचा सर्व तऱ्हेनें प्रयत्न करील व त्याकरितां आवश्यक अशीं औद्योगिक वगैरे साधनसामुग्रीहि येथें आहे. हिंदुस्थानचे शेजारी व अितर राष्ट्रांशीं मित्रत्वाचे संबंध राहतील व

तेढ टाळण्याकडे आमचा कटाक्ष राहील. राष्ट्रीय सभेनें यापूर्वीच जाहीर केलें आहे कीं, ब्रिटनच्या कोणत्याहि साम्राज्यशाही युद्धांत हिंदुस्थान सहभागी होणार नाहीं. हिंदुस्थान स्वसंरक्षणासाठीं बलाढ्य लष्करी सामर्थ्य अुभारुं शकेल यांत शंकाच नाहीं. हिंदुस्थानच्या आजच्या लष्करांत हिंदी अधिकाऱ्यांची वाण असली तरीहि तें कार्यक्षम समजलें जातें.

आणि हिंदुस्थानवर आक्रमण तरी कोणाचें होणार? यूरोपांतील कोणताहि देश असलें अविचारी धाडस करण्यास तयार होअील कीं नाहीं याची शंका वाटते, कारण यूरोपांतील प्रत्येक देश अेकमेकांना दबकून आहे. आक्रमणाच्या दृष्टीनें विचार केल्यास सोव्हिअेट रशियाचा प्रश्न खात्रीनेंच अुद्भवत नाहीं, रशियाला आंतरराष्ट्रीय शांततेची आवश्यकता आहे व गरज म्हणून हिंदुस्थानचा प्रदेश बळकाविण्याची रशियाला जरुरी नाहीं. याच दृष्टीनें अफगाणिस्थान वगैरे सरहद्दीवरील टोळ्यांहि विचारांत घेण्याचें कारण नाहीं. सर्रास बाँबफेकीवर अवलंबून असणाऱ्या ब्रिटीशांच्या ‘ चढाअीच्या ’ धोरणाहून सर्वस्वी वेगळें असें, निकट मित्रत्वाचें व सहकार्याचे धोरण आम्हीं त्यांच्याशी ठेवूं. आणि त्यांतूनहि हे लोक विरोधी व आक्रमक राहिले तरी औद्योगिकदृष्ट्या अितके मागासलेले आहेत कीं, आपल्या डोंगराळ प्रदेशाबाहेर जाअून अद्यावत सैन्याला ते प्रतिकार करूं शकणार नाहींत.

जपानचा अेक आक्रमक राष्ट्र म्हणून अुल्लेख करण्यांत येतो. जपानमधील लष्करी श्रेष्ठींना सर्व आशिया व अितकेंच नव्हेतर जगावर प्रभुत्व संपादन करण्याचीं स्वप्नें पडत आहेत, असें म्हणतात. शक्य आहे. पण हिंदुस्थानवर येण्यापूर्वी त्यांना सारा चीन पादाक्रांत करावा लागेल बहुतेक लोकांच्या मतें हें काम जपानच्या पूर्णपणें आटोक्यांबाहेरचें असून त्यामुळें जपानच पुढेंमागें अितर मोठ्या राष्ट्रांशी खटका अुडणें असंभवनीय नाहीं. जपान हिंदुस्थानवर चालून येणार कसा? खुष्कीच्या मार्गानें खास नाहीं. जपानच्या मार्गांत वाळवंटें व हिमालय पर्वत यांच्यासारखे परिणामकारक नैसर्गिक अडथळे आहेत, व त्या मार्गानें वैमानिक दलहि येअूं शकणार नाहीं. समुद्रमार्ग लांबचा व

गुंतागुंतीचा असून तिकडून ज्या सामुद्रधुन्या ओलांडून यावयाच्या त्या म्हणजे धोक्यांनीं भरलेल्या आहेत. चीनचा पुरा पाडाव होअून, अमेरिका, सोव्हिअेट रशिया व अिंग्लंड यांना परिणामकारकरित्यां शह दिल्यावरच जपानच्या हिंदुस्थानवरील आक्रमणास मूर्त स्वरुप येअूं शकेल, जपानच्या दृष्टीनें हें अेक अचाट साहसच होय.

यावरून आपल्याला दिसून येअील कीं, सामान्यतः हिंदुस्थानवर बाहेरून आक्रमण होण्याचा मोठा किंवा अुघड असा धोका दिसत नाहीं. पण आपण आज युद्धें व आक्रमण यांच्या अनियमित जगांत वावरत आहोंत. आंतरराष्ट्रीय कायदे अस्तित्वांत नाहींत, करार-- आश्वासनें वगैरेंना किंमत राहिलेली नाहीं व सर्व राष्ट्रांत गुंडगिरी नग्न स्वरुपांत थैमान घालत आहे. आपल्याला माहित आहे कीं, क्रांति व युद्धांच्या या काळांत काय वाटेल त्या घडामोडी होतील, अशा स्थितींत आपल्यापुढें अेकच मार्ग आहे व तो म्हणजे स्वतःच्या सामर्थ्यावर विसंबून रहाणें व त्याचबरोबर बुद्धीपुरस्सर शांततेचें धोरण ठेविणें. आपण कोणत्याहि मार्गानें गेलों तरी धोके पत्करावे लागतील. हे धोके टाळणें शक्य नसल्यामुळें, त्यांना आमची तयारीहि आहे.

आमच्यापुढें ज्या अडचणी आहेत, त्यांचें महत्व आम्हीं कमी लेखत नाहीं. आमचा मार्ग खडतर आहे. बाह्य विरोधामुळें तो आधींच खडतर झाला आहेच, पण आमच्यांतील दुर्बलतेमुळें त्याला अधिक बिकट स्वरुप आलें आहे. प्रतिस्पर्ध्यांच्या सामर्थ्यापेक्षां स्वतःतील दोषांशीं लढणें, हें नेहमींच कठीण असतें. आम्हांला दोहोंशीहि लढावयाचे आहे. आमच्यांत अनेक सामाजिक अनिष्ट प्रवृत्ति वास करीत असून, त्यांच्यामागें दीर्घकालीन परंपरेचें बल व संचय आहे ज्यामुळें अितर कांहीं देशांत फॅसिझम अुदयास आला अशीं बीजें आमच्या देशांतहि आहेत. आमच्यांत निष्क्रीयता वावरत असून नशीब व तथाकथित नशीबांच्या चक्करापुढें दीनपणें नमण्याकडे आमचा कल असतो. पण त्याबरोबर हिंदुस्थानच्या जीवनचैतन्याचा नवा साक्षात्कार येथें प्रचीतीस येअूं लागला आहे. अगतिक क्रियाशून्यतेचा काल गेला असून परिवर्तन आणि त्याचप्रमाणें दुःख,दारिद्र्य

यांना नामशेष करण्याच्या तळमळीनें जनतेला ग्रासले आहे. आज सारें जग युद्ध आणि युद्धाच्या भयसूचक अिशाऱ्यांनीं झादरून गेले आहे. भावी काळांत आमच्यापुढें काय वाढून ठेविलें आहे ! संकटें, अमानुष क्रौर्य, विध्वंस किं मानवी प्रगति-कोणालाच सांगता येत नाहीं. पण तें कांहीं कां असेना हिंदुस्थान यापुढें केवळ भवितव्य किंवा दुसऱ्याच्या लहरीवर निष्क्रीयपणें विसंबून राहणार नाहीं, हें स्पष्ट आहे.

आज हिंदुस्थानच्या सुप्त ' मानस ' सरोवरांत कुतुहल, विचारांचा झगडा व पेचप्रसंग अुद्भवला आहे. प्राचीन काळाप्रमाणेंच, हिंदुस्थान आज भूतकाळ व वर्तमानकाळ किंवा नव्याजुन्याचा समन्वय साधूं पहात आहे. नवीन औद्योगिक सुधारणा बेगुमानपणें मार्ग आक्रमीत असल्याचें हिंदुस्थानला आज स्पष्ट दिसतें. या सुधारणेकडे हिंदुस्थान अविश्वासानें पहात असून तिच्याविषयीं थोडीफार कलुषित भावना बाळगून आहे. जें कांहीं जुनें त्याविरुद्ध ही औद्योगिक सुधारणा म्हणजे आघात व अुठाव, पण तरीहि अपरिहार्य घटना म्हणून तिचा स्वीकार करण्यांत आला आहे. हिंदुस्थानला आपल्या मूलभूत कल्पनांशीं या औद्योगिक सुधारणांचा मेळ घालावयाचा किंवा अंतर्मन व त्याच्याभोंवतीचें सारखें बदलत असलेलें बाह्य वातावरण यांच्यांत अेकतानता निर्माण करावयाची आहे. आजच्या सर्व जगांत ही अेकतानता प्रभावानें आढळू येतें. आपण तिच्यामागें अंधपणें लागलो आहोंत. तिचा लाभ होअीपर्यंत अर्थातच आपल्याला, कलह, द्वेष व आपसांतील विध्वंस यांच्या वाळंवटांतून रखडत जावें लागेल.

फॉरेन अफेअर्स, अमेरिका, १९३८.

औद्योगिकरण व ग्रामोद्योग

फार पूर्वीपासून मी हिंदुस्थानच्या औद्योगिकरणावर भर देत आलो आहे. आपलें उत्पादन व राष्ट्रीय संपत्ति झपाट्यानें वाढविणें व त्याचप्रमाणें आपलें रहाणीचें मान सुधारणें याकरिता औद्योगिकरणाची आवश्यकता आहे. औद्योगिकरण व मोठमोठे कारखाने यांच्याशिवाय आपण आपल्या दारिद्र्याचा प्रश्न सोडवूं शकूं असें मला वाटत नाहीं. औद्योगिकरणाशिवाय कोणताहि देश आर्थिकदृष्ट्यां स्वतंत्र होऊं शकेल, अशी माझी कल्पना नाहीं.

तरीहि ग्रामोद्योगांचा प्रसार व वाढ होण्याकरितां मी धडपड करतो, याचें कारण केवळ राजकीय शिस्त म्हणून नव्हे तर माझा ग्रामोद्योगांवर विश्वास आहे म्हणून. माझ्या बऱ्याच मित्रांना, दोन्ही प्रकारच्या धंद्यांना प्रोत्साहन देण्याचें धोरण मान्य नाहीं. त्यांचा माझ्यावर धरसोडीचा आरोप असून ज्या गोष्टींचा मेळ बसणें शक्य नाहीं, अशांचा मी मेळ घालण्याचा प्रयत्न करीत आहे, असें त्यांना वाटते. पण माझी खात्री मात्र कोणीच करून दिलेली नाहीं. मला अद्यापिहि वाटतें कीं हिंदुस्थानांत आपण मोठे उद्योगधंदे व ग्रामोद्योग या दोहोंनाहि चालना देऊन, त्यांचा मेळ घातला

पाहिजे. सध्यांच्या भांडवलशाही पद्धतींत ही गोष्ट अर्थात सहजासहजीं करतां येणार नाहीं, त्याकरितां ही पद्धतच आतां बदलून टाकली पाहिजे. तसें पाहिलें तर चालू महायुद्ध व या महायुद्धाचे युद्धोत्तर परिणाम या दोहोंच्या दडपणाखालीं ही भांडवलशाही पद्धत जाऊन, त्या ठिकाणीं नियोजित अर्थ रचना येण्याचा समय प्राप्त झाला आहे.

मला वाटतें, ग्रामोद्योगांवर भर देऊन गांधीजी देशाची मोठीच सेवा करीत आहेत. गांधीजींनीं ग्रामोद्योगांकडे लक्ष देण्यापूर्वीं सर्वजण--निदान बहुतेकजण, या प्रश्नाचा पृथक्करणें विचार करीत. या प्रश्नाच्या मानवी अंगाकडे आम्ही दुर्लक्ष करीत होतो, अेवढेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील विवक्षीत परिस्थितीचीसुद्धां आम्हांला जाणीव नव्हती. चीनप्रमाणेंच हिंदुस्थानहि प्रचंड-लोकसंख्या, अफाट बेकारी व दरिद्री रोजगारीचा देश आहे. मूळच्या थोड्या पण वाढत्या लोकसंख्येबरोबर ज्यांचें क्रमशः औद्योगिकरण झालें, अशा यूरोपांतील आटोपशीर देशांशी हिंदुस्थानची तुलनाच होअू शकत नाहीं. ज्या योजनेंत आपल्या श्रमशक्तीची नासाडी होअील किंवा ज्यामुळें लोक अुद्योगाला मुकतील अशी कोणतीहि योजना वाअीट. मानवी दृष्टीव्यतीरिक्त शुद्ध आर्थिक दृष्टीनें विचार केला तरीहि अधिक श्रमशक्ती व शक्य तितकी कमी प्रवण (Specialized) यंत्रसामुग्री वापरणेंच अधिक श्रेयस्कर. पुष्कळशा लोकांना कमी प्रमाणांत कां होअीना मजूरी मिळवून देणें, हें त्यांच्यापैकीं बहुतेकांना बेकार राखण्यापेक्षां अधिक बरें. दुसराहि अेक विचार करणें जरुर आहे. बऱ्याच प्रकारच्या ग्रामोद्योगांमुळें जी अेकूण संपत्ति पैदा केली जाअील ती कांहीं कारखान्यांतून त्याच प्रकारच्या पैदास होणाऱ्या मालांपेक्षा अधिक असणें असंभवनीय नाहीं.

अधिकांत अधिक अुत्पादन, शक्य तितकी समान विभागणी व बेकारीचें अुच्चाटन हें आपलें ध्येय असले पाहिजे. हिंदुस्थानची अफाट लोकसंख्या लक्षांत घेतां ही गोष्ट केवळ मोठे अुद्योगधंदे व ग्रामोद्योग या दोहोंपैकीं अेकानें साध्य होअू शकणार नाही. मोठ्या अुद्योगधंद्यांमुळें कांहीं जिनसांचे

अुत्पादन खूपच वाढेल, पण बेकारीचा प्रश्न कमीअधिक प्रमाणांत आहे तसाच राहून वाजवी विभागणी करणें जड जाअील. त्याचप्रमाणें मोठ्या अुद्योगधंद्यांतील श्रमशक्तीच्या नासाडीमुळें, अुपलब्ध साधनसामुग्रीच्या मानानें आपलें अेकूण अुत्पादन फारच कमी होण्याचा संभव आहे. याअुलट निव्वळ ग्रामोद्योगांमुळें अधिक वाजवी विभागणी होअील, पण अेकूण अुत्पादन कमी प्रमाणांत होत राहील व जीवनाचा दर्जा सुधारणार नाही. अर्थात हिंदुस्थानच्या सद्य:स्थितींत व्यापक प्रमाणांत निघालेल्या ग्रामोद्योगामुळें प्रचलीत राहणीच्या मानांत खूप सुधारणा होअील, ही गोष्ट खरी असली तरी अेकंदरींत तें नेहमीं खालच्या पातळीवरच राहील. याशिवाय अितरहि कांहीं बाबी अशा आहेत कीं, ज्यामुळे कोणत्याहि देशाला सर्वस्वी ग्रामोद्योगांवर अवलंबून राहणें अशक्य होतें. अद्यावत अशा कोणत्याहि देशाला जगण्याकरितां कांहीं विवक्षीत वस्तू आवश्यक असतात व या वस्तू फक्त मोठ्या कारखान्यांतच होअूं शकतात. या वस्तू निर्माण न करणें म्हणजे त्यांच्या आयातीवर विसंबून रहाणें, याचा अर्थ परकीय देशाचें आर्थिक जोखड मानेवर लादून घेणें. यामुळेंच आर्थिक पारतंत्र्य व कदाचित राजकीय गुलामगिरी येण्याचा संभव असतो.

याचकरितां मला वाटतें, हिंदुस्थानांत मोठे मूलभूत अुद्योगधंदे व ग्रामोद्योग हे दोन्हीहि आवश्यक आहेत. मात्र त्या दोहोंत विरोध न येअील, अशाच रीतीनें त्यांचें नियोजन केलें पाहिजे. मोठ्या अुद्योगधंद्यांना प्रोत्साहन देअून त्यांची वाढ शक्य तितक्या झपाट्यानें केली पाहिजे, पण ज्या धंद्याला प्रोत्साहन द्यावयाचें तो काळजीपूर्वक निवडला पाहिजे. ज्याला राष्ट्रीय आर्थिक सामर्थ्याचा आधार म्हणतां येअील व ज्यावर अितर अनेक धंदे क्रमश: अुभारतां येतील असा हा धंदा प्रचंड व मूलभूत असावा. औद्योगिक प्रगतिला विद्युत-शक्ती आवश्यक आहेच, पण त्यामागोमाग, यंत्रें तयार करणें, जहाजें बांधणें, रसायनें, अिंजिन्स, मोटारगाड्या वगैरेकडे लक्ष दिलें गेलें पाहिजे. हें व यासारखे अितर मोठें अुद्योगधंदे म्हणजे संपत्ति व अुद्योग निर्माण करणारे धंदे असून, त्यामुळें अितरत्र कोठेंहि बेकारी माजत नाहीं. दुय्यम यांत्रिक अुद्योग

धंद्यांना प्रारंभी अुत्तेजन देण्यांत येअू नये. याचें अेक कारण म्हणजे, आपलें भांडवल मर्यादित असल्यामुळें तें मोठ्या अुद्योगधंद्याकरितां लागेल. दुसरें कारण म्हणजे ह्या दुय्यम धंद्यांची ग्रामोद्योगांशीं स्पर्धा अुत्पन्न होअून, पर्यायानें बेकारी निर्माण होअील.

दुर्दैवानें आपल्या देशांतील औद्योगिक वाढ बव्हंशी यांत्रिक धंद्यांपुरतीच सध्यां मर्यादित आहे. मोठे अुद्योगधंदे काढण्याचे, आपल्या देशांतील कारखानदारांनीं थोडेफार प्रयत्न केले, पण सरकारनें त्यांची मुस्कटदाबी केली. ब्रिटीश कारखानदारांच्या नजरेपुढें नव्या जगाचें मोहक चित्र तरळत असल्यामुळें, हिंदुस्थानांत मूलभूत धंदे अुभारण्यासाठीं वाव देअून युद्ध जिंकण्याचा विचार मनांत आणण्याअैवजीं युद्धोत्तर हिंदुस्थानवर आपली आर्थिक पक्कड कशी कायम राखतां येअील, याच विचारांत ते दंग आहेत.

हिंदुस्थानांत अुद्योगधंद्याची पद्धतशीर वाढ व तसेंच मोठे मूलभूत अुद्योगधंदे मध्यम अुद्योगधंदे आणि ग्रामोद्योग यांची जुळणी फक्त राष्ट्रीय योजनेंतच घालतां येअील. अर्थात राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य व त्याचप्रमाणें बरेचसें सरकारी नियंत्रण असल्याशिवाय ही योजना परिणामकारक होणार नाहीं. मूलभूत धंदे, सार्वजनिक सोयीचीं व वहातुकीचीं साधनें कोणत्याहि परिस्थितींत सरकारी मालकीचीं-निदान सरकारच्या संपूर्ण नियंत्रणाखालीं असलीं पाहिजेत. अितर अुद्योगधंद्यांवरील सरकारचें नियंत्रण थोडेसें ढिलें असावयास हरकत नाहीं. पण सरकारनें प्रोत्साहन दिलेल्या कोणत्याहि ग्रामोद्योगांशीं अेकाद्या मोठ्या अुद्योगधंद्याची स्पर्धा येत असेल तर अशा धंद्यावर सरकारचें संपूर्ण नियंत्रण असणें जरुर आहे. यामुळें स्पर्धा टळून, जुळणी घालणें सुलभ होअील.

विद्युतशक्तीमुळें अुद्योगधंद्याच्या बाबतींत मोठाच फरक पडला आहे. यामुळें मोठमोठ्या अुद्योगधंद्याचेंहि विकेंद्रिकरण (de-centralization) करणें शक्य झालें आहे. लहानलहान ग्रामोद्योगांच्या दृष्टीनें ही गोष्ट मोठीच अिष्टदायक आहे.

हीं झाली नेहमींची गोष्ट. युद्धपरिस्थितीमुळें लहानलहान ग्रामोद्योगांचें स्वरूप पार बदलून गेलें आहे व याच दृष्टीनें चीनचें उदाहरण फार महत्वाचें आहे. युद्धजन्य परिस्थितींत विशेषतः आक्रमक शत्रूंचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीनें या ग्रामोद्योगांचा छानच उपयोग होत असल्याचें दिसून येतें. मला जी गोष्ट अपूर्व वाटली ती ह्मणजे चीनमधील या औद्योगिक सहकारी संस्थांतील उत्पादनाचें प्रमाणहि अचाट आहे. या धंद्यांत जितकें भांडवल गुंतविण्यांत आले आहे, त्याच्या दुप्पट किंमतीचें उत्पादन प्रत्येक महिन्यास होतें ! कदाचित युद्धपरिस्थितीचाहि हा परिणाम असेल. पण युद्धपरिस्थितींतहि सदर उत्पादन थक्क करणारे आहे, यांत शंकाच नाहीं.

युद्धाच्या ज्वालांत गुरफटलेलें हें जग-या जगांत वरील सहकारी संस्थांची लोकशाही घटना व लोकशाहीच्या पायांवर त्यांची होत असलेली वाढ या गोष्टी मोठ्या अुद्‌बोधक व वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. याच पायावर अुभारलेली राजकीय लोकशाहीहि कदाचित टिकूं शकेल. अितर कोणता पाया तिला अुपयोगी पडेल कीं नाहीं याची शंका आहे.

हिंदुस्थान किंवा चीन या दोन्हीं ठिकाणीं अितरप्रमाणें भांडवलशाही औद्योगिक वाढ होणार नाहीं. तरीहि औद्योगिकदृष्ट्यां आपण प्रगति केली पाहिजे, नाहींतर आपण नाश पावूं. आपणच आपला मार्ग काढून स्थिरस्थावर केलीं पाहिजे. भविष्यकाळांत कदाचित आपल्याला सहकारी राज्यघटना अपरिहार्यारित्यां स्वीकारावी लागेल, अितकेंच नव्हे तर साऱ्या जगालासुद्धां हाच किंवा यासारखा दुसरा अेकादां मार्ग स्वीकारावा लागेल. त्याशिवाय पाशवी वृत्ति, वारंवार होणारीं युद्धें आणि त्यामुळें होणाऱ्या मानवी कत्तली यांना आळा बसणार नाही.

चायना बिल्ड्स फॉर डेमॉक्रसी
या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंतील
कांहीं भाग, १९४२

आगगाडींत

माझे मित्र मला अनेकदां विचारतात तुम्हीं वाचतां केव्हां ! माझ्या-मागें त्यांना विविध व्याप लागलेलें दिसतात. यापैकीं कांहीं कदाचित अुपयुक्त असतील आणि बाकीचे ? अुपयोगी आहेत कीं, काय याची शंकाच आहे. राजकारणाचा भयंकर मामला म्हणजे तारुण्याला लागलेली वाळवी. परिस्थिती अनुकूल असती तर जो काल आम्हीं आवडत्या कार्यांत खर्च केला असतां, तो काल ही वाळवी खात असते. या मामल्यांत पुस्तकाशीं संगत करणें किंवा त्यांच्या रमणीय जगांत वावरणें सोपें नाहीं. पण अशा या कंटाळवाण्या स्थितीं-तहि मी राजकारणापासून अगदीं अलीप्त असें. अेकादें पुस्तक वाचण्याकरितां दररोज रात्रीं सवड काढण्याचा प्रयत्न करतो. अर्थात मला नेहमींच सवड मिळतें असें नाहीं. माझें बहुतेक वाचन, आगगाड्यांतून या अफाट देशांत अिकडून तिकडे प्रवास करीत असतांना होतें.

आपल्या अिकडच्या आगगाड्यांतील तिसऱ्या वर्गाचा किंवा अिंटरचा डबा वाचन वगैरे करण्याच्या दृष्टीनें सोयीचा नसतो. पण सहकारी प्रवाश्यांची माझ्या-विषयीं निस्सिम आपुलकी व रेल्वे अधिकाऱ्यांचा चांगुलपणा यामुळें माझा प्रवास त्रासदायक होत नाहीं. प्रवासांतील साऱ्या गैरसोयींचा अनुभव मला कधींच आला नाहीं. बिचारे प्रवाशी, प्रवासांत मला वाजवीपेक्षां अधिक जागा आग्रहानें करून देतात. ठिकठिकाणीं मला जे प्रेमळ अनुभव येतात, त्यामुळें

अेकंदर प्रवासाला माधुर्याची रमणीय झटा येते प्रवासांतील गैरसोयीं मला प्रिय आहेत किंवा त्यांचा अनुभव घ्यावसा वाटतो, असा त्याचा अर्थ नव्हे. तसेंच मी तिसऱ्या वर्गानें जो प्रवास करतो, त्यामागें अेकादें तत्व आहे असेंहि नाहीं. मुख्य प्रश्न असतो तो पैशाचा. आपल्याकडील तिसऱ्या व दुसऱ्या वर्गांच्या दरांमध्यें अितका फरक आहे कीं, अगदींच निकड भासली तरच मी दुसऱ्या वर्गानें प्रवास करण्यास प्रवृत्त होतो.

पूर्वीं--सुमारें बारा वर्षांपूर्वीं मी बरेंचसें--विशेषतः कॉंग्रेससंबंधीचीं पत्रें लिहणें वगैरे लेखन प्रवासांतच लिहीत असे. हिंदुस्थानांतील अनेक रेल्वेंतून मला वारंवार प्रवास करावा लागला व या रेल्वेंतील चांगल्या कोणत्या हें मी त्यांत मिळणाऱ्या लेखनाच्या सोयीच्या दृष्टीनें ठरविलें होतें. मला वाटतें, मी पहिला नंबर अीस्ट अिंडिया रेल्वेला दिला होता, त्यानंतर नॉर्थ वेस्टर्न रेल्वेसुद्धां बरी आहे; पण जी. आय्. पी. मात्र अगदींच गैरसोयीची होती. तींत माणसाची हाडें नुसतीं खिळखिळीं होतात. हें असं कां हें मला माहित नाहीं; तसेंच सरकारच्याच ताब्यांतील वेगवेगळ्या रेल्वें पण त्यांच्या दरांतहि अितका फरक कां असावा, तेंहि मला अज्ञात आहे. दरांच्या दृष्टीनें पाहिलें तरीहि जी. आय्. पी. अेक अत्यंत महागडी रेल्वे आहे. साधी परतीची तिकीटेंसुद्धां तींत दिलीं जात नाहींत. पूर्वींप्रमाणें अलीकडे मी गाडींत फार लिहावयाचें सोडून दिलें आहे. कदाचित धांवत्या गाडींतील हादरे व धक्के सहन करण्याअितकी माझी प्रकृति, आतां पूर्वींप्रमाणें कणखर राहिली नसावी. पण प्रवासांत मी चिक्कार ट्रंक भरून पुस्तकें घेतो. मी जितकीं पुस्तकें वाचण्याची शक्यता त्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक पुस्तकें माझ्याबरोबर नेहमींच असतात. वाचन न कां होअिना, पण जवळ पुस्तकें तर भरपूर आहेत ना, या विचारामुळें मनाला समाधान वाटतें.

या खेपेस मी दूर कराचीच्या प्रवासास निघालो होतो. विशेषतः आकाशयानांतून द्रुतगतीचे प्रवास केलेले असल्यामुळें, यावेळीं मी जणूं काय यूरोपच्याच प्रवासास निघालों आहे, असेंच मला वाटत होतें. सहाजिकच माझ्या

ट्रंकेंत निरनिराळ्या प्रकारचीं चित्रकार पुस्तकें भरलीं होतीं. नेहमींच्या सवयी-प्रमाणें मी प्रथम अिंटरच्या वर्गांत बस्तान ठोकलें, पण दुसरें दिवशीं लाहोर येथें पोहोंचल्यावर, प्रवासांतील अुष्णता व धूळ यांचीं जी भयंकर वर्णनें माझ्या कानांवर आलीं, त्यामुळें माझा निश्चय डळमळला, व मी दुसऱ्या वर्गाच्या आरामशीर डब्यांत तळ हालविला. सिंधचें सर्व वाळवंट मी अशा अैटीच्या व कांहींशा आरामशीर प्रवासांतच ओलांडलें. मला वाटतें मी दुसऱ्या डब्यांत गेलो, हें बरेंच झालं. कारण या डब्यांना चांगली झापडं असूनहि, निरनिराळ्या छिद्रांतुन, सारखी बारीक बारीक धूळ आंत येत होती. हळुंहळूं आमच्या अंगा-वर या धूळीचीं पुटें चढत गेलीं व श्वासोच्छ्वास करणेंहि कठीण पडुं लागलें. दुसऱ्या वर्गाची जर ही तऱ्हा तर तिसऱ्या वर्गांत काय स्थिति असेल, या विचा-रानें माझा थरकांप अुडाला. अुष्णता वगैरेंना मी तोंड देअुं शकतो, पण धूळीचें आक्रमण सहन करणें मला फार जड जातें.

मी या प्रवासांत जीं पुस्तकें वाचलीं, त्यापैकीं अेक, अेका वैशिष्ठ्यपूर्ण व असामान्य व्यक्तीनें लिहलेलें होतें. या व्यक्तीचें नांव अेडवर्ड विल्सन. विल्सन हा पशुपक्ष्यांचा मोठा भोक्ता होता. पण त्याहिपेक्षां अुल्लेखनीय गोष्ट म्हणजे, तो दक्षिण ध्रूवावरील मोहिमेंत स्कॉटबरोबर होता. या मोहिमेंत त्यानें स्कॉटची अिहलोकीच नव्हे तर परलोकींहि सांथ केली. विल्सनच्या या पुस्तकाबद्दल मला विशेष आकर्षक वाटण्याचें दुसरें अेक कारण होतें, कारण दुसऱ्या अेका वैशिष्ठ्यपूर्ण व्यक्तीनें तें भेट म्हणुन माझ्याकडे पाठविलें होतें. या व्यक्तीचें नांव अे. जी. फ्रेझर. पश्चिम आफ्रिकेंतील अॅशीमोटा कॉलेजचे ते कित्येक वर्षे प्रिन्सीपॉल होते. हें कॉलेज म्हणजे आफ्रिकन शिक्षणक्रमाचें अुदात्त व अपूर्व स्मारकच. फ्रेझरनीं अविश्रांत श्रम, सहानुभूती व कळकळीच्या जोरावर हें स्मारक अुभारलें होतें.

सिंधच्या वालुकामय व रखरखीत वाळवटांतून गाडी वेगानें धांवत असतां, मी दक्षिण ध्रुवावरील बर्फमय प्रदेशाची माहिती वाचण्यांत गुंग होतो. पंचमहाभूतांविरुद्धचा माणसाचा रोमांचकारी लढा, बलाढ्य निसर्गालाहि

नमविणारे अचाट मानवी धैर्य व कल्पनाशक्तीला गुंग करणारी सहनशीलता, तसेंच अत्युच्च प्रयत्न, सहकाऱ्यांविषयीं निष्ठा, ध्येयाशीं एकरूप होण्याची वृत्ति व संकटाला हंसतमुखानें तोंड देण्याची छाती–या साऱ्या गोष्टी वाचत असतां मी तन्मय होऊन गेलो. खरंच हें सारे कशाकरितां ? स्वतःच्या फायद्याकरितां कीं जनतेच्या हिताकरितां कीं शास्त्रीय विज्ञानाच्या प्रगतीकरितां ? नव्हे. मग कशाकरितां ? केवळ माणसांत जी साहसी वृत्ति वास करीत असते तिला बाहेरची वाट देण्याकरितां परिस्थितींपुढें न नमतां, नक्षत्रांचे आवाहन स्वीकारण्याकरितां उंचउंच भराऱ्या मारण्याची मनाची धडपड सदैव चालूच असते. आपल्यापैकीं बहुतेक लोकांना हें आवाहन ऐकूं येत नाहीं. कांहीं थोड्या लोकांच्या कानांवर तें पडते व ज्यांच्या पडतें ते आपल्या पिढीच्या जीवनामागें भव्यतेचा पडदा उभारतात. त्यांच्या दृष्टीनें जीवन म्हणजे एक अनंत आव्हान, प्रदीर्घ साहस व पात्रतेची कसोटी.

" I count life just a stuff
To try the soul's strength on ...."

(जीवन म्हणजे केवळ आत्मशक्ती अजमावण्याचें साधन)

अेडवर्ड विल्सन या कोटींतील होता. दक्षिण ध्रुवांवर पाऊल ठेविल्यावर त्यानें आपल्या सहकाऱ्यांसह या विस्तृत प्रदेशांतील धरणीची विश्रांतिकरतां शय्या केली. जेथें दीर्घ दिवसानंतर दीर्घ रात्र येतें व स्तब्धतेचें साम्राज्य पसरते, अशा या धरणीशिवाय विश्रांतीकरितां या महाभागांना दुसरी योग्य अशी जागा तरी कोणती होती ? त्या ठिकाणी हे महाभाग झोपी गेलेले असून त्यांच्यासभोंवार हिमाची अनेक वलयें आहेत आणि त्यांच्या स्मारकांवर माणसाच्या हळूवार हातांनी खालील आलेख कोरला गेला आहे.

" To Strive, to seek, to find and not to yield. "

(झगडण्याकरितां, संशोधन करण्याकरितां, शोधण्याकरितां पण हार न खाण्याकरितां.)

दोन्हीं ध्रुव जिंकलें गेले, वाळंवटें दृष्टीपथांत आलीं, मोठमोठ्या गिरी-शिखरांनी माणसांपुढें हार खाल्लीं, आज फक्त गोरीशंकर ताठ व अजिंक्य असा अुभा आहे. पण माणूस प्रयत्नवादी असल्यामुळें गोरीशंकरालाहि त्याच्यापुढें नमावें लागेल. माणसाच्या अिवल्याशा देहांत वास्तव्य करून राहिलेलें मन हें मन बंधनें मानत नाहीं व अिच्छाशक्तीला पराभव ठाअुक नाहीं. पण गोरीशंकरनंतर पुढें काय ? हें जग दिवसेदिवस छोटें वाटूं लागेल व त्यांतून साहस व रम्यता ही प्रणयी दुक्कल निघून गेली आहे कीं काय असा भास होअील. असें म्हणतात कीं, थोड्याफार काळांत ध्रुवांवरील अुड्डाणें म्हणजे हातचा मळ होअील तेथील पर्वतांवर गाड्यांची धांवपळ सुरू होअील व या पर्वताच्या माथ्यावरील आरामगृहांत, रात्रीच्या स्तब्धतेचा भंग करणारी व भोंवतालची शाश्वत शांतता व हिमगोरींना वांकुल्या दाखविणारीं वाद्यें झडूं लागतील. गप्पा झोडत पत्ते कुटणाऱ्या मध्यम वयाच्या लोकांचे अड्डे तेथें स्थापन होतील. तसेंच तेथें जीव नकोसे झालेले तरुण स्त्रीपुरुष व त्याचप्रमाणें म्हातारेकोतारे सुखांच्या अुत्कृष्ट आशेनें येतील, पण सुख म्हणजे निळा पक्षी. कुठला मिळायला ?

तरीपण वीरांकरितां साहसें नेहमींच तयार असतात. धाडशी व हिंमतीच्या व्यक्तीकरितां या विशाल जगांत अद्यापहि वाव आहे व त्याहिपलीकडे आकाशांतून, नक्षत्रें आव्हान देत आहेत. खरंच जीवनांत पाहिजे तितकी साहसें असतांना केवळ त्याचकरितां ध्रूव, वाळवंटें अगर गिरीपर्वतांकडे मोर्चा वळविण्याची आवश्यकता आहे कां ? खरेंच आपलें जीवन व समाजव्यवस्था यांचा आपण केवढा गोंधळखाना करून टाकला आहे ? विपुलता, आनंद व अिच्छा--आकांक्षांचा मुक्त विकास होण्यास वाव असूनहि आपण दुःखांत पिचत आहोंत. पूर्वीपेक्षांहि अधिक वाअीट अशा गुलामगिरींत आपण भरडले जात आहोंत. ही परिस्थिति बदलण्याचा प्रत्येकानें आपल्या परीनें प्रयत्न केला तर, मानवी समाजाला, आपल्या अुज्वल परंपरेला शोभेसें स्थान मिळेल व आपलें जीवन सौंदर्य व आनंद यांनीं फुलून जाअून, त्यांत चैतन्य खेळूं लागेल. जीवनाचें साहस

आपल्याला आवाहन देत आहे. व सर्वांपेक्षां हेंच साहस भव्य आहे. वाळवंटावर निशादेवीचें साम्राज्य पसरलेलें असतें, पण या अंधःकारालाहि न जुमानतां पर्जन्यधारा इच्छित स्थळाकडे वेगानें येत रहातात. याचप्रमाणें मानवापुढें काळोखी रात्र पसरली असली व इच्छित स्थळ आज अज्ञांत असलें तरी, त्यांतूनहि तो चांचपडत पुढें जाण्याचा प्रयत्न करीत आहे. लवकरच दिवस उगवेल व नीलवर्ण सागर आपल्या स्वागताला आल्याचें दिसून येईल.

मॉडर्न रिव्ह्यू, कलकत्ता
१९३६

आमचें भवितव्य ?

चालू महायुद्धांत जर्मनीचा पराभव होवो किंवा विजय होवो, पण यापैकी कोणतीहि गोष्ट घडली तरी यूरोपच्याच नव्हे तर जगाच्या परिस्थितींत बराच फरक पडेल हें अुघड आहे. त्यामुळें दूरगामी असे विवक्षीत बदल व घटना घडणें अपरिहार्य आहे. लहानसहान राष्ट्रें नाहींशीं होतील व त्या जागीं कोणत्याहि प्रकारची कां होईना जागतिक संयुक्त घटना किंवा तीन-शक्य तर चार-- संयुक्त राष्ट्रसंघ किंवा साम्राज्यशाही गट अस्तित्वांत येतील. जर साम्राज्यशाही गट अस्तित्वांत आले तर अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही प्रकारच्या भंगाळ्या व झगडे सतत चालू राहतील. अंतर्गत म्हणण्याचें कारण साम्राज्यशाहींत भितर जनता व राष्ट्रें यांच्यावर लादलेली गुलामगिरी अभिप्रेत असते. बाह्य म्हणण्याचें कारण निरनिराळीं साम्राज्यें किंवा संयुक्त राष्ट्रसंघ यांच्यांत वैर राहील. प्रत्येकजण आपापल्या प्रदेशांत अेक प्रकारची अेकतंत्री सत्ता किंवा स्वायत्त आर्थिक पद्धति अस्तित्वांत आणण्याचा प्रयत्न करील. पण त्यामुळें समतोलता किंवा स्थैर्य येणार नाहीं व पुढेंमागें शांतता किंवा युद्ध यांतूनच अेक जागतिक राष्ट्रसंघ अुदयास येईलच. असा जागतिक संघ अस्तित्वांत येणें अपरिहार्यच आहे, नाहींपेक्षां सतत मोठ्या प्रमाणावर विध्वंस होत राहील व जगांत पुन्हां रानटीपणा बोकाळेल. अर्थात हा जो नवीन राष्ट्रसंघ अस्तित्वांत येईल तो म्हणजे स्वतंत्र राष्ट्रांचा खराखुरा संघ असला पाहिजे. बाहेरून

छादण्यांत आलेला तथाकथित राष्ट्रसंघ म्हणजे वस्तुतः साम्राज्यशाहीच असून त्यांत विध्वंसाचीं स्वाभाविक बीजें असतात.

अर्थात युद्धाचा निकाल कसाहि लागला तरी ब्रिटीश साम्राज्य संपुष्टांत येणार हें मात्र स्पष्ट दिसतें. हें असें कां व्हावें, याला कारणें आहेतच, पण युद्धाच्या गतीमुळें ही गोष्ट स्पष्ट झाली आहे.या युद्धांतून जरी कांहीं साम्राज्य-शाही गट निर्माण होण्याचा संभव असला तरी,आजचें ब्रिटीश साम्राज्य त्यापैकीं अेक असणार नाहीं, हें अुघड आहे.कदाचित अँग्लो-अमेरिकन असा अेक राष्ट्रसंघ किंवा साम्राज्यशाही स्थापण्याचा विचार पुढें येअील व त्याला दुसरीं कांहीं राष्ट्रेंहि चिकटून रहातील, पण अशा राष्ट्रसंघांत किंवा साम्राज्यांत अिंग्लंडचें स्थान गौण असेल. सर्व जगांत अेकच जागतिक साम्राज्य स्थापन होण्याची अगदीं अंधुकशीहि आशा नाहींच पण आज ब्रिटनचें जसें सर्व जगभर पसरलेलें व्यापक साम्राज्य आहे तसें साम्राज्यसुद्धां पुढें अस्तित्वांत येणें शक्य नाहीं.अशा साम्राज्या-करितां समुद्रावरील व जगांतील व्यापारी मार्गावर स्वामीत्व व त्याचप्रमाणें वैमा-निक प्रभुत्व असावें लागतें. जगांतील कोणत्याहि अेका राष्ट्राला किंवा राष्ट्र-गटाला असें जागतिक प्रभुत्व लाभणें शक्य नाहीं. जर साम्राज्यें अस्तित्वांत रहावयाचीं असतील तर ती मूलतः सलग राष्ट्रांचीच असावीं लागतील. फारतर ज्यामुळें मूलभूत असा फरक पडणार नाहीं, अशा दूरदूरच्या कांहीं वसाहती या साम्राज्यांत असणें शक्य आहे.

युद्धाला सुरवात होण्यापूर्वी सुमारें अेक वर्षापासून विविध राष्ट्रांचा संघ स्थापन करण्याची कितपत शक्यता आहे, याचा बराच अूहापोह झाला होता. या दृष्टीनें क्लॅरेन्स स्ट्रेटच्या " Union Now " या पुस्तकानें बरेंच लक्ष वेधलें होतें, याशिवाय अितरहि बऱ्याच योजना पुढें आल्या होत्या. या सर्व योजनांतील अेक मूलभूत दोष म्हणजे यूरोप व अमेरिका म्हणजेच जणुं काय सर्व जग अशा दृष्टीकोनांतून जगाचा विचार करण्यांत आला होता. चीन, हिंदु-स्थान वगैरे पौर्वात्य देशांकडे बव्हंशी दुर्लक्ष करण्यांत आलें होतें. या योजनांचें बरेच स्वागत होअून त्यांच्यावर खूप चर्चाहि झाली, पण युद्धपूर्व जगांत त्यांना

मूर्त स्वरुप येण्याची संधी मात्र कधींच मिळाली नाहीं. कोणत्याहि प्रमुख देशाची त्या दृष्टीनें विचार करण्याची यत्किंचीतहि अिच्छा नव्हती. आलेली वेळ निघून गेली; कदाचित अशा संधीचा अनुकूल परिणामहि दिसून आला असतां व आलेली संधि दवडल्याबद्दल पुढें कांहीं राष्ट्रांना अनिवार पश्चात्तापहि झाला असेल. खुद्द ब्रिटनचेंच अुदाहरण घ्या.: फरेंच प्रजासत्ताक राष्ट्र मृत्युपंथावर असतांना, ब्रिटीश सरकारनें त्या वेळची धोक्याची परिस्थिती लक्षांत घेअून फरान्स व ब्रिटन यांचें अेकीकरण करण्यांत यावें, अशी वैशिष्ठ्यपूर्ण सूचना केली होती. पण ब्रिटनच्या आतांपर्यंतच्या प्रथेला अनुसरून ही सूचनाहि फार अुशीरां केली गेली. फक्त तीमुळें स्वतंत्र राष्ट्रांच्या अितकेंच काय पण खुद्द ब्रिटीश साम्राज्याच्याहि जुन्या कल्पना कशा बदलत आहेत, हें ताबडतोब सिद्ध झालें.

आणि परिस्थिती अितकी बदलूनहि कांहीं लोक अद्याप वसाहतीचा दर्जा वगैरे गोष्टींची भाषा बोलतच आहेत. त्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं वसाहतीची कल्पना आतां मृतप्राय झाली असून, तिचें पुनरुज्जीवन होणें अशक्य आहे. याशिवाय दुसरें कांहीं लोक चमत्कारीक व अवास्तव अशा पायावर हिंदुस्थानची फाळणी करावी असें सुचवितात. पण हे लोक अेक गोष्ट विसरतात व ती म्हणजे आज जगाचे आणखीं तुकडे करण्याची जरूरी नसून तें अेकवटण्याची व सर्व राष्ट्रांचा अेक संघ करण्याची जरूरी आहे. जगांत यापुढें लहान राष्ट्रें टिकणार नाहींत.

अशा स्थितींत आमच्या स्वातंत्र्याचें काय ? सध्यांचा अेक विवक्षीत राष्ट्रगट मोडणें असा त्याचा अर्थ नव्हे कां ? आणि भावी जागतीक राष्ट्रसंघांत स्वतंत्र हिंदुस्थानचें कोणतें स्थान राहील ? अर्थात ब्रिटीश साम्राज्याचा आम्हांला शेवट करावयाचा आहे, हें अगदीं खरें आहे. कारण साम्राज्यांतून खराखुरा राष्ट्रसंघ अुदयास येणें शक्य नाहीं आणि कोणत्याहि परिस्थितींत व कांहींहि झालें तरी हिंदुस्थान या साम्राज्यांत रहाणार नाहीं. पण आम्ही ज्या स्वातंत्र्याच्या मागें आहोंत तें म्हणजे अलग राष्ट्र किंवा अगोदरच गर्दी झालेल्या राष्ट्रांत आणखी अेका राष्ट्राची भर नव्हे.त्या दृष्टीनें आम्ही या प्रश्नाकडे कधींच

पाहिलें नाहीं. जगांतील निरनिराळे देश जवळजवळ येत चालले आहेत. जागतिक राष्ट्रसंघामार्फत सर्व व्यवस्था चालू आहे, अशी कल्पना व दृष्टी आम्ही ठेविली आहे. अशा जागतिक राज्यव्यवस्थेंत आम्ही आनंदानें सामील होऊं. पण वसाहतीचा दर्जा आम्हांला स्वीकारावयास सांगणें किंवा आमच्यावर आमच्या मर्जीविरुद्ध विशिष्ट संघ लादणें म्हणजे सध्यांच्या जागतिक घटनांच्या दृष्टीनें मूर्खपणाची परमावधी होय. आम्ही अशी सक्ती कधींहि सहन करणार नाहीं, मग परिणाम कांहींहि होवोत.

चालू महायुद्धाचा आणखी ओक अपरिहार्य परिणाम होण्याचा संभव आहे. त्यामुळें सध्यांची भांडवलशाही पद्धत नष्ट होऊन, सर्व जागतिक आर्थिक पद्धतींत कितीतरी अधिक प्रमाणबद्ध नियोजन व नियंत्रण येण्याचा संभव आहे. याबरोबरच आजची भांडवलशाही लोकशाहीसुद्धां बदलेल. याचें कारण सध्यांची ही विशिष्ट लोकशाही म्हणजे सुखवस्तू राष्ट्रांचें अेका परीनें वेळ काढण्याचें साधन असून, आगामी खडतर काळांत ती टिकणार नाहीं. युद्धाच्या दडपणाखालीं आजच कित्येक देशांतून ही लोकशाही अस्तंगत झाली आहे.

अर्थात खुद्द लोकशाही नष्ट होऊन, त्या जागीं सर्वाधिकारशाही येणें घातक ठरेल. आज अशा सर्वाधिकारशाहीचें संकट निर्माण झालें आहे व त्यापासून आपण सावध राहिलें पाहिजे. पण जी लोकशाही यांतून टिकूं शकेल, ती आज यूरोपांतून अस्ताला चाललेल्या लोकशाहीपेक्षां वेगळी व अधिक कार्यक्षम राहील.

आज आपल्यापुढें जगाचें जें नवीन चित्र दृग्गोचर होत आहे, त्यांत आपळें स्थान कोणतें ? त्यांत हिंदुस्थान कोठें आहे ? नात्सीवादाचे आम्ही तीव्र विरोधक असून, नात्सी जर्मनीचें जर जगावर प्रभुत्व स्थापन झालें तर मोठाच अनर्थ निर्माण होअील. पण त्याबरोबरच ब्रिटिश साम्राज्यशाहीचें -- विशेषतः ते अस्ताला जात असतांहि -- आमच्यावर जें जोखड आहे त्याची आम्हांला शिसारी आली आहे. अशा स्थितींत कोणत्याहि साम्राज्याच्या हातांतील बाहुलीं बनण्यापेक्षां सर्वस्वीं नामशेष होणें आम्हांला अधिक परवडेल. आश्चर्याची

गोष्ट म्हणजे आजहि हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हा शब्द अुच्चारतांना ब्रिटिश सरकारच्या घशांत खवखवतें. ब्रिटिश सरकार अद्यापहि आमच्याशी सरंजामी थाटांत वागते व आम्ही सर्व फर्मानें निमूटपणें पाळावींत, अशी अपेक्षा करते. अद्यापहि आम्हांला देहदंड व शिक्षेची दहशत घातली जाते व प्रवचनें झोडली जातात. सध्यां आपण कोणत्या अवस्थेंतून जात आहोंत, याची त्यांना जाणीव नाहीं. आपण आज हिंदुस्थानांत जें धोरण स्वीकारलें आहे, तें युद्धतयारीच्या दृष्टीनें आवश्यक आहे,अशी सरकारची कल्पना आहे कां?दहशत व जबरदस्ती यामुळें हिंदी लोकांच्या अंतःकरणाचा आपण ठाव घेअूं व त्यांची मदत मिळवूं, अशी सरकारची कल्पना आहे कां ? या मार्गानें त्यांना कांहीं द्रव्यसहाय्य मिळेलहि. पण सोन्याचांदीच्या नाण्यांपेक्षां अधिक महत्वाच्या अशा चलनांत त्यांची पत घसरत चालली आहे हें नक्की. हिंदुस्थानांत आज जे प्रकार घडत आहेत व पददलित जनतेची जी असह्य गांजणूक होत आहे, तीमुळें सर्वत्र त्वेषाचें वातावरण पसरलें आहे.

महिनेच्या महिने आम्ही शांतपणें वाट पहात राहिलों. ब्रिटीश लोकांना त्यांच्या या कसोटीच्या व आपत्कालीं सतावण्याचें धोरण आम्ही मुद्दाम स्वीकारलें नव्हतें.अशा स्थितींत ब्रिटिश साम्राज्यशाहीनें वरीलप्रमाणें जें धोरण स्वीकारलें त्यामुळें आमच्या डोळ्यांवर लखकन प्रकाश पडला. आमच्यापैकीं पुष्कळांना ब्रिटीश लोकांविषयीं सहानुभूति वाटते, पण ब्रिटीशांच्या युद्ध-आघाडीपैकीं अेक आघाडी आज हिंदुस्थानांत आमच्याविरुद्ध अुघडलेली आहे हें आम्हांला दिसत आहे. परिणाम कांहींहि होवो पण या परिस्थितीला आम्हीं तोंड देअूं. अेक गोष्ट स्पष्ट समजावयास हरकत नाहीं व ती म्हणजे वरिष्ठ सत्तेची झोटिंगशाही फर्मानें मानण्यास आम्ही तयार नाहीं.

१७ जुलै, १९४०